# पण्डिती 'काव्य'

★ ★ ★ ★ ★

१९८८

म. ग्रं. सं. ठाणे

विषय काव्य

सं. क्र. ७८५५

संपादक

डॉ. के. ना. वाटवे, एम्. ए., पीएच्. डी.

डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी, एम्. ए., पीएच्. डी.

REFBK-0016955

REFBK-0016955

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २

७४०२२
६।३।६७

१९७५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७४०२२ वि: ........
क्रमांक १९७५ नों: वि: ६।३।६७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१९९५५
ता. क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[illegible] 71

# पण्डिती काव्य

संपादक

डॉ. के. ना. वाटवे
एम्. ए., पीएच्. डी.

डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी
एम्. ए., पीएच्. डी.

REFBK-0016955

ग्रंथ संग्रहालय ठाणे

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २

सर्व हक्क सुरक्षित

पहिली आवृत्ती : १९६८

किंमत : ३·५०

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २.
मुद्रक : वि. नी. पटवर्धन, साधना प्रेस, शनिवार पेठ, पुणे २.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **प्रस्तावना** | १–३४ |
| **मुक्तेश्वर** | १–५ |
| १. सीतात्याग | १ |
| **वामनपंडित** | ६–१५ |
| २. सीता–लोपामुद्रा संभाषण | ६ |
| ३. नाममाहात्म्य | १० |
| ४ द्वारकावैभव | १३ |
| **रघुनाथपंडित** | १६–२२ |
| ५. हंस-दमयंती संवाद | १६ |
| ६. गजेन्द्राचा धावा | १९ |
| **सामराज** | २३–३४ |
| ७. रुक्मिणीची तगमग | २३ |
| ८. रुक्मिणीपत्रिका | २७ |
| ९. कृष्णास ते नमनपूर्वक माळ घाली | ३१ |
| **विठ्ठल** | ३५–४१ |
| १०. धनुर्भंग | ३५ |
| ११. राम-परशुराम संघर्ष | ४० |
| **निरंजनमाधव** | ४२–५६ |
| १२. त्रिदंडीवेषधारी अर्जुन | ४२ |
| १३. अर्जुनविना नेच्छी कदां मीं पती | ४८ |
| १४. ताटकावध | ५३ |
| **मोरोपंत** | ५७–६४ |
| १५. कुशलव जन्म | ५७ |
| १६. काही केका | ६१ |
| **टीपा** | ६४–९५ |
| शब्दकोश | ९७–९९ |
| शुद्धिपत्र | १०० |

# प्रस्तावना

## १. पंडिती काव्य

### प्राचीन मराठी काव्यातील तीन प्रवाह

प्राचीन मराठी काव्याकडे दृष्टिक्षेप टाकला तर त्यात प्रमुख असे तीन प्रवाह पहावयास मिळतात: पहिला संतकाव्याचा प्रवाह, दुसरा प्रदीर्घ कथाकाव्याचा प्रवाह आणि तिसरा पंडिती काव्याचा प्रवाह, असे तीन प्रवाह प्राचीन मराठी काव्याला व्यापून राहिले आहेत. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत यांसारखे परमार्थाची, भक्ति-ज्ञान-वैराग्य यांची शिकवण देणारे तत्त्वज्ञानपर संतकाव्य आणि भक्तीचाच उत्स्फूर्त आविष्कार करणारे नामदेव, तुकाराम, गोरा कुंभार, सावता माळी, जनाबाई, चोखा मेळा इत्यादी संतांचे अभंग ही रचना पहिल्या प्रकारात मोडते. समग्र महाभारत, रामायण किंवा भागवत यांवर झालेली अध्यायात्मक रचना ही प्रदीर्घ कथाकाव्यात अंतर्भूत होते. विष्णुदास नामा, नामा पाठक, श्रीधर, बहिरा पिसा, कृष्णदयार्णव या कवींनी अशा प्रकारची रचना केली आहे. पंडित कवींनी महाभारत, रामायण आणि भागवत यांतील निवडक आख्याने घेऊन त्यांवर कलापूर्ण, विदग्ध स्वरूपाची रचना साधली आहे. पंडिती काव्याला कलाकाव्य वा विदग्ध काव्य ही जी इतर नावे मिळाली आहेत, ती याचीच द्योतक आहेत. (महानुभाव कवी नरेंद्र व भास्करभट्ट बोरीकर यांनी प्रथम अशा स्वरूपाची रचना केली. त्यानंतर सतराव्या शतकात पुष्कळ कवींनी पंडिती काव्याचा प्रवाह वाढीस लावला. मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित, सामराज, नागेश, विठ्ठल, आनंदतनय, अनंत कवी, निरंजनमाधव आणि मोरोपंत या कवींनी पंडिती काव्यात मोलाची भर टाकली. या कवींनी केलेले काव्य हेच प्रामुख्याने पंडिती काव्य म्हणून ओळखले जाते.) संतकाव्य, प्रदीर्घ कथाकाव्य आणि पंडिती काव्य यांचे ध्येय, धोरण व उद्दिष्ट निराळे असल्यामुळे त्यांचे स्वरूपही वेगवेगळे बनले आहे. संतकाव्य आणि प्रदीर्घ कथाकाव्य यांच्याशी तुलना केली असता पंडिती काव्याच्या स्वरूपावर महत्त्वाचा प्रकाश पडतो.

यासाठी पंडिती काव्याची प्रथम तुलनात्मक पहाणी करून नंतर स्वतंत्रपणे पंडिती काव्याचे विशेष विचारात घेणे उपयुक्त ठरेल.

## संतकाव्य आणि पंडिती काव्य

संतकाव्य हे सामान्य जनांच्या आध्यात्मिक उद्धारासाठी निर्माण झालेले होते. निवृत्तिपर, परमार्थमार्गी संतांचे ते काव्य होते. साक्षात्कारी किंवा साक्षात्काराच्या मार्गावर असलेल्या तसेच विशिष्ट संप्रदायाचा स्वीकार केलेल्या संतांची ही रचना होती. संतकवींच्या अभंगांतून परमेश्वराच्या भेटीसाठी तळमळ, मुक्तीच्या मार्गावरील वेगवेगळ्या अवस्था यांचेच बहुधा दर्शन घडते. हे काव्य उत्स्फूर्त होते, सहज आविष्काराला तेथे प्राधान्य होते. ' अंतरीचें घावें स्वभावें बाहेरी। आवरिता परी आवरेना, ' अशी येथे स्थिती होती. तळमळीतून, ' वेडेवाकुडे गाईन, परि तुझा म्हणवीन ' या ओढीतून ते निर्माण झाले होते. याच्या उलट पंडिती काव्य हे जाणीवपूर्वक रचलेले, योजनाबद्ध आखलेले असे काव्य आहे. संतकवी आणि पंडित कवी यांची कवित्वासंबंधीची कल्पनाच सर्वस्वी भिन्न आहे असे दिसेल. संतकवींच्या काव्यकल्पनेत परमार्थज्ञानाला महत्त्व आहे.

> **जेणे देहबुद्धी तुटे। जेणे भवसिंधु आटे।**
> **जेणे भगवंत प्रगटे। त्या नांव कवित्व ॥**

ही संतकवींची धारणा होती. पंडित कवी मात्र पांडित्य किंवा व्युत्पत्ती यांना काव्यात महत्त्वाचे स्थान देतात. साहित्य आणि साहित्यशास्त्र यांच्या व्यासंगाने थोर कवी निर्माण होतो असे विठ्ठलाने म्हटले आहे आणि हे मत बहुतेक पंडित कवींना मान्य असल्याचे त्यांच्या उद्‌गारांवरून, तसेच प्रत्यक्ष काव्यरचनेत त्यांनी या व्यासंगाचा जो विनियोग केला आहे त्यावरून स्पष्ट होते. संतकवींच्या बरोबर उलट परिस्थिती आणि प्रवृत्ती पंडित कवींची दिसते. पंडित कवी प्रवृत्तिपर आहेत, रसोत्पत्तीकडे त्यांचा ओढा आहे. परमेश्वराच्या सगुण रूपातील कथा आळविताना मानवी व्यवहार व भावना यांचा आरोप त्यावर करून पंडित कवींनी भावनोत्कर्ष साधला आहे. रसाविष्कार आणि पांडित्यप्रदर्शन असे दुहेरी धोरण त्यांच्या काव्यरचनेत आढळते. संतकवींनी भक्ती वा मुक्ती हे जे काव्यप्रयोजन मानले त्याच्याशी रसनिर्मितीची, कलाविष्काराची सांगड जाणीव-

पूर्वक अशी पंडित कवींनी घातली आहे. आपण काव्यनिर्मिती करीत आहोत, "रसालंकाराची वाणी" प्रकट करीत आहोत हे पंडित कवी आग्रहाने नमूद करतात. वामनपंडित म्हणतो,

'शृंगार वीर करुणाहि नवा रसांची। लीला जगद्गुरुचियां पद सारसांची।'
तर रघुनाथपंडित आपल्या कथेचे वर्णन 'होय शृंगारा करुणरसा थारा' असे करतो. निरंजनमाधव सुभद्राचंपूबद्दल काव्यातच उद्‌गार काढतो,

'शृंगार मुख्य नवही रस मूर्तिमंत, काव्यांत या परिसतां दिसती प्रशस्त।'
तेव्हा संतकाव्याप्रमाणे निवृत्तिपर आणि भक्ती – शांत रसांचा आविष्कार करणारे पंडिती काव्य नाही, तर नवरसांचा जाणीवपूर्वक आविष्कार करण्याची आणि रसिकांना त्याचा आस्वाद घडविण्याची त्याची प्रेरणा आहे. मूळ आख्यानावर व प्रसंगावर म्हणजेच आर्ष सामग्रीवर कलापूर्ण संस्कार केल्यानंतर निर्माण झालेले विदग्धकाव्य म्हणजेच पंडिती काव्य होय.

## प्रदीर्घ कथाकाव्य आणि पंडिती काव्य

प्रदीर्घ कथाकाव्य आणि पंडिती काव्य यांच्याही उद्दिष्टात मूलभूत फरक आहे. प्राचीन मराठीतील प्रदीर्घ कथाकाव्य हे साध्याभोळ्या जनांचे मनोरंजन करण्यासाठी व त्यांना धर्मशिक्षण देण्यासाठी निर्माण झाले होते. हे काव्य लिहिणाऱ्या कवींपुढे असंस्कृतज्ञ वाचक होते. श्रीधराने स्पष्ट म्हटले आहे,

अबळां न कळे संस्कृत वाणी। जैसे आडांतील निर्मळ पाणी।
परी दोर पात्रावांचोनी। अशक्य जना केवि निघे? ॥
तो तडागाशी येतां त्वरें॥ तात्काळेचि तृषा हरे।
भोळे जन तारावया ईश्वरें। प्राकृत ग्रंथ निर्मिले॥

(रामविजय अ. १. १८९-१९०)

कृष्णदयार्णवांनी देखील "प्रेमळ भक्त जे अव्युत्पन्न" त्यांच्यासाठी हरिवरदा टीका लिहिली आहे, असा निर्देश केला आहे. श्रीधर, कृष्णदयार्णव यांसारख्या कवींना काव्यातील कलाकुसर, पांडित्य, शब्दशास्त्रज्ञान नको होते. साध्यासुध्या ओव्यांतून व सैलसर अध्यायांतून फारसे तंत्रबंधन न स्वीकारता त्यांनी कथा

सांगितल्या. पंडित कवींनी मात्र पांडित्य, तंत्रबद्धता यांचा आश्रय केला, विविध वृत्तांची योजना केली. पंडित कवींच्या डोळ्यांपुढे संस्कृतज्ञ वाचकवर्ग होता, असे निश्चितपणे म्हणता येते. विठ्ठल आपल्या वाचकांचा उल्लेख 'पंडित', 'विद्वज्जन' किंवा 'व्युत्पन्न' असा करतो, तर मोरोपंत आपल्या श्रोत्यांना 'रसज्ञमुख्य', 'सारज्ञाते बुधजन' अशा अभिधानांनी गौरवितात. काव्यमर्मज्ञ, पांडित्याची व काव्यकलेची अभिरुची असणाऱ्या लोकांसाठी पंडित कवींनी रामायण, महाभारत यांतील निवडक प्रसंग घेतले आणि ते कलाकुसरीने व पांडित्याने नटवून मांडले. मराठीला संस्कृतचा डौल, संस्कृतची प्रौढी मिळवून देण्याचा, तसेच संस्कृतज्ञांची मराठी वाङ्मयाला मान्यता मिळवून देण्याचा उद्देश या कवींचा होता हे त्यांच्या रचनेवरून उघड होते. थोडक्यात म्हणजे प्रदीर्घ कथाकाव्य रचणाऱ्या कथाकवींना संस्कृत कथा सामान्य जनांना समजावून देऊन त्यांना धर्मप्रवण करावयाचे होते, तर पंडित कवींना त्या कथांतील निवडक भाग सजवून संस्कृतप्रेमी वाचकांपुढे त्यातील काव्यानंदासाठी ठेवायचा होता. पंडिती काव्याच्या या वेगळ्या भूमिकेमुळे त्याला जे वैशिष्ट्यपूर्ण रूप प्राप्त झाले त्याची ओळख यापुढे करून घेऊ.

## पंडिती काव्य हे अभिजात संस्कृत साहित्यरचनेचे पुनरुज्जीवन

पंडित कवींपुढे संस्कृतज्ञ व व्युत्पन्न वाचकवर्ग होता आणि संस्कृतची श्रीमंती मराठीला प्राप्त करून देण्याची प्रेरणा त्यांच्या रचनेमागे होती हे सांगितलेच. हा उद्देश साध्य करण्यासाठी रामायण, महाभारत आणि भागवत यांतील कथाभाग निवडून संस्कृत पंचमहाकाव्ये व नाटके यांच्या आधाराने पंडित कवींनी आपले काव्य सजविले. थोडक्यात सांगायचे तर आर्ष सामग्रीवर विदग्ध संस्कार घडविण्याची प्रक्रिया येथे घडली आणि पंडिती काव्याच्या रूपाने अभिजात संस्कृत साहित्याचे पुनरुज्जीवन झाले. संस्कृतमध्ये रामायण, महाभारत या आर्ष सामग्रीवर आपल्या काळची संस्कृती, कलात्मकता, पांडित्य यांचे संस्कार करून कालिदास, भारवी, माघ आणि श्रीहर्ष या महाकवींनी जी काव्यरचना केली तिला अभिजात संस्कृत साहित्य ( Classical Sanskrit Literature ) असे म्हणतात. या साहित्याच्या अनुकरणाने पंडिती काव्य निर्माण झाले. या साहित्याचा पंडिती काव्यात सजावटीसाठी भरपूर वापर केला गेला असल्याने

पंडिती काव्य म्हणजे पुनरुज्जीवित अभिजात संस्कृत साहित्य होय असे म्हणता येते. पंडिती काव्याने अभिजात संस्कृत साहित्याबरोबरच संस्कृत साहित्यशास्त्राचाही मागोवा घेतलेला आहे. या दोन्हींचा आश्रय पंडिती काव्याच्या उभारणीला पायाभूत ठरला आहे. पंडित कवींनी संस्कृतचे ऋण अनेक बाबतींत घेतले आहे. त्यांनी संस्कृतमधील विविध वाङ्मयप्रकार उचलले आहेत, विविध वृत्तालंकार काव्यात योजले आहेत. याखेरीज आदर्शवाद, संकेत, भाषासरणी या बाबतींतही संस्कृतचे अनुकरण केले आहे. यांची तपशिलात पाहणी केली म्हणजे पंडिती काव्याचे सम्यक् स्वरूपदर्शन होईल.

## संस्कृतमधील वाङ्मयप्रकार

पंडित कवींनी संस्कृतमधील विविध वाङ्मयप्रकार मराठीत आणले. महाकाव्य, खंडकाव्य, लघुकाव्य, स्तोत्र हे वाङ्मयप्रकार त्यांच्या वैशिष्ट्यांसकट पंडित कवींनी उचलले. सामराजाचे ‘ रुक्मिणीहरण ’ हे महाकाव्य, रघुनाथपंडिताचे ‘ दमयंती स्वयंवर ’ हे खंडकाव्य, त्याचेच ‘ गजेंद्रमोक्ष ’ हे लघुकाव्य या काव्यांचा उदाहरणे म्हणून उल्लेख करता येईल. महाकाव्याची पद्धती अनुसरण्याचा प्रयत्न तर अनेक पंडित कवींनी केलेला दिसून येतो. पंडिती काव्याची सजावट या संदर्भात याचा स्वतंत्र परामर्श पुढे घेतला आहेच. संस्कृतमधील चंपूसारखा गद्यपद्यमिश्रित वाङ्मयप्रकाही निरंजनमाधवाने मराठीत आणला ( सुभद्राचंपू ) याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. तसेच पंचमहाकाव्यातील स्तोत्रांच्या धर्तीवर भक्तीचा कलामंडित व पांडित्यपूर्ण आविष्कार करणारी स्तोत्रेही निरंजनमाधवाने रचली आणि संस्कृतमधील आणखी एक प्रवाह मराठीत आणला. यतिनृपतिसंवादासारखे संवादात्मक प्रकरण संस्कृतच्या आधारेच निरंजनमाधवाने रचले आहे. याखेरीज माधवस्वामींची ‘ प्रबोधचंद्रोदय ’ नाटककथा उपलब्ध आहे. याप्रमाणे पंडित कवींनी संस्कृतमधील वेगवेगळे वाङ्मयप्रकार मराठीत आणण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न केला असे जाणवते.

## पंडिती काव्याची सजावट

संस्कृतचे ऋण विविध वाङ्मयप्रकारांबाबत पंडिती काव्याने कसे घेतले हे पाहिले. पंडिती काव्याच्या सजावटीत रघुवंश, कुमारसंभव, नैषधीयचरित आणि

शिशुपालवध ही महाकाव्ये आणि हनुमन्नाटक, शाकुंतल व उत्तररामचरित ही नाटके यांचा पंडित कवींनी मोठ्या प्रमाणात उपयोग केलेला आहे. विठ्ठलाने आपल्या काव्याची सामग्री सांगताना म्हटले आहे.

> कांहीं 'श्रीहनुमंतनाटककथा' कांहीं 'रघूवंशि' ची।
> कांहीं आदिकविप्रमेयरचना, कांहीं गिरा देशिची ॥
>
> (सीतास्वयंवर सर्ग ३. १)

विठ्ठलाचे हे उद्गार प्रातिनिधिक आहेत. रामायण, महाभारत, भागवत यांतून निवडक आख्याने घेऊन प्रसंगयोजना, कल्पनाविलास, वर्णनपद्धती, भाषासरणी या बाबतींत पंचमहाकाव्ये व संस्कृत नाटके डोळ्यांपुढे ठेवून पंडित कवींनी आपल्या काव्याची सजावट केली आहे. पंडित कवींच्या काव्यात याचे प्रत्यंतर ठिकठिकाणी येते. विशेषतः स्वयंवरकाव्यात हे उघड उघड दिसते. नगरीवर्णन, नायकनायिकांचे रूपवर्णन, त्यांच्या प्रेमाचे व विरहावस्थेचे वर्णन, स्वयंवराचा थाट यांसारख्या मोठ्या गोष्टी तर सोडाच, पण स्वयंवरप्रसंगी सखीने नायिकेला राजांची करून दिलेली ओळख, तिची केलेली शृंगारचेष्टा किंवा मिरवणूक पाहण्यासाठी स्त्रियांची उडालेली धांदल व त्या वेळीं घडलेले विनोदी प्रसंग अशा बारीकसारीक गोष्टी सुद्धा या कवींनी मुळातून टिपल्या आहेत, सामराजाचे 'रुक्मिणीहरण,' तसेच नागेश, विठ्ठल यांची सीतास्वयंवरे ही काव्ये या दृष्टीने अभ्यासण्याजोगी आहेत. काही विशेष प्रसंगांतील वा संवादांतील मूळ संस्कृतमधील नाट्य हेरून आपल्या काव्यातही अशा नाट्यपूर्ण प्रसंगांची वा संवादांची योजना पंडित कवींनी केलेली आहे. निरंजनमाधवाने कुमार-संभवातील बटुवेषधारी शंकराने केलेली स्वनिंदा व पाहिलेली पार्वतीची परीक्षा हे नाट्य उचलून त्या धर्तीवर 'सुभद्राचंपू' च्या पाचव्या सर्गात यतिवेषातील अर्जुन आणि सुभद्रा यांचा संवाद लिहिला आहे. मुक्तेश्वर, मोरोपंत आणि निरंजनमाधव यांच्या काव्यांत खटकेबाज संवादांचे डौलदार श्लोक सापडतात, त्यांचे मूळ हनुमन्नाटकातील अशाच प्रकारच्या श्लोकांत आहे. एकंदरीत कथा-रचना, पात्रवर्णन, प्रसंगयोजना, कल्पनाविलास, संवाद, शैली या काव्याच्या विविध अंगोपांगांत अभिजात संस्कृत साहित्याचा वापर सढळ हाताने पंडित कवींनी केला आहे हे मान्य करावेच लागेल.

## आदर्शवाद, संकेत

अभिजात संस्कृत वाङ्मयातील एक ठळक प्रवृत्ती म्हणजे आदर्शवादाची होय. वस्तूची वा व्यक्तीची काल्पनिक पूर्णता वर्णावयाची असा प्रकार येथे असतो. याचे अनुकरण पंडित कवींनी केले आहे. रूपवर्णन, वनोपवनांचे वर्णन, नगरीवर्णन, राजवटीचे वर्णन अशा अनेक ठिकाणी आदर्शवादाचा अवलंब मूळ महाकाव्यात आणि पंडिती काव्यातही कवींनी केलेला आढळतो. याची काही ठळक उदाहरणे देण्यासारखी आहेत. द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगी मुक्तेश्वराने केलेले वस्त्रसमुदायाचे वर्णन ( सभापर्व अ. १५, ओव्या २०५–२३५ ), वामनपंडिताने केलेले श्रीकृष्णमंदिराचे वर्णन ( द्वारकाविजय सर्ग २, श्लोक २८–३२ ), सामराजाचे द्वारकावर्णन व रुक्मिणीच्या रूपाचे वर्णन, नागेशाने सीतेच्या अंगावरील अलंकारांची दिलेली यादी ( सीतास्वयंवर श्लोक २०४–२१० ) विठ्ठलाने रुक्मिणीस्वयंवरात आणि निरंजनमाधवाने ज्ञानेश्वरविजयातील भोजन-विलास या अध्यायात वर्णिलेला भोजनाचा थाट आणि मोरोपंतांनी कुशलवोपाख्यानात काढलेले रामाच्या राजवटीचे आदर्श चित्र अशा अनेक ठिकाणी पंडित कवींनी आदर्शवाद अवलंबिलेला आहे. कालव्यत्यासाचा ( Anachronism ) दोष पत्करूनही हे सर्व पंडित कवी हा तपशील देतात आणि आदर्शवादाचा अतिरेकी आश्रय करतात.

संस्कृतमधील कविसंकेतांचाही मुक्तहस्ताने वापर पंडित कवींनी केला आहे. चक्रवाक-चक्रवाकी यांचा विरह कमलपत्रामुळे रात्री होतो व सूर्योदय झाल्यावर तो संपतो, चंद्रकांत मण्याला चंद्रकिरणांनी पाझर फुटतो, कुमुदिनी चंद्र उगवल्यावर फुलते, चंद्रकिरणांवर चकोर उपजीविका करतो, चातक मेघाचे पाणी पितो, मोर मेघाला पाहून नाचतो, कल्पवृक्ष इच्छापूर्ती करतो, राजहंस मोती खातात यांसारखे अनेक संकेत वामनपंडित, सामराज, विठ्ठल, निरंजनमाधव यांच्या काव्यांत वर्णनाच्या ओघात येतात. संस्कृतच्या पावलावर पाऊल टाकून आदर्शवाद आणि कविसंकेत यांची पंडित कवींनी केलेली योजना पाहिली म्हणजे पंडिती काव्य हे संस्कृत साहित्याचे पुनरुज्जीवन असल्याची जाणीव अधिकच तीव्रतेने होते.

## भाषेची घडण

संस्कृतमधील वाङ्मयप्रकार आणि आदर्शवादासारखी प्रवृत्ती उचलल्यावर त्यांना अनुरूप अशी संस्कृतप्रचुर, समासघटित भाषा उचलणे पंडितकवींना ओघानेच प्राप्त झाले. मराठी भाषेला संस्कृत भाषेची प्रौढी व डौल आणण्याचा पंडित कवींचा उद्देश असल्यामुळे त्यांनी देशी, तद्भव शब्द कमी करून तत्सम शब्द व प्रदीर्घ सामासिक पदे यांची योजना अधिक प्रमाणात केलेली आहे. संतकवींची साधी, सोपी लोकाभिमुख भाषा येथे नाही तर तिला प्रौढ, संस्कृत-प्रचुर रूप प्राप्त झाले आहे. सुभाषितप्रवणता (अर्थांतरन्यासाची योजना), संस्कृत वाग्विशेष (वार्ता श्रवणगोचर होणे, नेत्रातिथी होणे, वचन आदरीणे इ.), विशेष्याप्रमाणे विशेषणाची लिंगवचनविभक्ती ठेवणे (कंदमूळफळें वरें, शीतळें जळें, प्रशिथिलीं रदीं, पुष्पें सुगंधें इ.), संख्येबद्दल प्रसिद्ध पदार्थांची योजना करणे (नयनतनुवेळा) यांसारखे संस्कृत भाषासरणीचे अनेक लहान-मोठे विशेष पंडित कवींनी आत्मसात केलेले आहेत. निरंजनमाधवाच्या 'सुभद्राचंपू' मधील 'चूर्णिका' हे ललितगद्य संस्कृत सामासिक शब्दांनीच भरलेले आहे. मोरोपंतांसारखे कवी तर संस्कृतप्रचुर लिहिता लिहिता अस्सल संस्कृत वाक्येच घालताना आढळतात. भाषेचे संस्कृतीकरण करताना संस्कृत-प्राचुर्याचा अतिरेक व दुर्बोधता हे दोष जसे पंडिती काव्यात निर्माण झाले आहेत, तसेच प्रौढ, सामासिक संस्कृत शब्दाशेजारी प्राकृत, बोली भाषेतील शब्द वापरल्यामुळे विरस करणारी विषम भाषासरणी निर्माण झाली आहे. हे दोष वगळले तर पंडित कवींनी मराठीला प्रौढ रूप प्राप्त करून दिले हे खरे आहे.

संस्कृतमधील विविध वृत्ते आणि अलंकार यांचाही वारसा पंडित कवींनी जाणीवपूर्वक जतन केला आहे. संतकवींनी अभंग, ओवी यांचाच केवळ अवलंब केला होता. पंडित कवींनी आपल्या काव्यात निरनिराळी वृत्ते वापरली आहेत. वामनपंडित, सामराज या कवींनी रसानुकूल वृत्तयोजनेचे श्रेय पदरी घेतले आहे, तर विठ्ठलासारख्याने काव्यबंध साधून चित्रकाव्यरचनेची कसरत करून दाखविली आहे. वृत्तांबरोबर गेय छंदांचाही वापर रघुनाथपंडित, आनंदतनय, अनंतकवी यांनी केला आहे. संस्कृतमधील विविध अलंकारांचे वैभव मराठीला प्राप्त करून देण्याचा मान पंडित कवींचा आहे. यमक, अनुप्रास यांसारखे शब्दालंकार

उपमा, रूपक, अपन्हुती, व्यतिरेक यांसारखे अर्थालंकार आणि श्लेषासारखा उभयालंकार या सर्वांची उदाहरणे पंडिती काव्यात पदोपदी आढळतात. अर्थात मुक्तेश्वरासारखा तरल प्रतिभेचा कवी सोडला तर इतरत्र संस्कृतातील सांकेतिक कल्पनाक्षेत्रच बहुधा पहावयास मिळते आणि यमकाच्या हव्यासापायी अनेक वेळा काव्यहानीही वामनपंडित, विठ्ठल, मोरोपंत इ. कवींनी पदरी घेतलेली दिसते हे नाकबूल करता येत नाही. एकंदरीत पंडित कवींनी मराठी भाषेला प्रौढी प्राप्त करून देऊन वृत्तालंकारांचा साज तिच्यावर चढविला.

## पंडिती काव्यामागील परिस्थितीची पार्श्वभूमी

संस्कृत अभिजात वाङ्मयाच्या पावलावर पाऊल टाकून पंडिती काव्य मराठीत अवतरले हे पाहिले. अभिजात संस्कृतच्या धर्तीवर काव्यरचना करण्याची प्रेरणा पंडित कवींना झाली त्याला तत्कालीन वातावरण अप्रत्यक्षरीत्या बरेचसे कारणीभूत ठरले. देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्यनाशानंतर महाराष्ट्रात पारतंत्र्याचा अंधकार पसरला. मध्यंतरीची शतके संक्रमणावस्थेत गेली. १७ व्या शतकाच्या प्रथम पादापर्यंत महाराष्ट्रात मुसलमानी अंमल चालू होता. स्वत्व, स्वधर्म टिकविण्याची चिंता जनांना ग्रासत होती. शिवरायांच्या उदयकाली ही परिस्थिती पालटली. स्वातंत्र्यसूर्य उगवला आणि कवींना संपन्नता व स्वास्थ्य या प्रकाशकिरणांचा लाभ झाला. स्वराज्यात कवींना राजाश्रय मिळाला त्यामुळे प्रदीर्घ रचनेसाठी लागणारे मनःस्वास्थ्य प्राप्त झाले. शहाजी, शिवाजी आणि व्यंकोजी यांचा संस्कृत विद्येला आश्रय होता. शिवाजीच्या पदरी परमानंदासारखे संस्कृत पंडित होते. संस्कृतला मिळणारी ही मान्यता पाहून तिच्या धर्तीवर रचना करण्याची स्फूर्ती मराठी कवींना साहजिकच झाली. मराठी पंडित कवींपैकी बऱ्याच जणांना राजाश्रय वा धनिकाश्रय होता. रघुनाथपंडित व सामराज यांना राजाश्रय होता तर नागेश व मोरोपंत यांना धनिकाश्रय होता. संपन्नता आणि स्वास्थ्य यांमुळे कवींची प्रवृत्ती भाष्य वा टीकाग्रंथाची चाकोरी सोडून आख्यानरचनेकडे झुकू लागली. ठराविक अध्यात्मप्रतिपादनात कवित्व खर्ची घालण्याचे सोडून पंडित कवी कलाविलासाकडे वळले. पंडित कवी हे संतकवींप्रमाणे कोणत्याही संप्रदायाचे अनुयायी नव्हते या गोष्टीचाही या संदर्भात उल्लेख केला पाहिजे. विशिष्ट सांप्रदायिक तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याचे बंधन पंडित कवींवर नव्हते. ही

संप्रदायनिरपेक्षता त्यांच्या कवित्वाला उपकारक ठरली आहे. थोडक्यात स्वातंत्र्य, संपन्नता आणि स्वास्थ्य या अनुकूल वातावरणामुळे कलाकुसर आणि पांडित्य यांना प्राधान्य देणारे पंडिती काव्य शिवकालात मोठ्या प्रमाणात निर्माण झाले.

संक्रमणकालात महाराष्ट्रधर्म टिकविण्याची, मराठी भाषा राखण्याची धडपड करणे महत्त्वाचे ठरले, तर शिवकालात मराठी भाषेचे वैभव संस्कृतचा परंपरागत वारसा आत्मसात करून वाढवावे ही प्रवृत्ती जोरावली यात आश्चर्य नाही. या प्रवृत्तीचेच दृश्य फल म्हणजे पंडिती काव्य होय. पंडिती काव्याच्या या वृक्षाचे बीजारोपण मुक्तेश्वराने केले. त्यानंतर स्वराज्याच्या वातावरणात पंडिती काव्याचा वृक्ष बहरला. वामनपंडित, रघुनाथपंडित, सामराज, निरंजनमाधव आदी पंडित कवींनी आपली प्रतिभा आणि पांडित्य यांचे खतपाणी घालून पंडिती काव्याच्या वृक्षाचे वर्धन केले.

# २ पंडित कवी

## मुक्तेश्वर : (इ. स. १६०९–१६६०)

प्राचीन मराठी वाङ्मयात पंडिती काव्याचे स्वतंत्र दालन सुरू करण्याचा मान मुक्तेश्वराला द्यावा लागतो.[१] पंडित कवींची संतकवींहून निराळी असणारी प्रेरणा आणि भूमिका मुक्तेश्वराबाबत स्पष्टपणे जाणवते. ज्ञानेश्वरांचा अपवाद सोडता जाणीवपूर्वक कवित्वनिर्मिती करण्याची भूमिका संतकवींची नव्हती असे निश्चयाने म्हणता येते. धार्मिक आणि अध्यात्मपर दृष्टीची पकड इतकी तीव्र होती की, रुक्मिणीस्वयंवरासारख्या आख्यानकाव्यात एकनाथांनी प्रसंगवर्णन करताना अनेक ठिकाणी आध्यात्मिक रूपके बसविली आहेत. मूळ काव्यमय प्रसंगातील काव्य बाजूला सारून त्यातून आध्यात्मिक अर्थ काढणारी उपदेशकाची दृष्टी एकनाथांची होती. याच्या उलट एकनाथांचा नातू मुक्तेश्वर याची दृष्टी

---

१. महानुभाव कवी नरेंद्र आणि भास्करभट्ट यांच्या काव्यांत याच्या काही खुणा आढळतात. परंतु जाणीवपूर्वक अशी रचना करण्याचे कर्तृत्व मुक्तेश्वराचेच.

रसिक कलावंताची होती. कवित्वाचा विलास दाखविण्याची जबरदस्त प्रेरणा मुक्तेश्वराच्या काव्यामागे आहे. ‘ व्यासांच्या ग्रंथातील सोने घेऊन मी त्याचा देशी भाषेत अलंकार घडविला आहे, ’ असे तो महाभारत रचनेबाबत म्हणतो.

व्यास ग्रंथगिरीचें सोनें । संस्कृत खोटिये गाळुनि मनें ।
देशभाषा घडिलें लेणे । साहित्यरत्नीं सुजडित ॥

‘ विश्वेश्वराच्या कृपाजलाने आपल्या वाग्वल्लरीला स्फूर्तीचे पल्लव फुटले, शब्द-सुमनांचे फुलोरे आले, ’ असे आपल्या कवित्वशक्तीचे वर्णन आत्मविश्वासाने मुक्तेश्वर करतो, तेही जाणीवपूर्वक काव्यनिर्मितीच्या संदर्भात लक्षणीय आहे. उज्ज्वल प्रतिभेच्या या कवीने कवितेबाबतची पारमार्थिक, आध्यात्मिक दृष्टीची रूढ चाकोरी सोडली आणि ऐहिक, प्रवृत्तिपर, रसिक दृष्टीने काव्याकडे पाहण्याचा नवा मार्ग चोखाळला, म्हणून मुक्तेश्वर पहिला पंडित कवी वा कलाकवी म्हणावा लागतो.

संक्षेपरामायण, काही आख्याने ( हरिश्चंद्राख्यान, शुकरंभासंवाद, गरुड-गर्वपरिहार, कालियामर्दन, अहिमहिआख्यान ) आणि महाभारताची पाच पर्वे अशी मुक्तेश्वराची रचना आहे. ‘ संक्षेपरामायण ’ ही मुक्तेश्वराची प्रारंभीची रचना आहे. अनेकवृत्तात्मक रचनेला येथून प्रारंभ झाला हे या काव्याचे वैशिष्ट्य; पण मुक्तेश्वराच्या कवित्वाबाबत मात्र येथे निराशाच पदरी पडते. खडबडीत, नीरस, बेडौल अशी ही रचना आहे. शब्दांच्या ओढाताणीतून कवी अपरिपक्व असल्याचे जाणवते. याशिवाय हनुमन्नाटक, प्रसन्नराघव, कुमारसंभव, भर्तृहरीची शतके, भामिनीविलास या संस्कृत काव्यांतील श्लोकांचे भाषांतर कथानकात गोवलेले आहे, त्यावरून कवीची अनुकरणशीलता दिसते. महाभारतात मात्र मुक्तेश्वराच्या स्वतंत्र प्रतिभेचा प्रत्यय येतो. मनोहर प्रसंग आला की मुक्तेश्वर व्यासांना बाजूला सारतो, त्याची काव्यलतिका पल्लवित होते आणि मुळापेक्षा सरस कल्पनांची खैरात तो करतो. महाकवीची प्रतिभा मुक्तेश्वराजवळ असल्याचा साक्षात्कार त्याच्या महाभारतातील आदिपर्व, सभापर्व, वनपर्व आणि विराटपर्व या विदग्ध रचनेवरून होतो.

मुक्तेश्वराच्या कवित्वाचा विशेष म्हणजे रसोत्कटता आणि कल्पनाविलास ह्या दोन्हींचा संगम हा होय. व्यक्तींच्या मनोव्यापारांची उठावदार वर्णने करून तो

आपल्यापुढे विशिष्ट प्रसंग साक्षात उभा करतो आणि रसनिर्मितीही साधतो. भर सभेत दुर्योधनाने अपमान केल्यामुळे खवळलेल्या द्रौपदीचा संताप, दुष्यंताने शकुंतलेचा अंगीकार न करता "खाण तैशी माती" अशा अपशब्दांनी निर्भर्त्सना केल्यावर शकुंतलेचा उफाळलेला क्रोध, दमयंतीला सोडताना नलाची झालेली विकल अवस्था आणि दमयंतीने नलाचा केलेला करुण धावा यांसारखी रसोत्कट स्थळे मुळातूनच पाहण्यासारखी आहेत. मुक्तेश्वराच्या पल्लेदार रूपकातून त्याच्या कल्पनाशक्तीचा विलास पहावयास मिळतो. मुक्तेश्वराने केलेली सृष्टि-सौंदर्याची वर्णनेही त्याच्या काव्यशक्तीचा आविष्कार करतात. आदिपर्वातील प्रातः-कालवर्णन आणि वनपर्वातील वर्षाऋतूचे वर्णन जुन्या वाङ्मयातील सृष्टिवर्णनात स्वतंत्र कल्पनांमुळे आगळी ठरतील. अरुणोदयाच्या वेळी आकाशातील नक्षत्रे लोप पावतात यावर मुक्तेश्वराने योजलेले रूपक पहा :

> **गगनसमुद्रीं मुक्ताफळें। अरूणचंचूनें कनकमराळें।**
> **वेंचोनि घेतां कळाकुशलें। नाहींच केलीं नक्षत्रें ॥**

मुक्तेश्वराची ओघवती, रसानुकूल कोमल वा कठोर बनणारी शैली त्याच्या प्रसंग-वर्णनात, रसनिर्मितीत साह्यकारी ठरते. संस्कृतचा मागोवा सजावटीसाठी न घेता संस्कृतप्रमाणे केलेली प्रौढ, विदग्ध स्वरूपाची रचना असे मुक्तेश्वराच्या महाभारतरचनेचे थोडक्यात वर्णन करता येईल. मुक्तेश्वरासारखी उत्कट भावना, पल्लेदार कल्पना, स्वतंत्र प्रसंगयोजना आणि प्रभावी शैली त्याच्यामागून येणाऱ्या पंडित कवींत फारशी दिसून येत नाही.

## वामनपंडित ( इ. स. १६०८–१६९५ )

वामनपंडित हा पंडित-कवींचा प्रातिनिधिक कवी आहे असे त्याच्या रचनेवरून म्हणता येते. पांडित्य आणि कवित्व यांचा संयोग त्याच्या रचनेत पहावयास मिळतो. वेदान्तपर आणि आख्यानपर अशी त्याची द्विविध रचना पाहिली म्हणजे तर हे उघड होतेच, परंतु नुसती वामनी प्रकरणे–आख्याने वरवर चाळली तरी भक्ति-ज्ञान आणि रस यांचे मिश्रण नजरेत भरते. वामनाची स्तुती करताना मोरोपंतांनी "भक्ति-ज्ञान-रसभरित यत्कवन" असे म्हटले आहे, यात वामनपंडिताच्या काव्याचे विशेष संक्षेपाने आले आहेत. निगमसार, कर्मतत्त्व, ब्रह्मस्तुती, अनु-भूतिलेश ही वामनाची वेदान्तपर रचना आहे. वामनपंडिताने प्रथम समश्लोकी

गीताटीका लिहिली आणि नंतर यथार्थदीपिका लिहून ज्ञानयुक्त सगुणभक्तीचे प्रतिपादन केले. वामनाचे कवित्व पहावयाचे म्हणजे त्याच्या आख्यानपर रचनेकडे वळावे लागते.

रामायण, महाभारत आणि भागवत यांतील काही निवडक प्रसंगांवर वामनाने आख्याने रचली आहेत. रामजन्म, अहल्योद्धार, सीतास्वयंवर, भरतभाव आणि लोपामुद्रासंवाद ही रामकथेवर आधारित प्रकरणे आहेत. वामनाच्या नावावर उपलब्ध असलेल्या महाभारतातील आख्यानांबाबत बरेच मतभेद आहेत. त्यांतील बरीचशी भीष्मयुद्ध, भीष्मशरपंजर, जयद्रथवध, विराटपर्व ही प्रकरणे हरिवामनाची असून ती वामनपंडिताच्या नावावर खुसडली गेली आहेत असे डॉ. शं. गो. तुळपुळे[1] यांनी प्रतिपादिले आहे. वामनपंडिताची भागवताश्रय रचना अधिक सरस आहे. गजेंद्रमोक्ष, नामसुधा, वनसुधा, वेणुसुधा, मृत्तिकाभक्षण, हरिविलास, रासक्रीडा, वामनचरित्र, कात्यायनीव्रत, बालक्रीडा, कृष्णजन्म इ. आख्यानांतून रसानुकूल, नादवती, अनुप्रासात्मक वर्णरचना, शृंगार-भक्ती यांचे मिश्रण आणि अध्यात्मप्रवणता हे वामनपंडिताच्या काव्याचे विशेष दिसून येतात. राधाविलास, राधाभुजंग यांतील उत्तान शृंगार पाहून बा. अ. भिडे यांनी शृंगारप्रिय वामन आणि वेदान्तप्रवण वामन असे दोन वामन कल्पिले आहेत. परंतु शृंगारिक रचनेतही वामनपंडिताची भक्तिप्रवणता व पांडित्य दिसत असल्याने ही प्रकरणे एकाच वामनपंडिताची मानावयास हरकत दिसत नाही. भाषासरणी, यमके यांचे साम्य पाहिल्यावर या अनुमानाला बळकटीच मिळते. भागवताच्या दशमस्कंधाच्या आधारे ‘ द्वारकाविजय ’ हे खंडकाव्य वामनपंडिताने रचले आहे. येथे कृष्णाच्या वैभवाचे वर्णन आहे. द्वारकाविजयाची विभागणी विवाहविजय, हरिमंदिरविजय, नारदातिथ्यविजय, लीलाविनोदविजय आणि मुक्तिप्रदविजय अशा पाच सर्गांत केलेली असल्याने संस्कृत महाकाव्याचा आदर्श वामनपंडिताच्या डोळ्यांपुढे असावा असे वाटते. पण महाकाव्याचे इतर विशेष येथे दिसत नाहीत. वामनपंडिताचे यातील कवित्वही फारसे उच्च दर्जाचे नाही. यमकांचा हव्यास, कल्पनांची पुनरुक्ती, अध्यात्माचे दडपण यांचेच येथे प्राबल्य आढळते. वामनपंडिताचे कवित्व त्याच्या इतर भागवती प्रकरणांतच अधिक प्रकट झाले आहे.

---

१. महाराष्ट्र सारस्वत ( आ. ५ ) पुरवणी पृ. ८७२.

वामनपंडिताच्या कवित्वाचा मनोरम विशेष म्हणजे शब्दचित्रे रेखाटण्याचे किंवा स्वभावोक्तीचे त्याचे कसब हा होय. वर्ण्यवस्तू स्पष्टपणे पाहणे व उभी करणे हे त्याचे वैशिष्ट्य आहे. मूळ प्रसंग सजविताना स्वतःच्या कल्पनांची भर घालून, रेखीव वर्णन करून, भावना फुलवून व रसपोषक वृत्तयोजना करून वामनपंडित कवित्वविलास दाखवितो. रासोत्सवातील कृष्णाच्या लीलांचे वर्णन उदाहरणादाखल सांगता येईल. सौंदर्यदृष्टीने प्रसंगाची निवड करणे आणि कलात्मकतेने त्याची सजावट करणे हे दोन्ही ज्या ठिकाणी साधले तेथे वामन-पंडिताचा 'सुश्लोक' रसिकाला वेधून घेतो. परंतु जेथे कवित्वावर पांडित्याची कुरघोडी होते, कथेचे जबरदस्तीने अध्यात्मीकरण केले जाते, यमकानुप्रासांच्या नादी लागून काव्याची हानी होते किंवा अतिरेकी शृंगारवर्णनात बीभत्सता प्रवेश करते तेथे वामनपंडिताचे काव्य दोषास्पद ठरते. 'वदवद वद जिव्हे रामनामें रसाळें' यासारखी नामसुधेतील रसाळ, प्रासादिक रचना, वनसुधेतील उठावदार शब्दचित्रे, रासक्रीडेतील कामीजनांची आतुरता, मत्सर यांचे यथातथ्य वर्णन किंवा लोपामुद्रासंवादातील संभाषणातून बारकाव्याने खोचक रीतीने प्रकट केलेले स्त्रीच्या मनाचे कोमल-कटू पदर वामनपंडिताचे हृद्य कवित्व आपल्यापुढे ठेवतात; उलट राधाविलास, राधाभुजंग, द्वारकाविजय यांतील रचना त्यातील उघडा शृंगार, पांडित्य, ओढून ताणून बसवलेले श्लेष, यमकासाठी केलेली निरर्थक जोडणी (जोडलेले श्लोकाचे उत्तरार्ध) हे खालच्या दर्जाचे काव्य आहे. थोडक्यात म्हणजे जेथे कवित्वावर पांडित्याने कुरघोडी केली नाही अशी वामनपंडिताची श्लोकरचना त्यातील रसपूर्णता, वर्णनशैली, कल्पनावलोकन या गुणांमुळे "सुश्लोक वामनाचा" या प्रशंसेस पात्र ठरली आहे. पंडिती काव्यात वामनाच्या अशा गुणसंपन्न रचनेला महत्त्वाचे स्थान द्यावे लागते.

## रघुनाथपंडित

रघुनाथपंडिताचा निश्चित काल उपलब्ध नसला तरी हा कवी शिवकालीन असावा हे अ. का. प्रियोळकर[१] व द. सी. पंगु[२] यांचे अनुमान ग्राह्य वाटते.

---

१. अ. का. प्रियोळकर : दमयंती स्वयंवर–प्रस्तावना.

२. प्रा. द. सी. पंगु : प्राचीन मराठी कविपंचक.

अ. का. प्रियोळकर आणि द. सी. पंगु यांनी या कवीचा काल एकच मानला असला तरी रघुनाथपंडित या व्यक्तीबद्दल मात्र निराळी मते मांडली आहेत. प्रियोळकरांनी अष्टप्रधानांपैकी न्यायशास्त्री पंडितराव म्हणजे रघुनाथपंडित होय असे म्हटले आहे, तर पंगूनीं राजव्यवहारकोशकार रघुनाथ नारायण हणमंते म्हणजेच रघुनाथपंडित कवी असे प्रतिपादले आहे. डॉ. तुळपुळे[1] यांनीही महाराष्ट्र सारस्वताच्या पुरवणीत आतापर्यंतच्या संशोधनाची चिकित्सा करून रघुनाथपंडित शिवकालीन तसेच राजकारणपटू असावा असे मत मांडले आहे. वामनपंडिताप्रमाणेच रघुनाथपंडित हा पंडिती काव्याचा प्रातिनिधिक लेखक आहे. त्याची रचना वृत्तबद्ध आणि संस्कृत महाकाव्याचे अनुसरण करणारी आहे. रघुनाथपंडिताच्या 'रामदासवर्णना'चे डौलदार असे ११ श्लोक वसंत-तिलका वृत्तात गुंफलेले आहेत, तर गजेंद्रमोक्षाचे ५८ श्लोक विविध वृत्तांत रचलेले आहेत. भागवतातील प्रसिद्ध आख्यानावर गजेंद्रमोक्ष हे खंडकाव्य आधारलेले आहे. दमयंती स्वयंवर ( इ. स. १६८५ ) हे खंडकाव्यच प्रामुख्याने रघुनाथपंडिताच्या कीर्तीला कारणीभूत ठरले आहे.

नल-दमयंतीचे मूळ आख्यान भारताच्या वनपर्वात आहे. पण रघुनाथपंडिताने व्यासांचा आधार न घेता श्रीहर्षाचे नैषधीयचरितच डोळ्यांपुढे ठेवलेले दिसते. दमयंती स्वयंवर ही नैषधाची टीका आहे असे इतर कवींचे दोन उल्लेखही सापडतात. श्री. अ. का. प्रियोळकरांनी याचा स्वतंत्र अभ्यास करून दमयंती-स्वयंवरात रघुनाथपंडिताने नैषधाचा अर्थानुवाद अनेक ठिकाणी कसा केला आहे ते समानार्थी श्लोक देऊन स्पष्ट केले आहे. नैषधीयचरित डोळ्यांपुढे असले तरी रघुनाथपंडिताची ही रचना महाकाव्य या नावाला मात्र पात्र होणारी नाही. महाकाव्यात अपेक्षित असे भरीव, दीर्घ कथानक, विषयवैचित्र्य येथे आढळत नाही. स्वयंपूर्णता, क्रियेचे ऐक्य या विशेषांमुळे हे खंडकाव्यच ठरते. रघुनाथपंडिताजवळ चांगल्या प्रकारची कवित्वशक्ती असल्याने त्याचे हे २५४ श्लोकांचे लहानसे खंडकाव्य सुरस झाले आहे. एखाद्या लहानशा हस्तीदंती कलाकृतीवरील कलाकुसर बघून जसे मन लोभावते तसे दमयंतीस्वयंवरातील नाजूक कलाकुसर पाहताना होते. मुक्तेश्वरासारखी पल्लेदार आणि गगनभरारी

---

१. महाराष्ट्र सारस्वत ( आ. ५ ) पुरवणी पृ. १००३.

घेणारी कल्पनाशक्ती रघुनाथपंडिताजवळ नाही; परंतु रसिकाचे मन आकर्षून घेणारी नाजूक कल्पनाशक्ती त्याच्या काव्यात प्रतिबिंबित होते.

रघुनाथपंडिताची कल्पनाशक्ती त्याने जी प्रसंगनिर्मिती केली आहे त्यात विशेषतः प्रकट झाली आहे. प्रसंगनिर्मिती अशी करावयाची की त्यातून भावनाविष्कारही साधावा आणि व्यक्तिस्वभावाचे मर्मही प्रकट व्हावे, हे रघुनाथपंडिताच्या कवित्वशक्तीचे द्योतक आहे. दमयंती-स्वयंवरातील हंस-नल यांची भेट हा प्रसंग या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. नलाच्या हातून सुटण्यासाठी प्रथम हंस हरतऱ्हेच्या विनवण्या करतो, तरीही नलाला दया येत नाही तेव्हा "तुझ्या सदयतेची व मोठेपणाची कीर्ती ऐकून व त्यावर विश्वसून मी क्रीडा करायला आलो असताना तू माझा घात करतो आहेस. अशा विश्वासघातक्याला धरल्याबद्दल भूमीला लाजच वाटेल" (द. स्व. ५३) असा मर्मभेदक उपहास हंस करतो आणि त्याची सुटका होते. मानवी मनोविकार धारण करणारा हा राजहंस ही रघुनाथपंडिताची हृद्य अशी नवनिर्मिती आहे. त्याची चतुरता, कृतज्ञताबुद्धी यांचे चित्रण वेधक आहे. दमयंती आणि नलराज यांचे स्वभावविशेषही रघुनाथपंडिताने थोडक्यात वर्णिले आहेत. दमयंतीची मर्यादशीलता, तिचा विनय, तिचे निष्ठायुक्त प्रेम आणि याबरोबरच तिच्याजवळचे चातुर्य यांचे बारीकसारीक प्रसंगांतून होणारे दर्शन विलोभनीय आहे. स्वयंवराला इंद्रादी देव आले असता त्यांना "तुम्ही मला पित्याप्रमाणे आहांत, नलराजाच्या हाती माझा कर देऊन कन्यादान करा" असे दमयंती म्हणते हा एकच प्रसंग उदाहरणादाखल सांगितला तरी पुरे आहे. नलाची धीरोदात्तता अशीच तो दमयंतीला "इंद्राला वर" हा निरोप पाठवितो त्यातून व्यक्त झाली आहे. रघुनाथपंडिताने स्वभाववर्णनाबरोबरच नलाची विरहावस्था, दमयंतीची व्याकुळता रंगवून भावनाविष्कारही कौशल्याने साधला आहे.

रघुनाथपंडिताच्या कवित्वाचा आणखी एक विशेष म्हणजे वस्तूचे, व्यक्तीचे यथातथ्य वर्णन करणे, म्हणजेच स्वभावोक्ती साधणे हा होय. नलाला राजहंस प्रथम दिसला तेव्हाची रघुनाथपंडिताची स्वभावोक्ती आकर्षक आहे. जलविहाराने दमलेल्या हंसाने "पोटींच एक पद, लांबविला दुजा तो। पक्षीं तनू लपवि..." हे राजहंसाचे वर्णन (श्लोक ४२) किंवा दमयंतीने राजहंसाला

पाहिले त्या वेळचे वर्णन ( श्लोक ९६ ) डोळ्यांपुढे स्पष्ट चित्र निर्माण करते. गजेंद्रमोक्षात गजेंद्राचे तळ्यात उतरणे, त्याची नक्राशी झालेली झटापट यांचे प्रभावी शब्दचित्र रघुनाथपंडिताने काढले आहे तेही उल्लेखनीय आहे. रघुनाथ-पंडिताने केलेले सृष्टिवर्णन बरेचसे सांकेतिक असले तरी काही ठिकाणी त्याची निरीक्षणशक्ती प्रत्ययास येते. दमयंतीस्वयंवरातील उद्यानवर्णन व कुंडिनपुरवर्णन, गजेंद्रमोक्षातील त्रिकूटपर्वतवर्णन व उद्यानवर्णन ही अलंकारिक आणि संस्कृत धर्तीवर केलेली वर्णने आहेत. श्रीहर्षाप्रमाणे अलंकारप्रचुर, समासबटित शैली काही ठिकाणी रघुनाथपंडिताने वापरली आहे. "औषध नलगे मजला" यासारखा त्याचा श्लेष चपखलपणे भावव्यक्ती करतो तर राजहंसाजवळ दमयंतीने जो "श्लेषशब्दें" भाव सांगितला आहे (दमयंतीस्वयंवर श्लोक १२९) तेथे ओढूनताणून अर्थ बसवावे लागतात.

**मी जाण देवनळही स्वकरीं धराया । मागेन काय चतुरा मज लाज जाया ।**
**काळे करूनि मुख जो वर होय लेखीं । हें बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी ॥**

कवित्वापेक्षा पांडित्याचा प्रभाव पडून येथे रसभंग होतो. ही सहजस्फूर्त रचना नाही तर कारागिरी आहे, प्रयत्नपूर्वक केलेली रचना आहे याची होणारी जाणीव हा पंडिती काव्याचा विशेषच आहे. 'जें कार्य तें धरिल कीं गुण कारणाचे' ( श्लोक ११८ ) "कठिण समय येता कोण कामास येतो" यांसारखे रघुनाथपंडिताचे अर्थान्तरन्यासाचे श्लोक प्रसिद्धच आहेत. पांडित्यप्रभावाने भारलेली दुर्बोध, क्लिष्ट रचना सोडली तर मार्मिक स्वभाववर्णन, प्रसंगयोजना आणि भावनाविष्कार यांच्या साह्याने रघुनाथपंडिताने आधुनिक अभिरुचीच्या रसिकांनाही आकर्षून घेणारी काव्यरचना करण्याचे श्रेय मिळविले आहे यात संशय नाही.

## सामराज ( इ. स. १६२८–१६७८ )

भोसले घराण्याच्या पिढीजात पुरोहितांच्या वंशातील शिवकालीन पुरुष शामभट आर्वीकर म्हणजेच सामराज कवी होय असे संशोधन प्रा. द. सी. पंगु[1]

---

१ प्रा. द. सी. पंगु : शिवकालीन महाकवी सामराज.

यांनी केले आहे. राजदरबारपरिचयाला संस्कृत महाकाव्ये आणि संस्कृत साहित्य-शास्त्र यांचा व्यासंग आणि व्यवहारनिरीक्षण यांची जोड देऊन सामराजाने आपली काव्यशक्ती जोपासलेली आहे. कवित्व आणि पांडित्य यांची सांगड घातल्यामुळे सामराज हाही पंडिती काव्याचा प्रातिनिधिक लेखक झाला आहे.

सामराजाचे प्रारंभीचे काव्य म्हणजे मुद्गलाख्यान हे होय. जैमिनी अश्वमेध, महाभारताचे वनपर्व आणि पद्मपुराण यांचा आधार या काव्याला असला तरी काही प्रसंग आणि काही वर्णने सामराजाने स्वतंत्रपणे योजलेली आहेत. मुद्गलाची दिनचर्या, त्याने केलेल्या तीर्थयात्रा, आरवीक्षेत्र व तपोवन यांचे वर्णन, ईश्वरावतारांचे वर्णन ही सामराजाची स्वतंत्र निर्मिती आहे. यातही संस्कृतमधील सदृश प्रसंगवर्णनाची छाया पडल्यावाचून रहात नाही हे लक्षात घेण्याजोगे आहे. मुद्गल तीर्थयात्रेला निघाल्यावर पशुपक्षी भांबावल्याचे वर्णन शाकुंतलाची आठवण करून देते, तर आरवी क्षेत्राच्या ठिकाणी असणारे पशूंचे निर्वैरत्व बाणभट्टाच्या कादंबरीतील जाबालीच्या आश्रमाची स्मृती जागृत करते. संस्कृत काव्यातील प्रसंगांचा आणि वर्णनांचा आपल्या काव्याच्या सजावटीसाठी उपयोग करण्याची ही हातोटी सामराजाच्या नंतरच्या रचनेत रुक्मिणीहरणात अधिक मोठ्या प्रमाणात आढळते.

सामराजाने आपल्या उतारवयात परमेश्वराकडे लागण्याचा उपाय म्हणून रुक्मिणीहरणासारखी काव्यरचना केली असली तरी आपल्या काव्याच्या सजावटीबद्दल जे उद्‌गार काढले आहेत—

साहित्यस्वारस्य समस्त वेचे । शब्दोदधीचे निवडून वेचे ।

ते पाहिले म्हणजे भक्तीबरोबरच कवित्वविलासाला सामराजाने काव्यरचनेत महत्त्वाचे स्थान दिले आहे हे पटते. रुक्मिणीहरणाची सर्गबद्ध रचना आणि त्यातील प्रसंगयोजना, स्वभावपरिपोष, रसाविष्कार, सृष्टिस्थलवर्णन यांची जवळून ओळख करून घेतली, तर संस्कृतच्या धर्तीवर महाकाव्य रचण्याच्या अभिनिवेशाने सामराजाने रुक्मिणीहरण हे काव्य रचले आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

'रुक्मिणीहरण' या काव्यात सामराजाने सजावटीसाठी रघुवंश, कुमारसंभव नैषध, शिशुपालवध या महाकाव्यांतील वर्णनशैली, प्रसंग, कल्पना यांचा मुक्त

हस्ताने वापर केला आहे. व्यक्तिवर्णन, सृष्टिवर्णन, स्थलवर्णन आणि प्रसंगवर्णन अशा काव्याच्या विविध अंगोपांगांत या चारही महाकाव्यांतील वर्णनांचे बारीकसारीक पडसाद उमटलेले दिसतात. भीमक राजाची प्रजापालनतत्परता, रुक्मिणीच्या मातेचे दोहदलक्षण यांवर रघुवंशाची छाप आहे, तर रुक्मिणीचे रूपवर्णन, बाल्यवर्णन आणि रुक्मीकृत कृष्णनिंदा यांत कुमारसंभवातील पार्वतीवर्णन आणि बटूची शिवनिंदा यांचे पडसाद आढळतात. श्रीकृष्णदर्शनास आलेल्या पौरस्त्रियांची धांदल रघुवंश आणि नैषधीयचरित यांतील सदृश वर्णनांची आठवण करून देते, तर रुक्मिणीविरहवर्णनावर नैषधीयचरितातील चौथ्या सर्गाची दाट छाया पडली आहे. रुक्मिणीहरण सर्ग पाचमधील द्वारकावर्णनावर अशीच शिशुपालवधातील द्वारकावर्णनाची छाया आहे. रुक्मिणीच्या पत्रिकावर्णनातही संस्कृतप्रचुर सामासिक शब्दयोजना करून, परिकर अलंकार साधून सामराजाने आपले साहित्यशास्त्रातील नैपुण्य व्यक्त केले आहे. संस्कृत साहित्य आणि साहित्यशास्त्र यांचा गाढ व्यासंग सामराजाला काव्यरचनेत विशेष उपयुक्त ठरला आहे असे यावरून दिसून येते. संस्कृतमधील वर्णनपद्धती, संकेत, कल्पना आत्मसात करून कवीने त्यांची योजना आपल्या काव्यात केली असल्याने सामराजाचे संस्कृतचे अनुसरण त्याच्या काव्याला पोषकच ठरले आहे.

सामराजाने संस्कृतचे अनुसरण केले आहे—मोठ्या प्रमाणात केले आहे. हे खरे असले तरी स्वतंत्र प्रसंगनिर्मिती आणि स्वभाववर्णनातील नावीन्य साधून स्वतंत्र प्रतिभाही प्रकट केली आहे. रुक्मिणीच्या लग्नाची तयारी, लग्नासाठी चाललेले ब्राह्मण, श्रीकृष्णाचा दरबार ही वर्णने स्वतंत्र असून ती सामराजाच्या भोवतालच्या लोकव्यवहार व राजदरबार यांच्या अवलोकनाची द्योतक आहेत. सुदेवकृत मनास पारमार्थिक बोध, रुक्मिणीच्या आईने कन्येला केलेला व्यावहारिक उपदेश ही स्थलेही स्वतंत्र आहेत. रुक्मिणीने विरहावस्थेत व्याकुळ होऊन श्रीकृष्णाचा व जगदंबेचा केलेला धावा केवळ सांकेतिक वा पारंपारिक नाही. सुदेवाची पत्नी आणि आनंदलतिका व शृंगारलतिका हे रुक्मिणीचे दासीद्वय यांचे वर्णन सामराजाने स्वतंत्रपणे केले आहे. रुक्मिणीच्या स्वभावविशेषात नवी भर घालून सामराजाने असेच स्वतंत्र कर्तृत्व प्रकट केले आहे. रुक्मिणीचे चित्र केवळ विरहिणी म्हणून न काढता सामराजाने तिचे मातृप्रेम,

शालीनता, औदार्य, चातुर्य, समयसूचकता हे विविध विशेष रंगविले आहेत. सुदेवाबरोबर श्रीकृष्णाकडे पत्रिका धाडताना सामराजाची रुक्मिणी त्याला जी सूचना देते.–त्याचे मनीं हा मज ठाव व्हावा, प्रसंग ऐसा बरवा पहावा–ती स्वभावचित्रणात नवा रंग भरणारी आहे. रुक्मिणीचे प्रेम प्रथम शृंगारिक, कामुक होते ते सुदेव श्रीकृष्णाकडून परत आल्यावर त्याच्या दर्शनाने व उपदेशाने भक्तिमय झाले ही विकासदर्शक छटाही उल्लेखनीय आहे. रुक्मिणीच्या मातेच्या चित्रात वात्सल्य हा प्रमुख भाव असला तरी त्याच्याशी संलग्न असे भावतरंग–कन्येच्या लग्नाची काळजी, प्रार्थना–नवस करण्याची तयारी, वियोग-कल्पनेने होणारे दुःख, तिचा श्रीकृष्णाशी विवाह होणार हे समजल्यावर उचंबळलेला आनंद, मातृप्रेमाने प्रेरित होऊन केलेला उपदेश इत्यादी भावतरंग मोहक आहेत. कजाग, लोभी अशी सुदेवाची पत्नी, लग्नाला जमलेले वऱ्हाडी, कलहप्रिय नारद यांचे विनोदी दृष्टीतून सामराजाने वर्णन केले आहे. सुदेवाची भक्तिपरायणता, दौत्यकौशल्य किंवा श्रीकृष्णाचे शौर्य, आतिथ्य, रसिकता, इंगितज्ञता यांचे वर्णन मात्र साधारण दर्जाचे आहे. स्त्रीहृदयाचे वा जीवनाचे चित्रण करण्यात सामराजाचे जितके चातुर्य दिसते तितके येथे दिसत नाही. एकंदरीत सामराजाच्या प्रतिभेची झेप फार मोठी नसली तरी प्रसंगनिर्मिती, स्वभाववर्णन यांत त्याने कौशल्य दाखविले आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

रुक्मिणीहरण हे तंत्रदृष्ट्या महाकाव्य ठरते. त्याचे आठ सर्ग आहेत. चतुर्विध पुरुषार्थाशी संलग्न कृष्णचरित्र हा काव्याचा विषय आहे आणि नायक वीर, उदार, चतुर आहे. महाकाव्यात अपेक्षित असणारी वर्णनेही येथे आहेत. द्वारका, कुंडिनपुरी ही नगरी-वर्णने, चंद्रोदय, प्रभात यांची सृष्टिवर्णने, कृष्णाची मिरवणूक, सुदेव या दूताचे प्रयाण यांची वर्णने या काव्याला महाकाव्याचे रूप देतात. श्रीकृष्ण-रुक्मिणी या मुख्य कथानकाव्यतिरिक्त रुक्मिणीच्या मातापितरांचे वृत्त, सुदेवाचे गृहचित्र, शिशुपालाचे आगमन, वऱ्हाडी मंडळींचे वर्णन अशा विविध गोष्टी काव्याला बहुविधता प्राप्त करून देतात. रुक्मिणीची मदनबाधा, तिचा विलाप, धावा यांतून विप्रलंभ शृंगार रंगविला आहे. याखेरीज वीर, हास्य आणि वत्सल रसांचा आविष्कार काव्यात आहे. १६ गणवृत्तांची काव्यात योजना करून सामराजाने वृत्तवैचित्र्य साधले आहे. श्रीकृष्णजन्मवर्णन, जगदंबास्तवन यांसाठी शिखरिणी; चंद्रोदय, प्रभात यांच्या वर्णनासाठी तसेच

उत्कट मनःस्थितीच्या चित्रणासाठी मालिनी, पृथ्वी; आर्त धाव्यासाठी स्वागता; लग्नतयारीच्या वर्णनासाठी प्रदीर्घ स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित अशी अनुकूल वृत्ते वापरण्यात सामराजाची योजकता दिसून येते. एकंदरीत महाकाव्याची बरीच लक्षणे रुक्मिणीहरण या काव्याला लागू पडत असल्याने संस्कृतच्या धर्तीवर रचलेले ते महाकाव्य म्हणावे लागेल. तंत्रदृष्ट्या रुक्मिणीहरण हे महाकाव्य ठरले तरी सामराजाला मात्र महाकवी ही पदवी देता येत नाही. कारण महाकवीची उज्ज्वल प्रतिभा, त्याचा द्रष्टेपणा सामराजाजवळ नाही. जुन्या कथेला नवा गंभीर आशय प्राप्त करून देण्याचे सामर्थ्यही ' रुक्मिणीहरण ' या काव्यात अभावानेच दिसते. याचे एकच उदाहरण पहावे. सामराजाने रुक्मिणीच्या मातेच्या तोंडी मुलीला जो उपदेश घातला आहे तो साध्या, सामान्य मुलीला साजेसा आहे. जी क्षत्रियकन्या पुढे महाराणीपद भूषविणार तिच्या उंच पातळीवर जाण्याचे कवीला साधलेले नाही. आपल्या साधारण दर्जाच्या प्रतिभेच्या साहाय्याने संस्कृतचे अनुसरण करून तंत्रदृष्ट्या बरेचसे यशस्वी महाकाव्य निर्माण करण्याचे मात्र सामराजाने साधले आहे.

## विठ्ठल ( इ. स. १६२८ – १६९० )

सामराजाचा समकालीन असा पंडित कवी म्हणजे विठ्ठल हा होय. सामराजापेक्षाही याचा पांडित्यावर अधिक भर होता. विठ्ठलाची जगद्वंद्य कवीची कल्पना पाहिली म्हणजे व्युत्पत्ती वा पांडित्य याचे काव्यरचनेत मोठे महत्त्व त्याने मानले आहे असे दिसून येते. संस्कृतमधील छंदःशास्त्र, कोष, काव्य, नाटके, व्याकरण यांचा सखोल अभ्यास ज्याने केला आहे तोच कवी जगद्वंद्य होतो असे विठ्ठलाने म्हटले आहे ( विद्वज्जीवन उल्लास १–१२ ) आपले काव्य व्युत्पन्नांसाठी आहे असेही तो म्हणतो –

' श्लोकाची रसवृत्तिशुद्ध रचना वित्पन्न ते जाणती ! ' ( रु. स्व. १·६१ ) विठ्ठलाने आपले साहित्यशास्त्राचे ज्ञान आपल्या काव्यातून अभिव्यक्त केले आहे. किंबहुना आपले छंदःशास्त्रनैपुण्य प्रकट करणे, चित्रकाव्य-रचना-कौशल्याचा आविष्कार करणे हीच त्याच्या काव्यामागील प्रमुख प्रेरणा म्हणावी लागेल. कवित्वापेक्षा पांडित्याला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती आणि मुळातच वेताची

असलेली कवित्वशक्ती यांमुळे विठ्ठलाच्या काव्याचा दर्जा खालावलेला आहे यात आश्चर्य नाही.

विठ्ठलाने सीतास्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर आणि विद्वज्जीवन ही काव्ये महाकाव्याच्या धर्तीवर रचली आहेत. सीतास्वयंवराचे सात सर्ग असून श्लोकसंख्या ३६३ आहे. सीतास्वयंवरात हनुमन्नाटकाचा अर्थानुवाद[1] बऱ्याच श्लोकांबाबत विठ्ठलाने केला आहे. रघुवंशाचीही पुसट छटा काही ठिकाणी आढळते. स्वतंत्र रचनेपेक्षा अनुवाद आणि अनुकरण यांवरच विठ्ठलाची भिस्त आहे. रुक्मिणीस्वयंवराचे सात सर्ग असून ३५३ श्लोक आहेत. यात विविध वृत्तांत पद्यरचना करून वृत्तनाम गोवण्याचा खटाटोप विठ्ठलाने केला आहे. संस्कृतच्या धर्तीवर येथे अष्टदलकमलबंध, द्वादशदलकमलबंध, चामरबंध, मालाबंध, धनुर्बाणबंध इ. अनेक बंध साधले आहेत. शिशुपालवध सर्ग १९ व किरातार्जुनीय सर्ग १५ यांत असे काही बंध आहेत त्यांचे अनुकरण विठ्ठलाने केले आहे. परंतु विठ्ठलाजवळ भाषाप्रभुत्व नसल्याने वृत्तनाम गुंफण्यास वा बंध साधण्यास अनेक कोलांटउड्या त्याने घेतल्या आहेत. ही कष्टसाध्य बंधरचना कवित्वाचा आविष्कार करीत नसून विद्वत्तेचा, पांडित्याचा आविष्कार करीत आहे. साहित्यशास्त्रीय ज्ञानाचे प्रदर्शन येथे आहे. रुक्मिणीस्वयंवरात विठ्ठलाने एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवराचे अनुकरण करून धेंडा नाचविणे, कानपिळा यांचे वर्णन केले आहे. या दोन्ही स्वयंवरकाव्यांत विठ्ठलाजवळ पांडित्य होते पण कवित्व जवळजवळ नव्हतेच हे स्पष्टपणे जाणवते.

'विद्वज्जीवन' या काव्यात तर याचा तीव्र प्रत्यय येतो. याचे सात उल्लास व २६५ श्लोक असून हे काव्य विद्वानांच्या मनोरंजनासाठीच केवळ रचले असल्याचा निर्देश यात आहे.

'विद्वज्जीवन ससमोत्सवकथा विद्वज्जनीं वाचिजे।'

कृष्णाच्या बाललीला, राधाकृष्णप्रेम, रासक्रीडा या भागवतातील कथांच्या आधारे ही रचना केली आहे. परंतु येथे काव्यसौंदर्य मुळीच नाही. महाराष्ट्र

---

१. डॉ. के. ना. वाटवे : प्राचीन मराठी पंडिती काव्य पृष्ठ १०७.

सारस्वतकार भावे[1] म्हणतात, हा ग्रंथ म्हणजे कल्पनांचा व श्लोकांचा एक मोठा ढिगारा आहे; पण हें काव्य नाही." राधिकेच्या वर्णनात तर विठ्ठलाने हीन अभिरुची प्रकट केली आहे. वृत्ते, अलंकार यांची लयलूट असून सुद्धा या काव्यात सर्वत्र " ठणठणीत वाळवंटे " आहेत असे म्हणण्याची पाळी रसिकांवर यावी यावरूनच विठ्ठलाचे कवित्व कोणत्या दर्जाचे होते हे उघड होते.

या तीन काव्यांखेरीज द्रौपदीवस्त्रहरण, पांचालीस्तवन ही काव्ये विठ्ठलाने रचली आहेत. बिल्हणाच्या चोरपंचाशिकेचे सुश्लिष्ट भाषांतर " बिल्हणचरित्र " या नावाने विठ्ठलाने केले आहे. येथे सर्वत्र एकच वसंततिलका वृत्त वापरले असून रचना सुगम आहे, यामुळे सारस्वतकार भाव्यांनी[2] या काव्याच्या कर्तृत्वाबद्दल संशय व्यक्त केला आहे. चौदाव्या शतकात होऊन गेलेल्या संस्कृत रसमंजिरी या साहित्यशास्त्रीय ग्रंथाचे विठ्ठलाने मराठीत भाषांतर केले आहे. नायिकांची शृंगाररसप्रधान वर्णने असलेल्या या ग्रंथाचे भाषांतर करण्यात विठ्ठलाच्या साहित्यशास्त्रीय अभ्यासाबरोबर शृंगाराकडील ओढाही अभिव्यक्त झाला आहे.

थोडक्यात म्हणजे विठ्ठलाच्या काव्यकल्पनेप्रमाणे त्याच्या काव्यात पांडित्याला प्राधान्य मिळाले आहे. भावना आणि कल्पना ह्या दोन्हींचा अभाव त्याच्या काव्यात आहे. प्रसंग व घटना यांच्या वर्णनाबाबत तटस्थ व वस्तुनिष्ठ दृष्टी ठेवल्याने विठ्ठलाची वर्णने नीरस, निर्जीव होतात. रामाने केलेला अहिल्येचा उद्धार, रामाचे सीतेला झालेले पहिले दर्शन, शिवधनुर्भंगाच्या प्रसंगी सीतेची झालेली दोलायमान अवस्था यांच्या विठ्ठलाने केलेल्या वर्णनात उत्कटतेचा अंशही सापडत नाही. प्रसंगाशी, व्यक्तीशी समरस न होता सांकेतिक वर्णने करण्यावर विठ्ठल भागवितो. अनुवाद, अनुकरण करतानाही मुळातले काव्यसौंदर्य त्याला आपल्या श्लोकांत उतरवता येत नाही याची उदाहरणे सीतास्वयंवरात पुष्कळ आहेत. व्यक्तीच्या अंतरंगाचे राहोच, पण बहिरंगाचे वर्णनही ठराविक अवयव, अलंकार यांच्या उल्लेखापलीकडे जात नाही. हे पाहिल्यावर विठ्ठलाजवळ प्रतिभा

---

१. महाराष्ट्र सारस्वत ( आ. ५ ) पृ. ३८०.

२. कित्ता पृ. ३८४.

नव्हती असेच म्हणावे लागते. त्यातच संस्कृतमध्ये कनिष्ठ मानल्या गेलेल्या चित्रकाव्याचा अवलंब केल्याने आणि विविध वृत्ते वापरण्याचा हव्यास धरला, तरी वृत्तप्रभुत्व व भाषाप्रभुत्व नसल्याने, संस्कृत महाकवींच्या अनुकरणाने विठ्ठलाची काव्यश्रीमंती उघड होण्याऐवजी काव्यदारिद्र्यच त्याच्या रचनेत उघडे पडले आहे. संस्कृतमधील विविध वृत्ते मराठीत आणण्याचा सपाटा विठ्ठलाने दाखविला खरा; पण शब्दांची ओढाताण, व्याकरणदृष्ट्या शिथिल रचना, अनावश्यक आणि निरर्थक शब्दांची योजना करणे व आवश्यक शब्द अध्याहृत ठेवणे असे दोष असल्यामुळे ही रचना काव्यदृष्ट्या अपकर्षकच ठरली.

## निरंजनमाधव ( इ. स. १७०२–१७७२ )

निरंजनमाधव हा पेशवाई-कालातील कवी होय. हा राजकारणकुशल होता. तंजावरला काही काल पेशव्यांचा वकील म्हणून त्याने काम केले. राजकारणी असूनही निरंजनमाधव परमार्थप्रवण आणि रसिक पंडित होता. सर्व दर्शनातील मतांचा संग्रह करणाऱ्या उदार निरंजन संप्रदायाचा पुरस्कार त्याने केला. भक्ती आणि रसिकता यांचा समन्वय साधून कलाकुसरीची काव्यरचनाही त्याने केली. निरंजनमाधवाच्या काव्यरचनेची प्रेरणा भक्तीबरोबरच कवित्वविलास दाखविणे ही होती, प्रभुगुणसंकीर्तनाबरोबरच विदग्ध काव्य निर्माण करण्याची होती हे त्याच्या उद्‌गारांवरून जाणवते. देवाला वहायची ही " सुश्लोककमळे " आहेत, " सद्रत्नहारावली " आहे असे कवी म्हणतो. आपल्या कवित्वाचा आविष्कार कसा होत आहे याचेही कवीने वर्णन केले आहे. " शृंगार मुख्य नवही रस मूर्तिमंत " किंवा " रसालंकारांची अतिखरस वाणी विलसली " या वचनांतून कवित्वाचा जाणीवपूर्वक विलास निरंजनमाधवाने प्रकट केला आहे याची ग्वाही मिळते. पंडिती काव्याची कवित्वविलासाची प्रेरणा मोठ्या प्रमाणात निरंजन-माधवाच्या रचनेमागे असल्याने त्याची काव्यरचना सर्वार्थाने पंडिती काव्याची प्रातिनिधिक अशी झाली आहे. तसेच निरंजनमाधवाची कवित्वशक्ती वरच्या दर्जाची असल्याने त्याच्या काव्याचा दर्जा उंचावला आहे हेही नमूद केले पाहिजे.

निरंजनमाधवाने " ज्ञानेश्वरविजय " हे १७ अध्यायांचे काव्य नामदेवाच्या आदी आणि समाधी या दोन प्रकरणांतील अभंगांवर रचले आहे. कवीने याला

अनुक्रम ७४०२२ दि: ...
ग्रंथांक ७१८७५ नोंद दि: ६।३।७१



महाकाव्य म्हटले आहे; परंतु त्याचे धोरण प्रामुख्याने कथाकथनाचेच दिसते. काही ठिकाणी रसोत्पत्ती चांगली असली तरी महाकाव्याचे इतर विशेष यात आढळत नाहीत. संतांच्या अभंगांच्या आधारे व संतचरित्रावर लिहिलेले काव्य हेच ज्ञानेश्वरविजयाचे वैशिष्ट्य आहे. निरंजनमाधवाने " चिद्बोध रामायण " हे रामकथेवरील महाकाव्य लिहावयास घेतले होते. त्यापैकी बालकांड तेवढे उपलब्ध आहे. बालकांडाचे सात सर्ग व भिन्न भिन्न वृत्तांतील ४२२ श्लोक आहेत. येथे रामायणाचा आधार घेतला असून मूळ प्रसंग खुलवले आहेत. हनुमन्नाटक, रघुवंश यातील काही कल्पनांची छाया शिवधनुर्भंग, राम-परशराम संघर्ष या प्रसंगीच्या वर्णनावर पडली आहे. चिद्बोध रामायणाची श्लोकरचना अत्यंत प्रौढ व सरस असून महाकाव्याला शोभणारी आहे. ज्ञानेश्वरविजय व चिद्बोध-रामायण ह्या दोन्हीत भिन्न वृत्तांची योजना निरंजनमाधवाने केली आहे. संस्कृत महाकाव्याच्या धर्तीवरची ही रचना आहे. निरंजनमाधवाने महाकाव्याच्या अंतरंगाचेही अनुसरण केले आहे, ते मात्र " सुभद्राचंपू " या चंपूकाव्यात. निरंजनमाधवाने रचलेल्या स्फुट प्रकरणांचा व स्तोत्रांचा प्रथम परामर्श घेऊन शेवटी त्याच्या या चंपूकाव्याकडे वळू.

यतिनृपतिसंवाद, वसिष्ठसुशर्मासंवाद, भार्गवजन्माख्यान, अद्वैतबोध अशी स्फुट प्रकरणे निरंजनमाधवाने रचली आहेत. यतिनृपतिसंवाद हे अनुवादात्मक प्रकरण आहे. निःस्पृह संन्यासी व वैभवसंपन्न राजा यांच्यातील हा संवाद असून भर्तृहरीच्या वैराग्यशतकातील काही श्लोकांचा अनुवाद येथे आहे. स्फुट प्रकरणापेक्षा निरंजनमाधवाची स्तोत्रे अधिक प्रसिद्ध आहेत. पंडिती काव्याचा उत्तम नमुना म्हणून यांचा निर्देश करता येतो. पंचमहाकाव्यातील स्तोत्रांचे अनुकरण करून निरंजनमाधवाने ही स्तोत्रे रचली आहेत. पंचमहा-काव्यातील स्तोत्रांत ज्याप्रमाणे परमेश्वरभक्तीबरोबर काव्यसौंदर्याचा आविष्कार केलेला असतो, त्याप्रमाणे निरंजनमाधवानेही आपल्या स्तोत्रात भक्ती आणि कलाकुसर यांचे संमिश्रण साधले आहे. एवढेच नव्हे, तर अभिजात संस्कृतमधील कल्पनापद्धती आणि अलंकारयोजना ही त्याने आत्मसात केली आहेत, याचे प्रत्यंतर त्याच्या " रामकर्णामृत " या स्तोत्रात येते. " मंत्ररामचरित " या स्तोत्रात निरंजनमाधवाने " श्रीराम जयराम जय जय राम " हा मंत्र साधला आहे. " निर्वोष्ठ राघवचरित " यासारखी चित्रकाव्यरचना मोरोपंतांना चित्र-

रामायणाच्या रचनेबाबत प्रेरक झाली असावी. साकल्याने पाहता निरंजनमाधवाची ही स्तोत्ररचना भावनेपेक्षा कल्पकता आणि विदग्धता यांनाच अधिक प्राधान्य देते. अलंकारिक वर्णनातून येथे कल्पनाचातुर्य प्रकट होते; परंतु जिव्हाळा, उत्कटता यांचा येथे अभावच जाणवतो. "सांबशिवस्तुतिध्यान" या स्तोत्राच्या शेवटी कवी स्वतःला "पंडित निरंजन" म्हणवितो. ही भूमिकाच स्तोत्रात प्रभावी ठरली आहे.

निरंजनमाधवाच्या कवित्वाचा मनोहर आविष्कार पहावयाचा असेल तर त्याच्या "सुभद्राचंपू" या महाकाव्याकडे वळावे लागेल. चंपू हा संस्कृतमधील एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार असून तो गद्यपद्यमिश्रित असतो. 'गद्यपद्यमयं काव्यं चंपूरित्यमिधीयते' असे साहित्यदर्पणकार म्हणतात. मराठी वाङ्मयात निरंजन-माधवाचा एकुलता एक चंपू आहे. याच्या सात विभागांना कवी सर्ग म्हणतो. यातील गद्यविभागाला चूर्णिका म्हटले आहे व बाकीचे ३७९ श्लोक भिन्न वृत्तांत आले आहेत. महाकाव्याच्या धर्तीवर याचे अंतरंग कवीने सजविले आहे. अर्जुन आणि सुभद्रा यांच्या विवाहाची कथा या काव्यात आली असून मूळ पुराणकथेवर कवीने भावरम्यता व नाट्यात्मकता यांचा साज चढविला आहे. सुभद्रा, अर्जुन, बलराम आणि श्रीकृष्ण यांच्या परस्परसंबंधातून जे नाट्य निर्माण होते, ते निरंजनमाधवाने त्यांच्या व्यक्तिरेखा खुलवून विशेषच रसपूर्ण बठविले आहे. सुभद्रेची एकनिष्ठ प्रीती, अर्जुनालाच वरण्याचा तिचा दृढ निर्धार आणि यतिवेषात अर्जुनाने दुर्योधनाची स्तुती करून व स्वतःची निंदा करून तिची पाहिलेली परीक्षा यातील नाट्य वेधक आहे. कुमारसंभवाच्या पाचव्या सर्गात बटुवेषधारी शंकराने पार्वतीच्या मनाची परीक्षा घेतली आहे त्याची छाप या प्रसंगावर आहे. सुभद्रेचा "अर्जुनविना नेच्छी कदां मीं पती" हा निर्धार आणि 'प्राणत्यागानंतरही शरीरातील पंचमहाभूते अर्जुनाचीच सेवा करतील' ही तिने प्रकट केलेली निष्ठा यांच्या अभिव्यक्तीत निरंजनमाधवाने केवळ अनुसरण वा केवळ सांकेतिकता दाखविली नाही, तर त्यांच्याशी स्वतंत्र कल्पनेची सांगड घातली आहे.

नाट्यमय प्रसंगवर्णन, स्वभाववर्णन आणि सृष्टिवर्णन या सर्वच बाबतींत निरंजनमाधवाचे सांकेतिकतेशी स्वतंत्र कल्पनेची सांगड घालण्याचे कौशल्य

दिसून येते. अर्जुनाचे शौर्य व श्रीकृष्णभक्ती, बलरामाचा साधाभोळा स्वभाव, कृष्णाचा नाटकीपणा यांचे निरंजनमाधवाने चांगले चित्रण केले आहे. सृष्टि-वर्णनात निसर्गाला मानवरूप देण्याचा प्रकार हे केवळ अर्वाचीन कवींचे वैशिष्ट्य नाही, तर पंडितकवींबाबतही हा प्रकार आढळतो हे निरंजनमाधवाने या काव्यात रैवतकवर्णन करताना जो 'तरुवेलींचा विलास' वर्णिला आहे त्यावरून दिसते. सहाव्या सर्गातील शरद ऋतूचे वर्णन (आला शरत् साजिरा) निरंजन-माधवाच्या सौंदर्यदृष्टीचे द्योतक आहे. सुभद्राचंपूमध्ये "चूर्णिका" म्हणून जे गद्य येते तेही तालबद्ध, पद्याकडे झुकणारे आहे. त्यातील संस्कृतप्राचुर्य आणि संस्कृत घाटणीवरचे वर्णन पाहिले म्हणजे अभिजात संस्कृताची फार मोठी पकड निरंजनमाधवावर होती हे स्पष्टपणे जाणवते. अभिजात संस्कृत साहित्याच्या व्यासंगाला स्वतःच्या कल्पनाशक्तीची जोड देऊन निरंजनमाधवाने उत्तम प्रकारचे पंडिती काव्य निर्माण केले आहे. गुणवत्तेच्या दृष्टीने पाहता सामराज, नागेश, विठ्ठल यांच्यापेक्षा निरंजनमाधव वरच्या दर्जाचा कवी ठरतो. 'सुभद्राचंपू' हा चंपू तर प्राचीन मराठी पंडिती काव्यात काव्यसौंदर्य, नाट्य, महाकाव्यसदृश वर्णनपद्धती यांमुळे आगळाच ठरेल.

## मोरोपंत (इ. स. १७२९-१७९४)

प्राचीन मराठी पंडित कवींच्या मालिकेतील शेवटचा कवी म्हणजे मोरोपंत हा होय. मोरोपंत पराडकर बारामतीच्या बाबूजी नाइकांचे आश्रित पुराणिक होते. पुराण सांगितल्यावर उरलेल्या वेळात कविता करणे हा त्यांचा छंद होता. काव्यरचनेतही मोरोपंतांच्या पुराणिकाच्या भूमिकेचा मोठा प्रभाव पडला आहे. कुटुंबवत्सलांसाठी, सामान्य जनांसाठी केलेली सद्‌भावपोषक रचना असे तिचे थोडक्यात वर्णन करता येईल. मोरोपंतांची एकंदर कविता पाऊण लाख आहे. आर्यावृत्तात त्यांनी बरीचशी रचना केली असून भिन्न गणवृत्तांचा वापरही काही काव्यांत केला आहे. महाभारत, रामायण आणि भागवत हे मोरोपंतांच्या काव्याचे मुख्य आधार असून जैमिनी अश्वमेध, स्कंधपुराण, मार्कंडेयपुराण, हरिवंश इत्यादींच्या आधारे त्यांनी काही प्रकरणे रचली आहेत. ईश्वराची कीर्तन, स्मरण-रूपी भक्ती करावी ही प्रेरणा पंतांच्या काव्यरचनेमागे आहे. इतर पंडितकवींपेक्षा त्यांची भक्तिप्रवणता अधिक आहे. "वाटे चरित्र त्यांचे काही आपण तरावया

गावे " ही त्यांची काव्यदृष्टी आहे. पण याबरोबरच साहित्यगुणांनी मंडित अशी कविता करावी, परमेश्वरप्रसादाबरोबरच रसिकजनांचा संतोषही साधावा ही त्यांची भूमिका असल्याचे त्यांच्याच शब्दांवरून उघड होते. हरिवंशाच्या प्रारंभी ते म्हणतात..." कथा लिहिन रसिकसाधुरंजनप्रवण " – तर आर्याभारतात श्रोत्यांना सांगतात " भारतेतिहासरस पाजीन अमृतरसाहूनि सरस " आपल्या काव्यामुळे " रसिक, कवी, परमसज्जन भगवद्भक्त प्रसन्न होतील " असे त्यांना वाटते, याचे कारण हेच आहे की, भक्ती आणि कवित्व यांचा मिलाफ आपल्या रचनेत झाला आहे, याचा आत्मविश्वास मोरोपंतांना होता.

मोरोपंतांचे लक्षणीय असे पंडिती काव्य म्हणजे कुशलवोपाख्यान हे आहे. जैमिनी अश्वमेधातील अध्याय २५ ते ३६ यांवर हे आख्यान रचलेले आहे. याचे १३ अध्याय असून श्लोकसंख्या हजारावर आहे. मोरोपंतांची ही प्रारंभीची रचना असून संस्कृत अध्ययनाचा – विशेषतः पंचमहाकाव्यांचा – संस्कार या काव्याबाबत जाणवतो. संस्कृत शब्दयोजना, दीर्घ समास, अलंकारप्राचुर्य हे विशेष येथे आढळतात. सीतेचे दोहदलक्षण, सीतेने लक्ष्मणाकरवी रामास पाठविलेला निरोप, असहाय सीतेस वनात वाल्मीकिने दिलेले आश्वासन इ. ठिकाणी वर्णनासाठी रघुवंशाचा उपयोग मोरोपंतांनी केला आहे. सीतात्याग, सीतेचा वनात शोक हे प्रसंग करुणरमणीय आहेत; पण एकंदरीत कवीची प्रवृत्ती भावनेपेक्षा कल्पनेला, रसापेक्षा अलंकारांना प्राधान्य देण्याचीच आहे. त्यातही संस्कृत संकेतांची कोंडी फारशी फोडलेली नाही. मोरोपंतांचे अलंकारज्ञान, वृत्तशास्त्राचा व्यासंग, शब्दप्रभुत्व येथे असले तरी संस्कृतप्रचुर, समासघटित, क्लिष्ट भाषेमुळे येथे प्रसादगुणाची हानी झालेली आहे. मोरोपंतांच्या कवित्वाच्या विकासाचा प्रत्यय यापुढील रचनेत विशेषतः आर्याभारतात येतो. केवळ अनुवादावर भिस्त न ठेवता संपक्षेविस्तारकौशल्य आणि कथा सजविण्यास लागणारी कवित्वशक्ती यांच्या साह्याने मोरोपंतांनी आर्याभारतात यशाचा मोठा पल्ला गाठला.

मोरोपंतांच्या कीर्तिमंदिराचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे आर्याभारत हे होय. मूळ भारत संक्षेपाने सांगणे हा येथे कवीचा हेतू आहे. महाभारतातील सुटा कथाभाग घेऊन त्यावर पांडित्य, कलात्मकता यांचे संस्कार करणे आणि व्यक्तिमत्त्वाचा, कालाचा ठसा उमटविणे ही विदग्ध महाकाव्याची प्रक्रिया येथे

नसल्याने हे विदग्ध महाकाव्य नाही, तर ही विदग्ध आख्यानकविता आहे. औचित्य आणि रसिकता यांच्या साहाय्याने येथे संक्षेपविस्ताराची योजना मोरोपंतांनी केली आहे. यक्षप्रश्न, कृष्णगीता, भीष्मगीता इत्यादी नीत्युपदेशाचे प्रसंग त्यांनी गाळले आहेत आणि रंजक कथांवर भर दिला आहे. मार्मिक संवाद आणि रसपरिपोष याच्या जोडीला अलंकारांची लयलूट यामुळे आर्याभारतातील पुष्कळ स्थले रमणीय वठली आहेत. कर्णशल्यसंवाद, कृष्णकर्णसंवाद हे मार्मिक संवादाचे नमुने आहेत. शकुंतला, ययाती यांच्या आख्यानांत आलेला शृंगाररस, अभिमन्यूचा पराक्रम (द्रोणपर्व), भीमाने दुःशासनाचा केलेला वध (कर्णपर्व) यांत आलेला वीररस आणि अभिमन्यूच्या मृत्यूनंतर अर्जुन, सुभद्रा, व उत्तरा यांनी केलेला विलाप किंवा द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसंगी द्रौपदीने केलेला धावा या ठिकाणी आळवलेला करुण रस मोरोपंतांच्या कवित्वशक्तीचा प्रत्यय आणून देतो. समर्पक अलंकारयोजना करून प्रसंगवर्णनाची खुमारी वाढवण्यातही मोरोपंत वाकबगार आहेत. शकुंतलेला दुष्यंत "मद्भार्या हो" असे म्हणाला त्यावरचे शकुंतलेचे अलंकारिक प्रत्युत्तर पाहाण्यासारखे आहे.

**हांसुनि तीही म्हणे "हो प्रार्थावें प्रणतपारिजातातें।**
**देवा! स्वयें वहावें या निजकारुण्यवारिजा तातें॥** (आदिपर्व १२·३९)

दुष्यंताने वत्सल कण्वतातांजवळ शकुंतलेला मागणी घालावी हे शकुंतलेचे मनोगत हृदयंगम पद्धतीने या आर्येत व्यक्त झाले आहे. त्यात कण्व व शकुंतला या दोघांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारी अलंकारयोजना विशेष साह्यकारी ठरली आहे. रामाने सेतू बांधला त्या सेतूवर मोरोपंतांनी ज्या विविध उत्प्रेक्षा केल्या आहेत त्याही अशाच काव्यमय आहेत–

**सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली वृकें जशी एणी**
**त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी ॥** (वनपर्व १२९·१०)

या आर्येतील अपन्हुती, उपमा, स्वभावोक्ती यांचा संगम बहारीचा आहे. मोरोपंतांचे अर्थांतरन्यास, 'हांसत कर्म करावे भोगावे रडत तेंचि परिणामी' किंवा 'फारच बरी निरयगति परवशता शतगुणे करी जाच' यासारखे सुभाषितरूप आर्यार्धे लोकप्रिय आहेत. परंतु यमकासाठी आलेले काव्यहीन, नीरस,

आर्यार्ध, सौंदर्यहीन अलंकार आणि क्लिष्ट, दुर्बोध, संस्कृत शब्दयोजना यांमुळे मोरोपंतांच्या काव्याची हानी होते हेही लक्षात घेतले पाहिजे.

भागवताच्या दशमस्कंधावर कृष्णविजय किंवा बृहद्दशम हे काव्य मोरोपंतांनी रचले आहे. याचे ९० अध्याय असून अध्याय ५४–७९ हे विविध वृत्तांत रचले आहेत. पण साध्या कथाकथनापलीकडे येथे पंतांनी विशेष काही केले नाही. पूर्वार्ध नारिकेलपाक आहे, तर उत्तरार्धात थोडाफार रसपाक पहावयास मिळतो. मंत्रभागवत, हरिवंश ही मोरोपंतांची रचना साधारण दर्जाची आहे. मंत्ररामायण आणि इतर चित्ररामायणे यांत तर मोरोपंतांनी काव्यापेक्षा कसरतीवरच भर दिला आहे. सीतेने वनवासातील चौदा वर्षांचे सांगितलेले आत्मवृत्त सीतारामायणात आहे पण ते सुद्धा या कसरतीमुळे फिके पडले आहे; पंतांच्या उत्तरकालीन रचनेत स्तोत्ररचना सरस आहे, विशेषतः केकावली त्यांची काव्यरूप भक्ती आल्हाददायक रीतीने व्यक्त करते.

श्लोक-केकावलीत भावपूर्ण भक्ती आणि अलंकारपूर्ण काव्य ह्या दोन्हींचा समन्वय पंतांनी चांगला साधला आहे. " कृतांतकटकामलध्वज जरा दिसों लागली " अशा समयी ही रचना केली असल्याने त्यात एक प्रकारची आर्तता आली आहे. भक्तीचे विविध तरंग-करुणा, धिटाई, निर्भर्त्सना, विश्वास, समाधान इत्यादी या ठिकाणी रंगभरणी करतात. भावसौंदर्याला पोषक असा कल्पनाविलासही या काव्यात आहे. कविताकन्यकेचे वर्णन ( श्लोक ३२ ). कथा-सुरभी यांची तुलना ( श्लोक ५८ ), किंवा कथा-मोहिनी तुलना ( श्लोक १०३ ) हे श्लोक नमुन्या दाखल सांगितले तरी पुरे. येथे कवीने केलेली परमेश्वरस्तुती पौराणिक थाटाची नसून तिच्यात अभिजात संस्कृतचे मनोहारित्व आहे. प्रसंगानुसार भगवंताच्या लीलांचा, कथांचा निर्देश करून कौटुंबिक भावनांचे दृष्टान्त देऊन, व्यावहारिक अनुभवातून निघालेले अर्थान्तरन्यास चपखल योजून मोरोपंतांनी श्लोककेकावलीची खुमारी वाढविली आहे. भगवंताने आपला उद्धार करावा, कृपाप्रसादाचा वर्षाव करावा यासाठी जी युक्तिवादांची मालिका पंतांनी योजली आहे, ज्या कोटिक्रमाची योजना केली आहे त्यातही त्यांचे कौशल्य दिसते. अनुनय, दटावणी, आळवणी स्वपक्ष-समर्थन, शंकांना उत्तरे देणे इ. सर्व प्रकारांचा अवलंब मोरोपंत करतात. थोडक्यात म्हणजे मोरोपंतांची वृत्ती आणि त्यांचे रचनाचातुर्य, त्यांची भक्ती

आणि त्यांचे कवित्व, बुद्धी आणि भावना यांचा संगम केकावलीत झाल्यामुळे डौलदार पृथ्वी वृत्तातील या १२१ केका रसिकहृदयाला मोह घालण्यास समर्थ झाल्या आहेत. अर्थात या ठिकाणीही मोरोपंतांचा संस्कृतीकरणाचा हव्यास, (पृथुकतंदुलप्रसृति, कृतमंतु अशी क्लिष्ट शब्दयोजना) दीर्घ समास (अति-दुःसहस्वगदशत्रु, कृतांतकटकामलध्वजजरा, इंदिराबृहदुरोजसंगा इ.) यमकानुप्रासासाठी आलेले नीरस, सौंदर्यहीन अलंकार रसभंगाला कारणीभूत होतात हे नाकारण्यात अर्थ नाही. परंतु इतर काव्यांच्या मानाने केकावलीत हे दोष कमी प्रमाणात आढळतात हे एक आणि दुसरे म्हणजे पंतांची भक्तिभावाने, आर्ततेने रंगलेली अशी ही रचना असल्याने तिला पंडिती काव्यात मानाचे स्थान दिले पाहिजे.

मोरोपंत हे पंडिती कवींपैकी शेवटचे कवी होत. संस्कृत वाङ्मयाचा आधार घेऊन, अभिजात संस्कृतच्या धर्तीवर काव्यरचना करणारे, संस्कृत पंचमहाकाव्यांचा संस्कार ज्यांच्यावर स्पष्टपणे जाणवतो असे हे अखेरचे पंडित कवी. संस्कृत वाङ्मयाचे वेगवेगळे पैलू मराठीत आणण्याची खटपट करणे, मराठी भाषेला संस्कृतचे प्रौढ वळण देण्याचा आग्रह धरणे, संस्कृतच्या धर्तीवर वृत्तालंकारांची योजना करणे वा वर्णनपद्धती अवलंबिणे या पंडित कवींच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी प्राचीन मराठीत मोरोपंतांनंतर फारशा पहावयास मिळत नाहीत. पंडित कवींच्या मालिकेतील या शेवटच्या कवीच्या काव्यरचनेत पंडिती काव्याचे गुणदोष प्रकर्षाने प्रकट झाले आहेत. जेथे काव्यात भावना आणि कल्पना यांना प्राधान्य मिळाले तेथे काव्य आल्हाददायक झाले, अन्यथा जेथे पांडित्य वरचढ ठरले तेथे काव्याला कसरतीचे रूप आले.

## उपसंहार

पंडिती काव्य हे अभिजात संस्कृत साहित्याचे पुनरुज्जीवन आहे असे प्रारंभी म्हटले होते त्याची साक्ष पंडित कवींनी केलेल्या काव्यरचनेची पाहणी करीत असताना वरचेवर पटली. अभिजात संस्कृत साहित्यातील विविध विशेष आत्मसात करून पंडित कवींनी काव्याच्या अंगोपांगांत त्यांचा उपयोग सजावटीसाठी केला याचाही प्रत्यय आला. आपली प्रतिभा व कल्पनाशक्ती यांचा वापर

स्वतंत्रपणे फारसा न करता संस्कृतच्या अनुसरणाचेच कार्य पंडित कवींनी आपापल्या कुवतीनुसार साधले आहे. मग साहजिकच प्रश्न डोळ्यांपुढे येतो तो म्हणजे पंडित कवींनी नवनिर्मिती केली आहे का? अगदी बारीकसारीक बाबतींत अनुसरण आणि अनुकरण यांचा मार्ग पत्करल्याने आधीच साधारण दर्जाची प्रतिभा असलेल्या पंडित कवींची कल्पनाशक्ती जखडली गेली, सांकेतिक कल्पना-क्षेत्रातच ती घुटमळू लागली. जेव्हा पंडित कवींना संस्कृतमधील सौंदर्य आत्मसात करून, मुरवून नव्याने मांडता आले तेव्हा पंडिती काव्य सुबक झाले; पण जेव्हा हे साधले नाही तेव्हा संस्कृतचे अनुसरण तापदायकच ठरले. वामनपंडिताचे 'द्वारकाविजय', विठ्ठलाचे 'सीतास्वयंवर' ही काव्ये नमुन्यादाखल पहावी. आणखी एका काव्यहानिकारक गोष्टीची भर यात पडली; ती म्हणजे पंडित कवींनी शब्दार्थांची जोडी फोडली आणि अर्थापेक्षा शब्दाला अधिक महत्त्व दिले. यामुळे पंडिती काव्यात रसपरिपोषाकडे दुर्लक्ष झाले, शब्दचमत्कृतीला प्रधान स्थान लाभले. यमकानुप्रासांचा हव्यास, चित्रकाव्यातील चमत्कृतीचे आकर्षण यांच्या आहारी पंडित कवी गेले तेव्हा कलाकुसरीच्या जागी कारागिरीचे दर्शन होऊ लागले यात आश्चर्य नाही. वामनपंडित आणि मोरोपंत यांचा यमकाचा हव्यास प्रसिद्धच आहे. रघुनाथपंडितही श्रीहर्षाच्या धर्तीवर श्लेषाची ओढून-ताणून योजना करताना दिसतो. विठ्ठलाने बंधरचनेची केलेली खटपट तर संस्कृत साहित्यातील निकृष्ट भागाची कास धरल्याने पंडिती काव्य खालच्या दर्जाचे कसे झाले याचेच दळढळीत उदाहरण आहे. संस्कृत कवींनी काव्याचा आत्मा रस आहे हे जाणले होते; उलट त्यांचे अनुसरण करणाऱ्या पंडित कवींनी मात्र रसापेक्षा अलंकारांचा बडिवार माजविलेला आहे, पंडित कवींची ही दृष्टी त्यांच्या सुरस काव्यनिर्मितीच्या मूळ धोरणाला बाधकच ठरली. परिणामी सौंदर्याविष्कारावर पांडित्यप्रदर्शनाने मात केली आणि काव्य लोप पावू लागले. पंडित कवींच्या काव्यरचनेतील मोठ्या विभागाबाबत असे म्हणता येते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या पंचमहाकाव्यांचे अनुसरण पंडित कवींनी केले त्या महाकाव्यांमागील कवींची ध्येयदर्शी भूमिका खरोखर त्या काव्यांना महाकाव्यत्व देण्यास कारणीभूत झालेली आहे हे पंडित कवींनी जाणलेले दिसत नाही. पंचमहाकाव्यांच्या अभिजात रूपामागील प्रेरक शक्ती म्हणजे त्यामागील महाकवींचे प्रगल्भ मन आणि त्यांची विशाल प्रतिभा. कालिदास आणि भारवी

यांच्याबाबत महाकवींच्या गंभीर बैठकीची तीव्र जाणीव होते. आर्षकाव्यांचे नुसते सुरस कथन त्यांना करावयाचे नव्हते, तर समाजापुढे काव्याच्या द्वारे भव्य ध्येयचित्र ठेवावयाचे होते. यासाठी मूळ कथेचा संक्षेपविस्तार, तिला नवीन वळण देणे, नवा अर्थ प्राप्त करून देणे हे मार्ग त्यांनी अवलंबिले आहेत. दिलीप, रघू, दशरथ, रामचंद्र इत्यादी राजांच्या त्यागी, उदात्त जीवनदर्शनातून रघुवंशात "राजधर्म हा त्यागधर्म असतो" हा भव्य आदर्श कालिदासाने निर्माण केला आहे, तर भारवीने किरातार्जुनीयात किरात-अर्जुन यांच्या युद्धातून नवा अर्थ काढून त्या काली पसरत चाललेल्या अयोग्य निवृत्तीवर अर्जुनाच्या तेजस्वी विचारसरणीतून तडाखा मारून कणखर प्रवृत्तीचा पुरस्कार साधला आहे. संस्कृत महाकवींच्या या भूमिकेशी पंडित कवींच्या भूमिकेची तुलना केली असता महदंतर जाणवते. ध्येयवाद वा भोवतालच्या कालाबद्दलचे चिंतन यांचा मागमूसही पंडिती काव्यात आढळत नाही. जुन्या कथेचा नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न तर कुठेच नाही. रामायण, महाभारत आणि भागवत यांतील कथांना संस्कृतच्या अनुसरणाची आणि थोडी फार स्वतःच्या कल्पनाशक्तीची झिलई देऊन त्याच त्या कथा पंडित कवी आळवीत बसले आहेत. सज्जनस्तुती, दुर्जननिंदा, सात्त्विक प्रवृत्तीबद्दल आदर, संसाराचे वैयर्थ्य यांसारख्या सर्वसामान्य विचारांपलीकडे असणारा महाकाव्याचा विशिष्ट हेतू त्यांच्या काव्यात कुठेच दृग्गोचर होत नाही. महाकाव्याचा हा आत्माच पंडित कवींना न गवसल्यामुळे संस्कृत महाकवींपुढे ते खुजे वाटतात.

संस्कृत कवींच्या रचनेतील रेखीवपणा, व्याकरणशुद्धता, छंदःशुद्धता या बाबी देखील पंडित कवींच्यात कमी प्रमाणातच पहावयास मिळतात. वृत्ताच्या सोईसाठी शब्दांची वेडीवाकडी, चमत्कारिक रूपे करणे,-हस्वदीर्घाची ओढाताण करणे, प्रौढ संस्कृत शब्दांशेजारी ग्राम्य शब्द योजणे, पर्यायवाचक शब्दांचा हवा तसा वापर करणे आणि छंदोभंग करणे हे प्रकार वामनपंडित, सामराज, मोरोपंत यांच्या रचनेत सर्रास दिसून येतात. भव्य प्रतिभा आणि उत्कट भावनात्मकता यांचा अभाव एकीकडे, तर प्रसादापेक्षा पांडित्याकडील ओढ आणि अर्थचमत्कृतीपेक्षा शब्दचमत्कृतीचे आकर्षण दुसरीकडे यामुळे पंडित कवींच्या रचनेत काव्यसौंदर्याची फार मोठी हानी झाली आहे. याखेरीज शृंगाराला कामुकतेचे रूप आलेले काही ठिकाणी दिसते (वामनपंडित-राधाभुजंग, राधाविलास) तर काही ठिकाणी विनोदाला बीभत्स, ग्राम्य रूप प्राप्त झालेले आहे (नागेश-

सीतास्वयंवर ) त्याचाही काव्यहानीच्या संदर्भात निर्देश करावयास पाहिजे. संस्कृत अभिजात साहित्याचे मराठीतील हे पुनरुज्जीवन याप्रमाणे अनेक दोषांनी डागळले असल्याने पंडिती काव्यावर आधुनिक दृष्टीतून टीका करताना डॉ. रा. शं. वाळिंबे[1] यांनी या काव्यातील अभिजातवादाला वेगडी अभिजातवाद ( Pseudo-classicism ) असे संबोधिले आहे. पंडिती काव्यातील दोषपूर्ण, काव्यहीन भाग पाहिल्यावर प्रा. वाळिंबे यांचे विधान बरेचसे पटते. परंतु सबंध पंडिती काव्यावर सरसकट कृत्रिम, वेगडी असा शेरा मारणे मात्र अन्यायकारक ठरेल.

पंडिती काव्यातील विदग्ध, रसपूर्ण रचना दृष्टीआड करणे हे अयोग्यच म्हटले पाहिजे. तसेच पंडित कवींनी ज्या कालखंडात रचना केली, त्या कालखंडातील परिस्थितीचा आणि विशेषतः तत्कालीन काव्यविषयक कल्पनांचा त्यांच्यावर झालेला परिणाम लक्षात न घेता त्यांच्यावर कडक टीकास्त्र सोडणे हेही अनुचित ठरेल. वामनपंडित, सामराज आणि निरंजनमाधव या कवींची प्रतिभा गगन-भरारी घेऊ शकत नाही हे खरे आहे; पण या कवींनी काव्यवाटिकेत काही रम्य स्थले निर्माण केली आहेत हे निःसंशय. वामनपंडिताचा लोपामुद्रा-सीता संवाद, सामराजाने रुक्मिणीला स्वप्नात घडविलेली कृष्णभेट, रघुनाथपंडिताने वर्णिलेली हंस-नल यांची पहिली भेट, निरंजनमाधवाने योजलेला सुभद्रा-यतिवेषधारी अर्जुन यांच्यातील संवाद ही स्थले काव्य आणि नाट्य यांचा एकाच वेळी आस्वाद देणारी आहेत. परंतु काव्य आणि नाट्य यांचा असा मोकळा आविष्कार करण्यास आपल्या प्रतिभेला पंडित कवींनी फारसा अवसर दिला नाही. उलट चमत्कृतीच्या मागे लागून तिला बंधनात जखडून टाकले ही दुर्दैवाची गोष्ट होय. तरीही मराठी भाषेला संस्कृतची प्रौढी व वैभव प्राप्त करून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न पंडित कवींनी केला आणि संस्कृतमधील अभिजात साहित्य व साहित्यशास्त्र यांचे लेण मराठीत आणले याबद्दल आपण त्यांचे ऋणी राहिले पाहिजे. संतकवींनी संस्कृतमधील पारमार्थिक तत्त्वज्ञानाची गंगा मराठीच्या नगरात आणली, तर पंडित कवींनी संस्कृतमधील काव्ययमुनेचा ओघ तेथे आणून त्याच्या काठी विहार करण्याची संधी मराठी रसिकांना उपलब्ध करून दिली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

---

१. डॉ. रा. शं. वाळिंबे, साहित्यातील संप्रदाय, आवृत्ती पहिली, पृ. १५३

# पण्डिती काव्य

# मुक्तेश्वर

९६६५५..

## १. सीतात्याग ‡ ‡ ‡

[ राज्याभिषेकानंतर राम राज्य करीत असताना त्याने आपल्याकडे आलेल्या हेरास आपल्याबद्दल लोक काय बोलत आहेत हे स्पष्टपणे सांगण्यास सांगितले. त्याच्याकडून रावणाकडे राहिलेल्या सीतेचा स्वीकार केल्याबद्दल प्रजा रामाला दोष देत होती हे कळल्यावर रामाने सीतेचा त्याग केला.]

तयानंतरें एकटा देवदेवो पुरीरक्षकातें पुसे गूढ भावो, ।
‘ जनीं बोलिजे आमुतें काय कैसें ? गुणीं येश, कीं दोष वैगुण्य ऐसें, ॥ १

उणें आमुचें कीं गुणीबंधुवाचें, तथा जानकीचे गुणागूण साचे, ।
वदा चार हो ! सत्य साचार मातें, नका चावळों या भयाचेनि वातें. ’ ॥ २

अभयवचन मागे, दूत साचार सांगे,
‘ वदत पुरनिवासी न्यून पैशुन्य मागें, ।
अटक असुरदेवां ख्याति केली निजांगें
सकळ शरकुठारें ताडिलीं शत्रुटांगें. ॥ ३

दशवदन कळंकी मत्त वाहूनि अंकीं,
समळ मदनपंकीं लेपिली जे अशोकीं, ।
चतुरपर विवेकी राम नोहेचि शंकी,
परनरगत नारी नांव हें नष्ट लोकीं ॥ ४

समळ जनकबाळी स्पर्शली जे विटाळीं,
पुनरपि निजगेहा आणिली हें त्रिकाळीं, ।
अनुचित बहु केलें, येश निःशेष गेलें,
कुजन कुटिल बोलें जोडिती पाप मोलें.’ ॥ ५

आकर्णितां ते अपवादगोष्टी संतापला राघवराज पोटीं, ।
पाचारिला सत्वर बंधु पासीं बोले विषादें वितळे तयासी. ॥ ६

‘सहितकुमरबंधूसंगिये सप्रधानीं
दशमुख दळिला त्यां काळनिर्वाणवाणीं, ।
मुनिवरब्रह्मादिदेवेंद्रसाक्षी
प्रगट मज पवित्रा ओपिती पंकजाक्षी. ॥ ७

पुनरपि जन तोंडें लांछनातेंचि बोले
श्रवण करित माझें दग्ध सर्वांग झालें. ।
हरिहरविधि आतां बोधितांही पवित्रा
त्यजिन अवनिजा हे सत्य जाणों सुमित्रा ! ॥ ८

न साहवे हा अपवाद मातें, त्यजीन जीवा अथवा सितेतें, ।
विशेष कांहीं न वदें उदारा ! सांडूनि येई विजनीं कुदारा.’ ॥ ९

‘श्रुती निंदिजे सर्वदा शून्यवादीं, अनाचारिया कैं सदाचारबुद्धी ? ।
विरक्तें मनीं वाळिले कामचारी, तया मानिजे काय सांगे विचारी ? ॥ १०

तथासारिखें बोलणें लौकिकाचें मनें मानिजे साजणे ! भाड्याचें.’ ।
वदे राम ते गोष्टि आकर्णितां हो ! ‘निघे बाहिरी सत्वरां वीरबाहो.’ ॥ ११

महेंद्रालया पातला रामबंधू धरानंदिनीवंदनीं होत खेदू, ।
म्हणे, चालिजे तापसारण्य पाहो, मनोआवडी पाठवी प्राणनाहो.’ ॥ १२

बहू तोषली देवराचेनि बोलें, सवें घेतलीं रत्नवस्त्रें अमोलें, ।
ऋषीअंगनापूजनालागिं पाहो रथीं आरुढे सारथी वीरबाहो. ॥ १३

अशुभ शकुन होती आडवे सर्प जाती,
वदत पतिवियोगा पिंगळे कर्कराती, ।
प्रकटित बहुकष्टां धांवती काक वामें
निरखित भयशंके रामरामा विरामें. ॥ १४

धराधीशपत्नी धरानंदिनी हो ! पुसे देवरा भूधरातें गुणी हो, ।
म्हणे, ‘वोखटें चिन्ह हें काय सांगे,’ न बोले, मनीं मीनला शोकगंगे. ॥ १५

‘सकळ सहित बंधु क्षेम रामा रमेशा,
अचळ सुख असो कां हेंचि मागे महेशा।
अकुशळ मज लागो सर्व त्याचें सुमित्रा!’
सकरुण अनुवादे सारसारंगनेत्रा.॥ १६

रुदन करित पाहे नोबले मातु कांहीं,
चकित जनकबाळा नेणवे हेतु कांहीं.।
निरखुनि वन गंगा चालकां रामभेटी,
वचन पडत कानीं आगळा शोक दाटी.॥ १७

रचित कनकनौका नाविकें सिद्ध केली,
उतरुनि सुरगंगा पैलपारासि न्हेली.।
गहन वन विलोकी लागल्या रूख जाळी
विरहित जनपक्षीं व्यापिलें सिंहव्याळीं.॥ १८

तरुतळिं तृणशय्ये बैसली लोकमाता,
सकरुण फणिराजें वंदिले पाय माथां।
वदनविधु विलोकी सद्गदं कंठ दाटे
उभयनयनपंथीं सांचलें नीर लोटे॥ १९

प्रदक्षिणा पंकजईक्षणातें सारूनि पायांवरि मस्तकातें,।
ठेवोनि बोले अळुमाळ संज्ञा ‘अलोट माते! रघुराजआज्ञा.॥ २०

रघुपतिचरणांतें मानसामाजि ठेवीं,
अनुदिनीं रसनेतें रामरंगेंचि लावीं,।
रघुपतिकरुणेचा मेघ वोळेल जेव्हां,
नयनवदनमेळें पावसी सौख्य तेव्हां.॥ २१

यशातें महालोकनिंदे न हालें, रमानायकें ये वनीं सांडवीलें,।
असो एथही रक्षिता राम एकू, पतीचिंतनीं जानकी! सांडिं शोकू.’॥ २२

विनवित वनसत्वां पंचभूतां समस्तां,
'सकळिं तुम्हि कृपेनें रक्षिजे रामकांता.'।
धरुनि हृदयधीरें पातले नीजपंथें,
रुदन करित गेला, त्यागिलें जानकीतें. ॥ २३

अहो अंतरें राघवानूज गेला, म्हणे, 'जानकीदेहिंचा प्राण न्हेला.'।
करी शोक ते चंड मारुनि हाके, म्हणे, 'राघवा! रक्षिले लोकशंके. ॥ २४

परत परत वेगीं राममित्रा सुमित्रा
त्यजुनि मज विदेशीं केंवि जासी पवित्रा,।
तुजविण पळ मातें कोटि कल्पांत वाटे,
रघुपतिविण देहीं प्राण निःशेष आटे.' ॥ २५

अहो! सैंवराहूनि हा काळपावें गुणा आठवी जानकी प्रेमभावें,।
सुखें भोगिलीं संगतीं वल्लभाचे मनीं आठवी, जाचणीं जीव जाचे. ॥ २६

करी शोक सीता, मुखें हाक मारी वनीं खेचरां भूचरां खेदकारी,।
गिरी कांपती, डोलती वृक्षजाती, मही भीजली त्याचिये अश्रुपातीं. ॥ २७

कुशसमिधसुपुष्पां न्यावयालागिं तेथें,
कुमर ऋषिगणाचे शोधिती काननातें.।
रुदन पडत कानीं सांगती वाल्मिकातें,
परिसत कविराजें जाणिजे जानकीतें. ॥ २८

त्वरें पातला तेथ वाल्मीक ताता, मुखें शांतवी हस्त ठेऊनि माथां।
'जगत्प्राणप्राणेश्वरी! आदिमाते! उठें, आश्रमीं विश्रमें, सांडिं चिंते. ॥ २९

रवी चंद्र तैसे गुणी पुत्र दोनी फळें पावसी, जाण लावण्यखाणी!।
अयोध्यापदीं राज्य त्यांचेचि माथां, नको वाढउं वाड उद्वेगचिंता. ॥ ३०

जननिजनक दोघें भेटलीं त्यांचिऐसी,
परम सुख सितेसीं लाधलें हो विशेषीं।
धरुनि कर गुरूनें दाविलें नीजपंथा,
सुखसदन प्रवेशे, दूरि त्यागूनि चिंता. ॥ ३१

( मुक्तेश्वरकृत 'रामायण' उत्तरकांड, श्लोक २८५ ते ३१५ )

# वामनपंडित

## २. सीता-लोपामुद्रा संभाषण ‡ ‡ ‡

[ रावणाला मारून राम सीतेसह अगस्ती ऋषीच्या आश्रमास आला. अगस्ती ऋषीची पत्नी लोपामुद्रा हिला आपला पती जो अगस्ती त्याने सिंधूचे प्राशन केले असा गर्व होता. म्हणून रामाने मुद्दाम सीतेस सांगितले की लोपामुद्रेला तू सेतुबंधाची कथा सांगू नकोस. ]

'सर्व कथा कथिं अगस्तिवधूसि सीते ! क्षाराब्धिसेतुरचना न कथीं सतीतें. ।
कीं चूळ जो जलधिचा करि, त्या मुनीची । कांता म्हणेल तव वल्लभकीर्ति नीची. १

'प्रमाण आज्ञा' म्हणऊनि, रामा वंदूनि जातां मुनिवर्यधामा, ।
पुसे तिला क्षेम, तया प्रसंगीं संवाद हा राघवविप्रसंगीं. ॥ २

'राम तो स्वरत नित्य विरक्त, हा नसेल तुजशीं अनुरक्त, ।
कीं असेल सुख तें वद सीते ! सांग गोष्टिहि सुखप्रदसी ते. ॥ ३

काय बोलत असे अभिराम, श्रांत तूज अवलोकुनि राम ? ।
सांग आणिकहि वल्लभवार्ता, ज्या कथा करिति सौख्य भवार्ता.' ॥ ४

'स्वरत अद्वय राम असे खरा, मजसि याशिं गुणें रघुशेखरा ! ।
स्थिरचरात्मपणें रमणे सये ! जरि अहंममतादि न यास ये.' ॥ ५

'विरक्त बाई ! रघुराज साचा, भोक्ता नव्हे राजसतामसांचा; ।
न या बहू कल्पतरूपमातें हे सोहळे कल्पित रूप मातें. ॥ ६

जशि बहु रवितप्ता सावली गोड वाटे,
तशि वनिं पतिलाडें मानितें कोड वाटे; ।
घरिंहुनि मज बाई ! सोहळे काननाचे;
सजलजलदसंगें मोर हो ! कां न नाचे ? ॥ ७

पथीं भागें, मागें परमअनुरागें रघुपती
उभा राहे, पाहे; गुणहि मुनि हे हेचि जपती. ।
कृपापांगें अंगें निववि, करि संसार थिंवसा,
धरा माता, भ्राता शशिच सविता होय दिवसा. ॥ ८

रघुपतिसह शय्या भूमि हे माय वाटे,
मृदु सुपथिंहुनीही माय त्या पायवाटे. ।
श्वशुर दिनमणीही होय एणांक भाऊ,
न कळत जन ऐसें क्लेश निःशेष भावू. ॥ ९

पवन वनसुवासें, उष्ण होतांचि, वाटे
उपजवि सुख, पुत्रस्वामिनी ज्यासि वाटे; ।
तनु करि अनुसूया नित्य ओली सुगंधें,
नव्हति अजुनि बाई ! म्लान पुष्पें सुगंधें. ॥ १०

तिथें पावलों अत्रिच्या आश्रमातें, तयाची वधू ते हरी हो ! श्रमातें, ।
तयीं हार हे गंध लावूनि घाली, स्वभातिथ्य कौशल्य दावूं निघाली. ॥ ११

ये देखतां बहु कृपा मज दत्तमाते, पूजूनि ये रिति वदे सति उत्तमा ते; ।
'वेणी फणी करिल हो ! तुज कोण वाटे ? वाईट हें मज' म्हणे सति
'फार वाटे.' ॥ १२

'म्लानता कधिं न यो सुमनातें, केश क्लेश न करूत मनातें; ।
गंध आर्द्रचि असो' अनुसूया दे असा वर, न जीस असूया. ॥ १३

करतळिं न दुखों दे फोड हो जेविं पाणी,
वनिं धरि मन माझें ये रिती चापपाणी; ।
'कनकमृग' म्हणे तों पाठिसी राम लागे,
दशमुख हरि ऐशामाजि मेला मला गे ! ॥ १४

मृग प्राण सोडी, तयीं दीनवाणी 'अरे लक्ष्मणा ! धांव' ऐशी सुवाणी ।
वदे, तों मला रामवाणीच वाटे, म्हणोनी बळें लाविलें त्यास वाटे. ॥ १५

न जातां, तया बोलिलें दुष्ट वाचा, ' अरे ! घात तूं इच्छिसी राघवाचा; ।
तुला प्राप्त होणार का देवरा ! मी ? धरीसी असा कां ' म्हणें ' भाव रामीं.' ॥ १६

अशा शब्दबाणीं सुमित्रात्मजाला अहो ! विंधितां, तो मृतप्राय झाला; ।
रडे जाय तो राघवा लोकपाळा, करूं काय आतां ? म्हणें मी कपाळा. ॥ १७

जाय तो रडत दाटत कंठ, प्राप्त होय मजला दशकंठ; ।
पद्मिनी उपडितो गज हस्तीं, ने तसा उचलुनी मज हस्तीं. ॥ १८

अशि सकळ अनर्था मूळ माझीच वाणी;
धरुनि मज पळे, तैं होय मी दीनवाणी; ।
बहुत मजनिमित्तें राघवें शोक केला.
करुण म्हणुनि; न स्त्रीकामकामीं भुकेला. ॥ १९

जटायुपक्षी मजलागिं धांवे, तों रावणें त्यास सये ! वधावें ।
तेथूनि यानें मज दुष्ट लंके पक्षीवनामध्य अवेश शोके. ॥ २०

अवो ! गोदातीरा रघुपति फिरे, पादयुगुळें,
गळे नेत्रीं पाणी, मुखिं न निघती शब्द सगळे, ।
वदे सौमित्रातें, ' सखिविण दिसे सर्व अरुची,
अहो गेली गेली सुमनकलिका मारतरुची.' ॥ २१

मज निमित्त करी गडि वानरां, सुलभ जो न सुरां, अथवा नरां; ।
धरि मदर्थ असा व्यवसाय कीं, दशमुखा वधि राघव सायकीं. ॥ २२

धरि करीं कमला कमलापती मथुनि सिंधु, तसाचि मला पती. ।
जलधिमध्यपुरींत तिचा धणी, वधुनि, दे मज आत्मसुखें धणी. ॥ २३

मारीच मारीच मृगास रानीं, लंकेस लंकेश वधी शरांनीं ।
वाळीस वारीच, सख्यास पाळी, गातां सदा त्यास भजे कपाळी. ॥ २४

जे जळांत बुडणार तीव्र, ते, थोर पर्वत अहो पतिव्रते ! ।
सागरीं तरति, सेतुवाट ते, हे अतर्क्य करणीच वाटते. ॥ २५

परततां जलधीवरि पाहतें, तरति पर्वत विस्मित राहतें; ।
जळ तळीं, वरि हो धरणी, सये ! करि नसे तुलना करणीस ये. ' ॥ २६

समुद्रावरी सैन्य ये पायवाटे, मनीं हे सदा जीस आश्चर्य वाटे, ।
कशी सेतुची गोष्टि तीच्या सुवाचे नये ? बोल ते वीसरे राघवाचे. ॥ २७

शरीरीं भरे वर्णितां रामवारें, उठाणें मनाचीं तर्यी दुर्निवारें; ।
पतीचीं यशें जे निरूपीत जाते, वदे गोष्टि हेही विदेहात्मजा ते. ॥ २८

विदेहात्मजा पावली विस्मृतीतें, म्हणे बांधिला ' सिंधु ' जों त्या सतीतें ।
जसें हास्य ये, स्वामिचे भारतीतें स्मरे, तों स्फुरे हा चमत्कार तीतें. ॥ २९

' क्षाराब्धिसेतु म्हणि सांगसि तीस सीते ! जीचा पती जळधि चूळ करी, तशीतें; ' ।
शब्दांत या रघुपतीच खुणेस दावी, कीं क्षार मूत्र अशि गोष्टि पुन्हा वदावी. ॥ ३०

म्हणे लोपामुद्रा, ' चुळभरि समुद्रा करि पती;
तया या आयासें करुनि उतरे कां रघुपती ? । '
' द्विजाच्या हो ! मूत्रा शिवति अपवित्रा न कपि ते, '
म्हणे सीता ' नाहीं तरि सगिरिसप्ताब्धिहि पिते. ' ॥ ३१

( वामनपंडितकृत ' लोपामुद्रासंवाद ', श्लोक ६ ते ३६ )

## ३. नाममाहात्म्य : : :

हरिचरणसरोजीं चित्सुधासारपानें
श्रमर परमयोगी गुंजती नामगानें, ।
हरति सकळ दुःखां, हीं सुखाचीं निधानें
वद वद वद जिव्हे ! वासुदेवाभिधानें. ॥ १

हरिपण हरिनामें धातुमूर्तींसि आलें,
हरिमय हरिनामें विश्व संतांसि झालें ।
भवभय हरिनामें साधकांचें पळालें,
वद वद वद जिव्हे ! रामनामें रसाळें ॥ २

हरितनु हरिनामें लेखिली सर्वभक्तीं,
सहजसुखनिधानीं देखिली ही विरक्तीं ।
शुकसनकमुखीं जीं गाइलीं जीतमुक्तीं
वद वद वद जिव्हे ! टाकुनी लौकिकोक्ती ॥ ३

निगमहि हरिनामें गर्जती वर्णवर्णी
पतित तरति नामें आश्रमी आणि वर्णी, ।
हरिपदीं हरिनामीं जेंवि मुद्रा सुवर्णी
जगिं कवण असा जो नाममाहात्म्य वर्णी ? ॥ ४

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी, ।
नामप्रतापहि यथामति याच रीती, सीमा न पावति, तथापि मुनींद्र गाती. ॥ ५

उडति मानसहंस जया नभीं शलभ त्याचि नभीं उडतां न भी. ।
अजितनाममहत्त्व ऋषि श्रुती वदति, तेंचि वदेन यथामती. ॥ ६

श्रुतिनिगमपुराणें आगमक्षीरसिंधु
मथुनि अमृतरूप ग्रंथ हा दीनबंधु, ।
प्रकट करिल आतां वामनात्मा मुरारी
श्रवणपठनमात्रें जो समस्तांसि तारी. ॥ ७

हा ग्रंथ याचिकरितां अमृताभिधानी नामें प्रसिद्ध ‘ हरिनामसुधा ’ म्हणोनी, ।
जें नाम गोड, महिमा अति गोड त्याचा, जो वर्णिती अमृतरूप परादि वाचा. ॥ ८

मोक्ष श्रुती वदति ज्यास गुणप्रसादें, तो पावती सगुण नामसुधानुवादें; ।
कोण्या मिसेंकरुनि यो हरिनाम वाचे नेत्र प्रकाशति तयावरि माधवाचे. ॥ ९

नारायणा म्हणुनि एक सुतासि बाहे, नारायणाख्य नर अन्य तयासि पाहे, ।
नारायणा म्हणति लौकिकही प्रवाहीं नारायणाक्षिविषय क्षण होति तेही. ॥ १०

आधींच साक्षि सकळांसिहि पाहताहे, जो नाम घे करुण होवुनि त्यास पाहे. ।
तो धन्य कीं क्षणहि ज्यावरि विष्णुदृष्टी, थेंबीं तळें भरतसे करुणांबुवृष्टी. ॥ ११

कर्मानुरूप फळदायक साक्षिदृष्टी सर्वांवरी तसिच तत्करुणांबुवृष्टी, ।
आहे परंतु जनपातक आड जेथें क्षेत्रें सुधेकरुनि त्या भिजवी न तेथें. ॥ १२

छायेसही सूर्य जसा प्रकाशी, जागे तसा साक्षिहि पापराशी, ।
वृष्टीसही तोंचि करी तथापि क्षेत्रांसि आच्छादिति लोक पापी. ॥ १३

नकळतहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें
दुरिततृणगृहाचें भस्म होणार तेथें, ।
मग सम करुणेची आयती कृष्णदृष्टी
भिजविल करिते जे सर्वसृष्ट्यर्थ वृष्टी. ॥ १४

जसें हेममूर्तीमधें हातपायीं दिसे एक सोनेंचि तें सर्व ठायीं, ।
असा विश्वरूपें स्वयें शेषशायी स्वनामें जना होतसे सौख्यदायी. ॥ १५

घटादीक नारायणाचींच नामें, तरी तीं अविद्यामयें दुःखधामें ।
म्हणोनी पुराणप्रसिद्धें विचित्रें जगत्पावनें विष्णुनामें पवित्रें. ॥ १६

महाभारतीं ये रिती धर्मराजाप्रति श्रीपतीदेखतां भीष्म आजा ।
वदे कीं ऋषी वर्णिती जे पुराणीं धरावी तया विष्णुनामीं शिराणी. ॥ १७

श्लोकार्थ तो कीं तुज भूमिपाळा ! सांगेन ते मी हरिनाममाळा ।
जेथें प्रसिद्धें गुणकर्मरूपें नामें पवित्रें महिमाप्रतापें ॥ १८

श्रुतिस्मृतीलागिं महापुराणीं व्यासादिकांच्या वदताति वाणी ।
नामें हरीचीं तुज तींच राया ! सांगेन सर्वांसहि उद्धराया. ॥ १९

महात्मयाचीं तुज नामधेयें सांगेन विख्यात मुनींद्रगेयें ।
म्हणोनि भीष्मोदित पद्य जेथें माहात्म्यशब्दें गहनार्थ तेथें. ॥ २०

महात्मा हरी जो अशेषात्मभावें घटादीक तेव्हां तयाचींच नांवें, ।
तरी तारकें तीं जनाला न होती जगत्पावनें जीं ऋषी वेद गाती. ॥ २१

म्हणोनि विख्यात मुकुंदनांवें जीं वर्णिती वेद मुनींद्र भावें ।
सांगेन तीं मी तुज भूमिपाळा ! प्रसिद्ध जे माधवनाममाळा. ॥ २२

या कारणें जीं हरिनामधेयें, वेदीं पुराणीं मुनिवर्यगेयें, ।
ज्या त्या मिसें उद्धरिती जनाला जाळूनियां पापमहावनाला. ॥ २३

भाषांतरीं कल्पित नाम जेथें श्रद्धानुरूपेंचि फळेल तेथें. ।
प्रताप नैसर्गिक त्यास नाहीं प्रसिद्ध नामीं फळ नेणतांही. ॥ २४

हें सर्व आपण चराचर, देववर्य श्रीकांत कारण सुवर्ण, समस्त कार्य ।
नामीं स्वयें प्रगटतो भलत्याचि ठायीं या भूषणीं कनक केवळ शेषशायी ॥ २५

जगत् कार्य, तो कारण श्रीमुरारी स्वयें तोचि सर्वीं वसे निर्विकारी. ।
स्वरूपें स्फुरद्रुप सर्वत्र आहे मुखीं नाम ज्याचें तयालागिं पाहे. ॥ २६

[वामनपंडितकृत ‘ नामसुधा ’ अध्याय पहिला, चरण पहिला, श्लोक १ ते २६.]

## ४. द्वारकावैभव ‡ ‡ ‡

[ सोळा सहस्र पत्नींसह श्रीकृष्ण द्वारकेत राहू लागला त्या वेळीं त्याजकडे नारद आला होता. नारदाला दिसलेले द्वारकापुरीचे वैभव पुढील उताऱ्यात वर्णिले आहे. ]

तो नारद द्वारवतीस पाहे कीं स्वर्गशोभेस करी त्रपा हे।
समृद्ध देखे जनसंपदांसी घरोघरींही अणिमादि दासी ॥ १

द्वारकेंत अति रम्य मळे हो! श्री जयांतिल कधीं न मळे हो!।
पुष्पितें उपवनें मुनि लक्षी, मोजितां न धरवे शतलक्षीं ॥ २

विहग ज्यांत उदंड अखंड जी मधुरता वरिजे जिहिं अंडजीं।
कुसुमित द्रुम सुंदर साजती, फळभरेंच लवोन विराजती ॥ ३

सरोवरें निर्मळ नीर ज्यांचें कीं ज्यांमधें कानन नीरजांचें।
तया अजी वर्णिल कोण पद्मा, जेथें असे सद्म करूनि पद्मा ॥ ४

पराग नीरीं नवपंकजांचे कस्तूरि धिक्कारिति पंक ज्यांचे।
देखोनि त्या मुक्तिपुरीं जळाला, संसारसंताप पळे जळाला ॥ ५

अन्य सर्व उपमाभ्रम राहो, पंकजें मुनिमनभ्रमरा हो।
द्वारकापतिपदें दिसती हो! जीं स्तनीं धरि अनादि सती हो ॥ ६

हरिपदोपमपद्मसरोवरीं परमहंस मुनींद्र सरोवरीं।
दिसति हंसहि सात्विक साजिरे वसति लाभ दुज्यां न असा जिरे ॥ ७

हरिपदाकृतिनें असि सारसीं प्रभुपुरींत तया जलसारसीं।
त्याजुनि आवडी लौकिकसारसीं वसति मांडियली द्विजसारसीं ॥ ८

सांडिला कुसुमसंभ्रम रानीं द्वारकाजलरुहीं भ्रमरांनीं।
जे रितीं मुनिमनोमधुपांनीं कृष्णपादकमळीं मधुपानीं ॥ ९

कृष्णपादकमळीं न रसाचा स्वाद घेत नर-वानर साचा।
वानरादिकहि राघव तारी, हा तरे न कवणें अवतारीं ॥ १०

निर्माण ज्याणें विधिशंभु केले, त्याकारणें लोचन हे भुकेले ।
त्याचीं पदाब्जेंचि पहावयाला त्वरा, दुजा न प्रिय भाव याला ॥ ११

असे सर्व ठायीं जरी हा उदास प्रभूची पुरी रम्य त्या नारदास ।
गमे कीं हरीची तनू त्यास वाटे, पहातां उठे प्रेम उल्हासवाटें ॥ १२

द्वारकाविभव जो मुनि लक्षी माडियांसि गणना नवलक्षीं ।
उच्च शुभ्र रजता स्फटिकाच्या चांदण्या रजनिच्या घटिकाच्या ॥ १३

चांदण्यांत सित वस्तु विराजे वर्णिती निपुण जे कविराजे ।
मौक्तिकांसहित चांदवियांची दीप्ति तृप्ति करि यादवियांची ॥ १४

भूमि त्या नगरिं रत्नमणींची कोंदणे जडित इंद्रमणींचीं ।
वाट ते गजरथाश्वनृपांची हेम दिव्य वरि सुंदर पाची ॥ १५

रत्नहेमखचिता पडशाला, सत्सभा वहु अशाचि विशाला ।
पंक्ति रत्नमय हाटवट्याची दीप्ति रात्रिस दिसे दिवस्यांची ॥ १६

देखे असींच नवलें मुनि फार वाटें, देखोनि कृष्ण गृहसौख्य अपार वाटे ।
द्वारीं उभे सकलही सुर, लोकपाल श्रीकांत ज्यांत असतो भुवनैकपाल ॥ १७

देखिलें हरिचिया भवनाशी दर्शनेंकरुनि जें भव नाशी ।
त्यांत षोडशसहस्र सतींचीं मंदिरें हरिचिये वसतींचीं ॥ १८

कौशल्य तें परम कीं भवबंध नाशी कौशल्य तें न अजि जें करि बंधनाशी ।
कौशल्य वांछित असें नरराजयाला, कौशल्य अर्पुनि भजों यदुराजयाला ॥ १९

काव्यांत ज्या कुनर आणि अपूतनारी वर्णूनि वर्णिनि जयांत न पूतनारी ।
तें काकतीर्थचि, कदापि न मानसाच्या हंसाचिया रमति हो गति मानसाच्या ॥ २०

स्वकौशल्य तें विश्वकर्मा विशेषें हरीचे गृहीं दाखवी हो अशेषें ।
गृहें त्यांत सोळा सहस्रें समानें अशाही पुरीमाजि जें भासमानें ॥ २१

सहस्रें जीं सोळा यदुपतिगृहें त्यांतहि मुनी ।
निघे एक्या गेहीं हरिचरणजालागिं नमुनी ॥
निवाला वैकुंठीं म्हणुनि मुनिला वाटत असे, ।
विलास श्रीकांत क्षितिवरिहि दावी अजि असे ॥ २२

स्वयंभ स्तंभ श्रीमरकतमणीचेच वरते, ।
फळाच्याही रूपें खचित मणि वैडूर्य वर ते ॥
न रात्रींही जेथें किमपि तम कीं उत्तम मणी ।
प्रकाशीती जाणों उदित तितकेही दिनमणी ॥ २३

शशीची प्रभा पांढरी चांदण्याला गभे विश्वकर्माब्धि तो चांद व्याला ।
जयाभोंवतें वृंद मुक्ताद्विजांचें जिहीं मोहिलें नेत्र मुक्ता द्विजांचें ॥ २४

चांदण्या करुनि त्याची अपारा तृप्ति मानिति चकोर दुपारां ।
कृष्णपादनखचंद्रसुधा तें देखतां विहगबुद्धिहि धाते ॥ २५

गृहांतील कृष्णागराचा निघे तो नभीं धूम्रही मेघ मानूनि घे तो ।
सुखें नाचती देखती त्यास मोर, स्त्रिया हांसती ज्या उभ्या त्यासमोर ॥ २६

ज्या कांकण्या वक्र गृहाग्रभागीं रत्नांकिता त्यांत यथाविभागीं ।
चकोर पारावत हंस पक्षी मयूरही नेत्र जयांसि पक्षीं ॥ २७

त्या अंडजांमाजि चकोरजाती दे चांदण्यालागिं गृहांत जाती ।
बाहेर ये वृंद तया घनाचें विलासमानी शिखिवृंद नाचे ॥ २८

इत्यादि या कुशलता करि विश्वकर्मा, दावी, म्हणे, ‘ जडसचेतनविश्वकर्मा ।
संतुष्ट हो किमपि मानुनि हे स्वसेवा ’ भावें अशा कुशल हो तुम्हि कां
न सेवा ॥ २९

( वामनपंडितकृत ‘ द्वारकाविजय ’ सर्ग २, श्लोक ६ ते ३४ )

# रघुनाथपंडित

## ५. हंस–दमयंती संवाद ‡ ‡ ‡

[ आपल्याला धरावयास येणाऱ्या दमयंतीला हंसाने आपल्यामागे यावयास लावून एकांतात नलाचे मनोगत तिला कळविण्यासाठी युक्तिप्रयुक्तीने एका वन-प्रदेशात आणले. नलाची इच्छा तिला सांगितली व तिन्हाही अभिप्राय जाणून घेतला. ]

तया वनांत येकलि । विकासिनी विलोकिली ॥
मदें भरोनि बोल तो । तियेस हंस बोलतो ॥ १

‘ भूमिभागीं फिरणार तूं, तुला मी । कसा सांपडेन सांग गगनगामी ? ॥
बाळ, बाळे ! जरि होय चंद्रकामी । हस्त त्याचा लागेल काय सोमीं ? ॥ २

कसें नांदे तारुण्य तुझ्या देहीं । बाल्य तेणें गेलेंच नसे कांहीं ॥
उगवतांही सहस्रभानु पाहीं । काय नलिनीसंकोच जात नाहीं ? ॥ ३

‘ असो सांपडतो तुझ्या करामाजी । पुन्हा सुटका करितेस काय माझी ? ॥
कसा पातेजूं बाळबुद्धि तूझी ? । स्त्रीस्वभावें बहु आणशील बाजी ॥ ४

‘ पाषाणरूप जातें । भ्रमवि तयातें धरूनि जे हातें ।
जीवंतही गवसला । समज तियेचे भ्रमींच मग वसला ’ ॥ ५

चतुर नर यखादा बोलतो हंस तैसा
तरि न धरि मृगाक्षी विस्मयीं भाव कैसा ? ।
‘ पळुनि मज निखंदी, ’ तीस तो खेद नाहीं
शिणहि विसरली ते बोलती होय कांहीं ॥ ६

“ कोण तूं गा कोठील कोऽणाचा ? । कसा जाला तव देह सुवर्णाचा ॥
कसी आली ही तूज मनुजवाचा ? । काय भाग्योदय तूंचि या वनाचा ? ॥ ७

धरिल पाहिल सोडील असा पाहीं। मजवरी विश्वास तुला नाहीं॥
नसो पुसतें तें सांग कथा कांहीं। जाइं अथवा मग या वनांत राहीं. " ॥ ८

असें बोलोनी मौन धरुनि राहे। काय बोलतो हंस असें पाहे॥
तदा त्याचा वचनौघ असा वाहे॥ राजकन्ये, तूं आयकें गिरा हे :– ९

' ब्रह्मदेवाचे बहुविमानवाही। हंस आहेत ऐकिलें तुवांही॥
तयां माजी सुवर्णदेह हाही। ज्या समान साख्य सर्वमान्य नाहीं॥ १०

' मंदाकिनीमधिल जे कनकारविंदें। ते जेवितों मृदुलनालमृणालकंदें॥
आम्ही असों नृपसुते, तरि कांचनाचे। जें कार्य तें धरिल कीं गुण कारणाचे॥ ११

जो मानसीं विहरतो विहरो परी तो। कां आमुची कुलसती असती करीतो॥
राखीं नळा निजयशोमय–हंसराया। आलों महीवरि फिरादि असी कराया॥ १२

मी गुंतलों नळ–महेंद्र–गुणौघपाशीं। सेवेसही मग करोनि तयाच पासीं॥
आलोकुनी कवण या चतुरा न नाचे?। लोकेशता विभवही चतुराननाचें १३

गंगोदकीं घडिघडीस बुडीस देतो। पंखां सुशीतल करोनि तसाच येतों॥
तेणें नळासि करितों मग वीजनातें। बाळे, जसा न धरि तो सुरतश्रमातें॥ १४

एकांत लेखनहि वाचनही करी तो। माझी तनुद्युति समीप तदा धरीतों॥
या कारणें नळ मला बहु आप्त मानी। तो सांगता निज मनोरथ होय कानीं॥ १५

आधींच नैषधकथा नवनीतमेला। होता अलंकरणरूप इच्या जिभेला।
हंसोदयें विघरतां अधरीं धरी ते। स्वीकारितां वचन हें मग आदरीते॥ १६

" नळें तुजसी एकांत काय केला। तोचि ऐकाया जीव हा भुकेला
तया बोलें निववीं या भुकेला। ' आइका हें '! मज म्हणुनि; नायिकेला' ॥ १७

निषधराजीं हे फार दिसे राजी। असें हंसें जाणोनि मनामाजी॥
बोलिजेली नळराजकथा हे जी। भला हेजीब तया म्हणे हे " जी " ॥ १८

“ नळासी जो एकांत तुझा तो कां । प्रकट कीजे म्यां सांग इतर लोकां ? ॥
धन्य डोळे हे करुनि तवालोका । नळकथेनें हे कर्ण धन्य हो कां ” ॥ १९

“ नळ म्हणाला मज धरुनि सरळ बाहीं । ‘ तुला कोठेंही बंक अटक नाहीं ॥
सकळ भुवनें तरि फिरुनि राजगेहीं । एक नवरी मज योग्य बरी पाहीं ’ ॥ २०

एकांत हाच वदलो तुज जाण बाळे । तूं सांग जो वर तुला रुचला रसाळे ! ”
येणेंपरी परिसतांच तया अनन्या । हे बोलते चतुर सुंदर राजकन्या ॥ २१

“ मी जाण देवनळही स्वकरीं धराया । मागेन काय चतुरा मज लाज जाया ॥
काळें करूनि मुख जो वर होय लेखीं । हें बोलणें खग मनीं उभयार्थ लेखी॥२२

श्लेषशब्दें इणें भाव सांगीतला ।
नैषधाधीश तो नाथ मागीतला ॥
होय जाणीतली हे त्रपाकंचुला ।
हंस बोलावया हालवी चंचुला ॥ २३

[ रघुनाथपंडित विरचित ‘ दमयन्ती-स्वयंवर ’ श्लोक १०८ ते १३० ]

## ६. गजेन्द्राचा धावा ‡ ‡ ‡

[ त्रिकूट पर्वतावरील एका उद्यानात जलविहार करण्यासाठी एक गजेन्द्र सहपरिवार आला. तो सरोवरात जलक्रीडा करीत असता तेथील एका नक्राने त्यास सरोवरात खाली ओढण्याचा प्रयत्न केला. स्वसंरक्षण करण्यास आपण असमर्थ आहोत हे जाणून गजेन्द्राने श्रीविष्णूचा धावा केला. ]

तया वनीं अेक तटाक तोयें तुडुंबलें तामरसानपायें ॥
निरंतरामंद मरंद वाहे तपांतही यास्तव रिक्त नोहे ॥ १

वीतां मरंद उदरंभर वंभरांचें जें होय मंदिरहि सुंदर इंदिरेचें ॥
तें पद्म जेथिल सहस्र दलां धरीतें प्रत्येक सूर्य-किरणास विकासवीते. ॥ २

तया वनसरोवरीं उमलतां सरोजें रजें।
मिळोनि मिरवे दळीं सलिल मौक्तिकाकार जें ॥
तयास सम आणिकें कवण माणिकें मोकळीं।
असोत जरि पोवळीं दिसति पोवळीं कोवळीं कोवळीं. ॥ ३

मधुपांचीं खिल्लारें सरोवरामाजि कुमुदकल्हारें।
इंदुविकासविलासें होतीं सकळा समान सोल्लासें ॥ ४

अमृतही पयही म्हणवीतसे। मधुर सारस तें जल गा तसें ॥
मधुर सारस यास्तव गातसे। उभय होय तसी रुचि वीतिसे ॥ ५

राजहंसा तया तोयीं राजहंस विसावती।
चक्रें हीं चक्रवाकांचीं चक्राकार विरजती ॥ ६

ऐसें तटाक वरुणोपवनांत जेथें। पूर्वोक्त पर्वतवनस्थ गजेंद्र तेथें ॥
येतो कुटुंबसमवेत तृषार्त जाला। मार्तंडचंडकिरणीं अति तप्त केला ॥ ७

सखे मामे भाचे चुलतपुतणे आणि चुलते।
सखेही सांगाते सळमिसळ जाले सकळ ते ॥
स्त्रियाही जावांयी तनुज निज सार्थीत दडती।
सतीचे बोलावे कळतिल गजेंद्रास पुडती ॥ ८

जो काननीं विचरला चरला तृणातें ।
धुंडीतसे तृषित चिल्लर थिल्लरातें ॥
तो श्रीगजेंद्र जललोभ मनीं धरोनी ।
दानांबुपान करवी मधुपां करोनी ॥ ९

फिरतफिरत ऐसा येत होता पुढारीं ।
तंव वन वरुणाचें लक्ष जालें निडारीं ॥
त्वरित शिरुनि तेथें उंचें वाहेस वाहे ।
तृषित गज तटाकीं तुंबळें अंबु पाहे ॥ १०

तटाकाचे तोयीं हळुच उतराया चतुर तो ।
पुढारीं दो पायीं तनुभर उपायीं उतरतो ॥
जलातें आरंभीं स्वकरविवरामाजि भरितो ।
मुखापासी नेतो गजवर पितो तैं वरपतो ॥ ११

धाला जलेंकरुनि सिंपितसे कपोळीं ।
दानोदकावरिल भृंगकुळें उडालीं ॥
आले सर्वे निजकुलोद्भव जे तिहीशीं ।
क्रीडा करूं उतरला गज निम्न देशीं ॥ १२

वोढी सनाळ कमलांस तटीं झुगारी ।
हस्तींद्र शैवललतेस उरें विदारी ॥
माथां निमग्न करितां उदकीं उदेले । १३
दानांबुतैलज तवंग सवंग जाले ॥

ऐसा करी जलविहार करी तटाकीं ।
बाहेर सत्वर मदांध निघेच ना कीं ॥
नक्रें तया अवचितेंचि धरोनि पायीं । १४
आकर्षिलें करुनि शक्ति अगाध तोयीं ॥

गजबजोनि घनध्वनिभैरवें । गरजला गजराज घनारवें ॥
निजबळें पद वोढुनि झाडितो । प्रबळ नक्र मिठीस न सोडितो ॥ १५

जें ग्रस्त तें पद सुटूं गज युक्ति दावी ।
नक्रावरी पद दुजें उचलोनि रोवी ॥
तैं कंटकौघ रुपतांच तळांतरंगीं ।
माथा करी चपळ तोयतरंगसंगीं ॥

१६९५५

सोंडेनें सुसरीस वोढुनि जळा बाहेर काढूं करीं ।
पाषाणावरि आपटूनि रगडूं पाहे धरी सेपुटी ॥
तेथें कंटक टोंचले सिरकले पानीय नासापुटीं ।
श्वासोच्छ्वास न होयसा गवसला हस्ती तशा संकटीं ॥ १७

गजेंद्राचे बंधू कवळुनि गजेंद्रा निजकरीं ।
कडें काढूं वोढूं सकळ सिणलेही बहुपरीं ॥
तयां नाटोपेसें करुनि सुसरीनें बळ तसें ।
दिले झोले नेला गजवर जळीं जेंवि न दिसे ॥ १८

कांहींसा उफळे जळीं गज बळें कांहीं तळा लागतो ।
हा बाहेर निघोनि येइल असा लागेचना लाग तो ॥
वर्षांचीं शतकें दहा ढकललीं तीरस्थ होते करी ।
जे ते ही सुसरीस तो निरखितां गेले क्षणाभीतरीं ॥ १९

विचारी तैं हस्ती दृढ मज जयांचे भरवसे ।
तसेही गेले कीं विषम समयीं सोडुनि कसे ? ॥
असो आपद्बंधू यदुपति कृपेचा जलनिधि ।
सरूं बाहूं, पाहूं धणि वरि उभा राहिल कधीं ॥ २०

परविदारविलासविशारदें । क्रकचदारुण नक्र तशा रदें ॥
चगळितो गिळितो घन वेदना । न वदवे मज ये मधुसूदना ॥ २१

श्रुतिपुटीं नयनीं नयनांतरीं । मज करीं जल हें भरलें तरी ॥
भरतसे वरिच्चेवरी नावरे । जलचरें धरिलें हरि धांव रे ॥ २२

पुच्छकंटककठोरसुरीनें । घोर धाय रचिले सुसरीनें ॥
तेवि तीसही करी करवाळी । श्री हरी मज करीं कुरवाळी ॥ २३

वोणवा करुनि घांस गिळीसा । वोणवा गिळिसि गोपविलासा ॥
जो मदीयविपदग्नि उभा रे । तो तसा गिळि तसा न उभारे ॥ २४

ज्यांत कालिय विषौघ उदेले ।
तोय तें पिउनि गोप निजेले ॥
ते हरी तव कृपारस सेखीं ।
वाचलें त्रिजग हेंपरिसे कीं ॥ २५

नाच कांळिथफणांवरि टांचें ।
कीं जसा न मणि ते पिल टोचे ॥
तद्वधू तुज असें विनवीसें ।
नाचलास यदुराज विलासें ॥ २६

माधवा मृदुरवें भरलीनें ।
मोहिलें जग तुवां मुरलीनें ॥
ते उगाचि अधरीं न धरावी ।
एक वेळ मज ते विकरावी ॥ २७

चोज काय भुवनत्रयपोटीं ।
वाहसी नग तसा नग वोटीं ॥
तें असो अणुसमान मना या ।
वागवी निजपदीं यदुराया ॥ २८

( रघुनाथपंडित ' गजेंद्रमोक्ष ' श्लोक १४ ते ४१ )

# सामराज

## ७. रुक्मिणीची तगमग ‡ ‡ ‡

[ मातापित्यांची इच्छा बाजूला सारून हट्टाने रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी लावून देण्याच्या खटपटीत रुक्मिणीचा भाऊ रुक्मी हा होता. त्यासाठी त्याने शिशुपालाला नगरात बोलावले आणि विवाहाची सर्व तयारी केली. विवाह केवळ तीन दिवसांवर आला. अशा परिस्थितीत कृष्णावर आसक्त असलेल्या रुक्मिणीची अवस्था अती कठीण झाली. तिच्या जिवाची तगमग झाली, तिला कृष्णविरह असह्य झाला. तिने श्रीकृष्णाचा आणि अंबेचा धावा आरंभिला. तिच्या सख्या तिच्यावर शीतोपचार करू लागल्या. तोच संध्याकाळ झाली... ]

वदत वदत ऐसे सांज होयास आली,
दिनकरकरलक्ष्मी सर्व संक्षीण झाली. ।
मुखकमल तयेचें म्लान अत्यंत देखे,
म्हणउन कमळांचा बंधु बांधव्य राखे ॥ १

सहज दिनमणीचा अस्त होतांच, एकी
प्रियतमविरहानें क्रंदती चक्रवाकी. ।
विधिविहितनियोगें वारुणी आदरीली
म्हणुन चरम संध्या काय आरक्त जाली ? ॥ २

तदुपरि उगवे हा चंद्रमा पूर्णिमेचा.
अनभिलषित अर्थी होय ये उत्तमेचा; ।
द्विजपति विसरेना सर्वथा स्वीय दीक्षा,
कर पसरुन मागें वक्त्रलावण्यभिक्षा, ॥ ३

हिमकरकर जैसे कांतिपूर स्रवेती,
हळुच तसतसे ते चंद्रकांत द्रवेती. ।
क्षुधिततर चकोरां पारणें थोर जालें,
मुकुलित कुमुदाला जन्मसाफल्य आलें. ॥ ४

विलसित अवघें हें भीमकीला न सोसे.
अविरत मग टाकी निःसहांगी उसासे. ।
क्षणभरि सखियेचा हात घेऊन हातीं
ससलिल बहु केलीं बोलतां नेत्रपातीं. ॥ ५

अमृतमय शरीरी बोलती लोक सारे,
तदपि, कुमुदबंधू, वर्तसी तूं कसा, रे ? ।
सहज विमळ तूं तों बाळ रत्नाकराचें
असोन, धरिसि कैसें नाम दोषाकराचें ? ॥ ६

असेस चंद्रा गुरुदारगामी । प्राणास जालेंच उदार, गा, मी ॥
या पातकें होउन राजयक्ष्मी । गमावली तां द्विजराजलक्ष्मी ॥ ७

जिवलग सखिये, तूं होसि सर्वां अपेक्षा
तदपि करिसि कैसी आजि माझी उपेक्षा ? ।
कळत कळत तां ही हातिचें सोडिजेतें,
नियतच तरि काळें या मला वोढिजेतें ॥ ८

तुहिनकर नव्हे हें बीज चिंतालतेचें,
विकसित अथवा हें पुष्प उद्वेगतेचें ।
अभिनव मदनाचें छत्र किंवा उभारें,
युवतिजन जयाच्या दर्शनें मात्र भारें ॥ ९

नभ धवलित केलें, विश्व आनंदवीलें ।
परि विरहिजनाचें चित्त उन्मादवीलें ।
क्षणभरि मज बाई याकडे पाहवेना,
प्रळयदहनकल्प स्पर्श हा साहवेना ॥ १०

मज निज नलगे, हे वैरिणी सेज जाली,
तगमग सुटलीसे, राति मध्यास आली ।
क्षणभरि सपनींही कृष्ण दृष्टीं पडेना,
नयनसलिलयोगें चित्रिचा सांपडेना ॥ ११

..., ठाणे.
वि: ...
नों: वि: ...


अवसर समजेना, सारिका फार बोले;
शुकवचनविलासें चित्त अत्यंत सोले ।
अझुणिहि न वजे हा चंद्र अस्ताचलासी,
यदुपतिविरहाची बैसवीली कळासी ॥ १२

चंद्र सोदर सये गरलाचा, । भाव काज समजे दुरळाचा ? ।
ये शशांक मदनास सहाया, । मी अशक्य परि यास सहाया ॥ १३

दुःख दारुण सये विषयाचें । नित्य नूतन चढे विष याचें ॥
लग्न निश्चित असे परवाचें, । मी कसी परि अतःपर वाचें ? ॥ १४

बंधु देयिन म्हणे शिशुपाळा, । कां कृपा तुज नयेच कृपाळा ?
दीनवत्स(ल), दयानिधि, ऐसीं । बिरुदें हरि गवांविसी कैसीं ? ॥ १५

सांवळ्या सगुण नंदकुमारा । राजसा, त्वरित ये सकुमारा. ॥
मन्मथें झडपिलें मन माझें, । झाडणी करिल पाउल तूझें. ॥ १६

जन्म घेसि हरि यादव वंशीं, । देवही उतरती निजअंशीं. ॥
अंगनेस मज येक वरावें, । हें जगांत बहु नांव करावें. ॥ १७

पाव तूं त्वरित, नंदकिशोरा, । राधिकावदनचंद्रचकोरा. ॥
रातलें मन तुझें पदपद्मीं, । नित्य वीट उपजे निजसद्मीं. ॥ १८

नंदगोपतनया, अनया रे, । या कसा विसरसी विनया रे ? ॥
व्यापिलें मज, मनोहरवेषा । देवकीसुकृतसारविशेषा ॥ १९

अंतरीं सुख तुझें बहु दाटे । हें वृथा सकळ वैभव वाटे. ॥
एक वेळ मज सन्मुख यावें, । श्रीहरी, चरणदर्शन द्यावें. ॥ २०

द्वारकानगरनीरजनेत्रा, । काय होति मजहून पवित्रा ? ॥
सुंदरा तन्हि हरी, अथवा रे । हा विवेक अवघाच निवारे. ॥ २१

श्यामसुंदर सखा वनमाळीं । आणि सत्वर सये गुणशाळी ॥
चालितां सकळ विश्वविसावा । आठवे पुरुष पंचविसावा ॥ २२

होय जें प्रकट गोवळवंशीं, । वाजवी मदनमोहन वंशी, ॥
वागवी निजसिदोरिस असीं, । ब्रह्म तें, सखि, सनातन गंसीं. ॥ २३

नीलनीरजदलद्युति भासे, । देवडें चरण नित्य उभासे. ॥
आणि त्यास, सखि, लागन पायां । जाय हें वय अमोलिक वांया ॥ २४

हा मनोगज अनावर मातें, । नावरे मज, चराचरमाते, ॥
सिंहवाहिनि, शिवे, जगदंबे । रक्षिं तूं प्रणतभक्तकदंबे. ॥ २५

( सामराज ' रुक्मिणीहरण ' सर्ग ३, श्लोक ९९ ते १२४. )

## ८. रुक्मिणीपत्रिका : : :

[ अगतिक होऊन रुक्मिणीने श्रीकृष्णास एक पत्र लिहिले आणि ते सुदेव नावाच्या ब्राह्मणाकरवी द्वारकेस श्रीकृष्णाकडे धाडले. सुदेवाने ते पत्र श्रीकृष्णाकडे दिले. ते हे पत्र. ]

द्विजें श्रीकृष्णाच्ये तदुपरि करीं पत्र दिधलें,
तयानें लाखोटा उखळुनि असे जें उकलिलें. ।
तयाला वैदर्भी स्वलिखितमिषें भेटत असे.
जयेच्या प्रेमाचा अतिशय असाधारण दिसे. ॥ १

जेथें वठे रुचिर कुंकुमबिंदु शोभा,
लाजे जिला कनककेतकगर्भगाभा; ।
आली असे प्रकृत जे प्रतिमा प्रियेची,
ते पत्रिका हळुच यादवराव वाची. ॥ २

जैसी असे विमल वोवणि मोतियांची,
तैसी वसे सहज ठेवणि अक्षरांची; ।
ओजःप्रसादमधुरादिक संपदांची,
शोभा धरून विलसे रचना पदांची. ॥ ३

" तीर्थस्वरूपचरणा, करुणानिधाना,
प्रौढप्रतापमिहिरा, प्रथिताभिमाना, ।
सौजन्यसिंधुसदना, मदनाभिरामा,
सर्वोपकारनिरता, समत्रासकामा, ॥ ४

राजाधिराज, यदुवंशशिरोवतंसा,
कंसांतकासुररिपो, कमळानिवासा, ।
राजश्रियासह विराजित राजमान्या,
वंदी तुझे चरण भीमकराजकन्या. ॥ ५

येथील हें कुशळ जाणुन लेखकाला,
आज्ञापिजे निजमहोत्सवलेखनाला ।
हें लीहिलें प्रकृत केवळ संप्रदायें;
मानूं नये परि यथार्थच देवरायें ॥ ६

विज्ञापना परिस यादववंशवीरा,
योगींद्रहृत्कमळपंजरगर्भकीरा ।
हातास ये त्वरित आजि उडोन माझ्या.
वार्ता मला श्रवणगोचर होति तूझ्या. ॥ ७

माझा मनोमधुप लुब्ध बहूत जाला.
तूझ्ये पदांबुजयुगीं रहिवास केला ।
काकूलती बहुत याजनिमित्त येतें,
कृष्णा, तुझे चरणपल्लव हे धरीतें ॥ ८

जे आयकेत भवदीय गुणौघ कानीं,
त्यांचे निवेति उगले मग ताप तीन्ही ।
जे पाहती अति मनोहर रूप देवा,
त्यां डोळसां अखिळ लाभ अपूर्व व्हावा ॥ ९

जन्मास या तुजनिमित्तच जाण आलें.
आईकतां गुण तुझे, सजणा, न धालें ।
हे अच्युता, मन मना नकळेंच तूझें
तूझे पदीं परि अपत्रप चित्त माझें ॥ १०

सर्वां गुणीं तुजसमान, महा वदान्या,
ते कोण तूज नवरी न वरील धन्या ? ।
विद्यावयद्रविणरूपगुणौघधामा,
कृष्णा, नृसिंह, नरलोकमनोभिरामा ॥ ११

या कारणें नियत स्यां वरिलास भावें.
येऊनियां त्वरित तां मज आजि न्यावें ।
हा लागला जिव असे तुजवीण जाया.
तूं आपली मज हरी करि आजि जाया ॥ १२

हा वीरभाग शिशुपाळ जयीं विटाळी,
वीरामधें तुरुत होईल येकि टाळी. ।
लज्जा तजून धिट आणिक येक बोलें,
सिंहाभिषा हरुनि नेइल आजि कोल्हें! ॥ १३

यागादिदाननियमव्रतदेवपूजा,
केली असे, तरिच होइल लाभ तूझा. ।
येऊनियां त्वरित फार गदाग्रजानें
पाणिग्रहास करिजेच चतुर्भुजानें. ॥ १४

पर्वा असे लगिन निश्चित जाण भावें,
सेनेसमेत अति गुप्त बहूत यावें. ।
मंथून चैद्यमगधेशबळासि धीरा,
रक्षोविवाह विधिनें मज नेयिं, वीरा. ॥ १५

अंतःपुरांतुन वधू न वधून बंधू.
नेऊं कसी म्हणसि तूं पुरुषार्थसिंधू? ।
यांच्ये कुळी नववधूस असे विचित्रा
लग्नास पूर्व दिवसीं कुलदेवियात्रा. ॥ १६

ग्रामास सन्निध निकेतन अंबिकेचें,
जें हें असे निजमनोरथदायिकेचें; ।
तेथें बसोन घटिकाद्वय वाट पाहें,
मी ही नये तरि तुझी मज आण आहे. १७

तूझ्या पदांबुरजःस्नपनें शिवाला
अज्ञाननाशनमहोत्सव थोर जाला. ।
एतन्निमित्त सनकादिक लुब्ध होती,
तूझा पदांबुजरजःकण इच्छितातीं. ॥ १८

जैं हा तुझा चरणलाभ मला न व्हावा.
त्यां निश्चयें तरि हरी मग जीव द्यावा. ।
घेईन मी तुज निमित्त सहस्र जन्में,
त्वत्प्रापकें करिन नित्य अनेक कर्में. ॥ १९

विज्ञापना शपथपूर्वक तूज केली.
येथील तों सकळ रीति कळोनि गेली ।
आणीक काय निपुणाप्रति त्यां ल्यहावें.
तां येक वेळ सगुणा इकडे पहावें ॥ २०

नारायणा, निखिळवृष्णिपते, मुकुंदा,
टाकून दे मजनिमित्त समस्त धंदा ।
दासी तुझी परम लालस वाट पाहे.
तूझे त्वरेस बहु यावरि मोल आहे. ॥ २१

हेजीव हे जीभचि जाण माझी.
येथें नसो किमपि विप्रतिपत्ति तूझी ।
पत्रांत लेख्य अवशिष्ट असेल कांहीं,
याच्या मुखें विदित होइल तूज तेंही. " ॥ २२

(सामराज ' रुक्मिणीहरण ' सर्ग ५, श्लोक ८३ ते १०४)

## ९. कृष्णास ते नमनपूर्वक माळ घाली ‡ ‡ ‡

[ रुक्मिणीने पत्रात सुचविल्याप्रमाणे ती विवाहापूर्वी अंबिकेच्या दर्शनाला नगराबाहेर आली. तिच्याभोवती परिवार आणि रक्षणार्थ सैन्यही होते. अशा अवस्थेत ती देवालयाजवळ रथासह येऊन उभ्या राहिलेल्या कृष्णाकडे गेली आणि तिने त्याच्या कंठात माळ घातली. )

कृशोदरी, कुंडलमंडितेक्षणा,
शुचिस्मिता, जे सुंदरी सुलक्षणा, ।
जे पक्वबिंबीफळसोदराधरा,
ते होय वीरां मग दृष्टिगोचरा ॥ १

व्रीडावलोकनविमिश्र तदीय हासा
देखोन, ते पडति वीर मनोजफांसां ।
उत्साह जे बहुत थोर धरून आले,
राजन्य ते परम मूर्च्छित सर्व जाले ॥ २

हस्तांबुजींहुन गळोन पडेत शस्त्रें.
चित्रांपरी धरिति भूषण आणि वस्त्रें ।
यानांवरून कितियेक पडेत खालें.
येकायकीं नृपतिमंडळ मुग्ध जालें ॥ ३

जों पावलें सकळ राजक हे अवस्था,
तों चालिली सहज तेथुन पद्महस्ता ।
कृष्णार्पण प्रकट देह करूनि राहे,
ते भीमकी भगवदाप्तिस इच्छिताहे ॥ ४

वारून वामकर जी अळकांस बाळा,
तैसें अपांगविशिखीं अपरां नृपाळां, ।
आलोकिते सभय सादर अच्युतातें
सव्रीड साचिवदना, पुरुषोत्तमातें ॥ ५

तें सांवळें, सगुण ब्रह्म कृपाकटाक्षीं
सस्मेर तन्मुखसरोरुह हें अवेक्षी ।
दृष्टीस दृष्टि जंव नीट मिळोन गेली,
ते भीमकी हळुच त्याजसमीप आली । ६

कीं चक्रवाकरमणीच वियुक्त जाली
ते चक्रवाक उमगीतच काय आली ? ।
कीं मानसा तजुन मानसराजहंसी
आसक्त हे परमहंसकुळावतंसीं ? ॥ ७

कल्पद्रुमाजवळि जंगम कल्पवल्ली
कीं येय हे हळुच चालत पायचाली. ।
कीं चातकप्रणयिनीच निदाघतप्ता
धांवोन ये नवघनाभिमुख तृषार्ता ! ८

किंवा तजून विषयांकुरमात्रचारा
मेघ्या मृगी अनुसरे निज कृष्णसारा;
किंवा महोदधि गवेषित येय गंगा,
कीं भेटली रतिच येउनि या अनंगा. ॥ ९

हे भीमकी सहचरीसहित त्रिवेणी;
प्रत्यक्ष हा वटमयीरुह चक्रपाणी. ।
जेणें सुटे सहज हा भवबंध, राया,
तो तीर्थराज प्रगटे जग उद्धराया. ॥ १०

तत्काळ इंद्रियपराङ्मुख वृत्ति जाली.
श्रीकृष्णमूर्ति हृदयीं विवरों निघाली. ।
हारोन जाय मकरध्वज कोटिशोभा.
पाहे न्यहाळुन तया मग पद्मनाभा ॥ ११

चतुर्भुज श्यामळरूपधारी,
जो शंखचक्राब्जगदा उभारी, ।
उभा असे जो रणभूमिभागीं,
घेऊनियां चंदनऊटि आंगीं. ॥ १२

कंठस्थळीं कौस्तुभ दिव्य भासे
मुखेंदु सानुग्रह मंद हांसे ।
उत्फुल्लकंजोपमनेत्र दोन्ही
ते कुंडलें हो झळकेति कानीं ॥ १३

ते साजिरी उन्नत नीट नासा,
शोभा महा भ्रूलतिकाविलासा. ।
टिळा ललाटीं निट केशराचा,
तो बिंदु शोभे वरि कस्तुरीचा. ॥ १४

धम्मिल्ल शोभे मृदु कुंतलांचा.
संवेष्टिला हार असे फुलांचा ।
किरीट माथां जडित प्रकासे.
रत्नावतंसद्युति हे विकासे ॥ १५

हीरांगदें शोभति बाहुदंडीं.
रत्नीं कडीं हें खचितें उदंडीं ।
उद्योत तो उत्कट ऊर्मिकांचा,
प्रकाश जेथें पडला नखांचा ॥ १६

श्रीवत्सलक्ष्मी सविशेष शोभा। वसे विधी नाभिसरोजगाभां ॥
वक्षस्छळीं उज्वळ वैजयंती। पदाब्ज सेवी त्रिदिवस्त्रवंती ॥ १७

पीतांबराचें परिधान साजें। कटिप्रदेशीं रशना विराजे ॥
त्या किंकिणींचा समुदाय वाजे। वाकी पदीं तोडरयुग्म गाजे ॥ १८

आविर्भवे केवळ शंबरारी। शृंगार किंवा अवतारधारी ॥
जें जें, अहो, रुक्मिणि अंग पाहे। तैथेंच ते दृष्टि जडोन राहे ॥ १९

पहातसे विश्वमनोभिरामा। कदा न पावेच विराम रामा ॥
जो हारि हा दुर्लभ योगियांला,। प्रत्यक्ष तो दर्शनलाभ जाला ॥ २०

मिळे शशांकास अहो विशाखा;। किंवा अशोका सहकारशाखा; ॥
हे साधकासन्निध सिद्धि आली,। किंवा विरक्तान्वित शांति जाली ॥ २१

जाला इला चरणदर्शनलाभ जेव्हां,
प्रेमार्द्रलोचन यदूद्वह होय तेव्हां।
तिर्यङ्मुखी सभय लज्जित फार जाली.
कृष्णास ते नमनपूर्वक माळ घाली ॥ २२

( सामराज ' रुक्मिणीहरण ' सर्ग आठवा, श्लोक १३७ ते १५९ )

## १०. धनुर्भंग

[ सीतास्वयंवरप्रसंगी जनकाने शिवधनुष्य सभेत आणले. मंडपात अनेक राजे जमले होते. त्यांमध्ये रावणही आला होता. त्याने शिवधनुष्य उचलण्याची शर्थ केली. परंतु ते धनुष्य त्याच्या उरावर पडून तो मूर्च्छित झाला. यानंतर राम पुढे सरसावला... ]

दशग्रीव काचावला मानभंगें, महा कार्मुकें चूर्ण केलीं षडंगें,
सभेमाजि राजे भयाभीत झाले, सुपर्णापुढें सर्प जैसे बुझाले. ॥ १

सदसिं जनकरायें काय विज्ञप्ति केली ?
दशवदनभुजांची शक्ति खुंटोन गेली; ।
लववुनि शिवचापा ज्या चढे त्या उदारा;
त्रिभुवनजयलक्ष्मी मैथिली होय दारा. ॥ २

गांभीर्य धैर्य बहु वीर्य तुम्हांसि आहे, यांमाजि एकहि नुठे धनुषा न पाहे ;
पृथ्वींत वीर दशकंधर काय होता, तो भंगला गरुडदृष्टिं जसा कपोता. ॥ ३

राजे स्तब्ध भयासि लुब्ध अवघे वाग्बद्धचित्रोपमा,
प्रेतप्राय अधोमुखें न वदती जाणोनि त्यांची क्षमा; ।
राजा बोलतसे तटस्थ नृपती टाकोनि संभाषणें,
'निःसंदेह मला गमे वर नसे श्रीजानकीकारणें. ॥ ४

भूगोळीं जितुके महींद्र तितुके आले सभासंगमा,
कन्या हे कलधौतसुंदरगुणी श्रीकीर्तिलाभोद्यमा, ।
धोढीना ठणकारिना लववीना उत्थापना ये स्थळीं
कोणीही न धरी महाधनु करीं निर्वीर उर्वीतळीं.' ॥ ५

ऐसें उत्तर आइकोनि ऋषिनें रामाकडे पाहिलें,
'आज्ञा', पूज्य समर्थ राघव म्हणे तों लक्ष्मणें बोलिलें, ।
'झाला रावणमानभंग जनकें निर्वीरसें मानिलें
हा तों शब्द न साहवे रवीकुळीं आम्हां उणें आणिलें.' ॥ ६

आवेशें दृढ कास घालुनि म्हणे दोर्दंड मर्दूनियां,
'माझें' कौतुक पाहणें नृपसभेमध्यें तुम्हीं स्वामियां, ।
मेरू मंद्र समुद्र चंद्र न गणीं दासास आज्ञा किजे,
हें तों जीर्ण पिनाक काय गणना सामर्थ्य वीलोकिजे.' ॥ ७

राघवें मधुर बोलिलें कसें, लक्ष्मणा ! क्षणभरी उगा असें, ।
कौशिकें मज समर्पिलें जरी, एकल्या नच चटे उठें तरी. ॥ ८

पाहें सुमित्रा उगलाचि बैसें, निर्वीर उर्वीतळ होय कैसें, ।
आम्हांसि हा शब्द उणा न साहे, राजा मनीं विस्मित होय राहे. ॥ ९

घातली सदृढ कास राघवें, वंदिलें गुरुपदाब्ज लाघवें, ।
ठेविला वरदहस्त मूर्धनीं, 'पाव तूं विजय चाप मर्दुनी.' ॥ १०

जनकजा मिरवे उपरीवरी, सहचरी वसनांचळ सांवरी,
सखि म्हणे, 'रघुवीर उभा असे, धनुष भंगिल संशय हा नसे ॥' ११

ती भूमीसि म्हणे, 'उमाणिधनुषा ! रामासि साह्या करीं,
शेषा लोटिं शरासनासि तपना ओढीं सहस्रां करीं, ।
शंभूकार्मुक आवरीं दशभुजीं पृष्ठीसि कूर्मा धरीं,
चापा दिग्गज हो ! धरा विधि तुवां होई हळू तें करीं. ॥ १२

तीर्थव्रतें जप पुरश्चरणादि दानें, उद्यापनादि हवनें द्विजभुक्तमानें, ।
साह्या करोत सुकृत पूर्विल आजि मातें, भंगो शरासन खरें रघुवीरहातें.' ॥ १३

नाना तिणें नवसिले सुर भूमिसाक्षी, भंगावया धनुष ऊदित सर्वसाक्षी; ।
श्रीमूर्ति ते उभि असे भुपतींत देखा,त्याच्या स्वरूपिं दुसरा करि कोण लेखा ? ॥ १४

केयूरांगद कुंडलें मनगटीं, जांबूनदें कंकणें,
वांकी तोडर गर्जती घनरवें पादांबुजीं भूषणें; ।
सीताचित्तमयूर नृत्य करि तो श्रीराम सर्वांपुढें,
धीरोदार उभा प्रतापमहिमा नेणेति शास्त्रें मुढें ॥ १५

राजे मानवदेवदानवसभे नृत्यांगना नाचती,
वाद्यांचे घनघोष होति, अवघे रामाकडे पाहती; ।
नाना तें चतुरंग सैन्य परिधीं पाहों उभें ठाकलें,
विप्रांचे जयशब्द होति अवघे चित्रोपमा थोकले. ॥ १६

भाळीं लाउनि तर्जनी भुजलता भूपां पुनें मर्दिल्या,
ज्यांला भूषण सुंदरें अतिमणी विद्युल्लता वर्जिल्या; ।
तेजःपुंज कटाक्ष कंजचरणीं झुंकारतीं नूपुरें,
कांची किंकिणि घंटिका लघुकटीं ब्रीदें अती सुंदरें.॥ १७

उल्हासें चमकोनि जाय धनुषापाशीं उभा राहिला,
सांगातें अवघे पुरोहित पुढें श्रीराम तो एकला; ।
कोदंडासि सभेसमोर उजवें घालोनियां वंदिलें,
दोर्दंडें उचलोनियां चढविलें कर्णान्त तें ओढिलें. ॥ १८

रामानें सहवर्तमान मुनिच्या कोदंड उच्चालिलें,
राजे आणि विदेहसंशयधिया संयुक्त आस्फाळिलें; ।
सीताचित्तसमेत ओढुनि भृगूपुत्रादि साहंकृती
त्यांचा दुर्मद गर्व भंगुनि धनुर्भृत्त्यक्तसर्वांकृती. ॥ १९

घोषें चाप कडाडिलें रघुपती कोदंड ओढी बळें,
तेव्हां कोटि कडाडिलें घन विजा कोदंडकोलाहलें; ।
सीमा सांडिति सिंधु, मस्तक तुकी शंभु स्वयें आपुलें,
ते सर्वै भुप राम शक्ति नयनीं देखोनि वेडावले. ॥ २०

कोपे शेष उलंडलीं उडुगणें, हेलावला वारिधी,
राजे विस्मित, राम सस्मित उभा, जो शौर्यतेजोनिधी; ।
विश्वामित्र सुमित्र मित्र अवघे भूपाळ मारू कुरू,
लंकेशा जनकादि त्यांत विजयी कोदंडदीक्षागुरू. ॥ २१

निक्षत्री क्षितिचक्र एकविसदां केलें बळें भार्गवें,
युद्धीं राक्षस दुष्ट दैत्य वधिले चापाचिया आर्जवें; ।
तीं पापें धनुषासि घोर घडलीं प्रायश्चिता योजिलें,
देह श्रीरघुनाथपाणिकमळीं तीर्थीं परित्यागिलें. ॥ २२

पुष्पें निर्जर वर्षले, ‘ जय जय श्रीराम ! ’ गर्जिन्नले,
स्वर्गीं वाजति देवदुंदुभि, तुरें भूर्लोक संतोषले; ।
निर्घोषें बहु गर्जल्या नभ दिशा संपूर्ण नादें भरे,
सीतेच्या स्फुरती भुजा रघुविरा भेटावया आदरें. ॥ २३

निशाणाच्या घायीं ध्वनित बिरुदाईत विजयी,
ऋषी विश्वामित्रादिक सुखि सुमित्रादि विषयी; ।
पुढें झाले राजे रघुपति विराजे तदुपरी,
उभी पाहे सीता प्रमुदित धराया धनुकरी. ॥ २४

पुढें आला बाहो पसरुनि तदा कौशिकमुनी,
तयातें वंदूनी रघुविर वदे नम्रवचनीं, ।
म्हणे, ‘ स्वामी झाला विजय धनुषापासुनि मला,
गुरुआशीर्वादें सकळ भवसंताप हरला. ’ ॥ २५

सौमित्रा परिरंभिलें रघुविरें राजे यथानुक्रमें,
अर्धोन्मीलित नेत्र रावण दिसे जो चेवला विक्रमें; ।
श्रोत्रीं साधु महानुभावअवघीं श्रीराम आलिंगिला.
रत्नें कांचनपर्यळीं प्रणयिनीं काकुत्स्थ ओवाळिला ॥ २६

सभेमध्यें नेला रघुविर समस्तीं नृपवरीं,
दिसे जैसा मेरू मणिमयमहाशैल निकरीं; ।
विमानें देवांचीं निबिड दिसती दिव्य गगनीं,
कसा आकर्षीतो सित रघुपती पाहुं नयनीं. ॥ २७

रंभा उर्वशी मेनिका नृपसभे इत्यादि देवांगना,
आल्या नृत्य करावयासि सरिसे गंधर्वही गायना; ।
भाटादी गुण वर्णिती, जनक दे सत्कार त्यांकारणें,
झालें राम निरीक्षितां सुरवरां नेत्रांबुजां पारणें. ॥ २८

( विठ्ठल-‘ सीतास्वयंवर ’ सर्ग ५, श्लोक १ ते २८ )

## ११. राम–परशुरामसंघर्ष ↔ ↔ ↔

[ रामाने शिवधनुष्याचा भंग केला हे ऐकून रागावलेला परशुराम रामाकडे आला. त्या वेळीं चारी मुलांची लग्ने लावून दशरथ सर्वांना बरोबर घेऊन अयोध्येकडे चालला होता. अशा वेळीं राम-परशुराम यांची झालेली चकमक पुढील उताऱ्यात वर्णिली आहे. )

गजस्कंधीं चारी नवचवरडोलीं वधुवरें
  पुढें नाना वाद्यें अपशकुन झाले अवसरें, ।
तया विश्वामित्राप्रति दशरथें चिन्ह पुशिलें,
  भविष्याचें प्रत्युत्तर मुनिवरें त्यासि दिधलें. ॥ १

हातीं कार्मुक सज्ज, वेद वदनीं, द्वीतूण पृष्ठीवरी,
  तो ' शापादपि ' ही ' शरादपि ' तपी क्षत्र्यांवरी केसरी ।
भस्मोद्धूलितमौलि, लांछन उरीं रुद्राक्षमाला धरी
  मांजिष्ठांबर ब्रह्मदंड रशना व्याघ्राजिनें उत्तरीं. ॥ २

राघवें धनुषदंड भंगिला भार्गवें परम कोप मानिला. ।
पातला रघुविरा जिणावया राघवारहित मानिती भया. ॥ ३

म्हणे, ' काकुत्स्था ! रे ! नयनतनुवेळा भुजबळी
  धरित्री निक्षत्री करुनि विजयी मी द्विजकुळीं ।
प्रतापें ज्यां केलें असुररुधिरें तर्पण रणीं
  तुसीं झूजों आलों शिवधनुषभंगप्रकरणीं. ' ॥ ४

भाळीं विस्तृत कंकपिच्छ शर ते सोडी भुजातें तुळी
  बाणें बाण निवारिले रघुविरें घालूनि गोधांगुळी; ।
देखे विक्रम आगळा मग म्हणे, ' तूं कोण रे ! झूजसी. '
  त्यांतें उत्तर दे रघूत्तम वदे, ' सर्वज्ञ तूं जाणसी. ' ॥ ५

क्षत्री मी रविवंशिचा, कुळगुरू आम्हां वशिष्ठा असे,
दिव्यास्त्रें उपदेशिलीं मुनिवरें श्रीकौशिकें तापसें. ।
आम्ही ब्राह्मणभक्त शस्त्र न धरूं आज्ञा गुरूची असे,
'मूर्ध्नी छेद' म्हणोनि मस्तक पुढें श्रीराम लोटीतसे. ॥ ६

स्वामीसीं वदतों यथार्थ न घडे संग्रामवार्ता कदा,
देवा! तूजपुढें हिणें नृपकुळें दीनासमानें सदा. ।
आम्हां एकगुणें धनुर्बळ असे बोले गिरा कोवळी,
स्वामीचें बळ आगळें नवगुणें यज्ञोपवीतें बळी. ॥ ७

रिता देखे भाता, धनुष नुसतें पैं लडबडी,
न चाले रामासीं मग परशुपाणी हडबडी, ।
म्हणे आतां मोडीं म्हणवुनि दिल्हें वैष्णव धनु
बलप्रौढी दावी मग समरभूमीप्रति ननु ॥ ८

धनू भंगावें तों कर परशुरामें गंवसिला
समाधानें रामें हृदयकमळीं राम धरिला. ।
म्हणे, 'घेई रामा उचित दिधलें वैष्णव धनु,'
दिल्ही आज्ञा गेले मिरवत अयोध्येप्रति ननु. ॥ ९

(विठ्ठल--'सीतास्वयंवर' सर्ग ७, श्लोक ३३ ते ४१)

## ११. त्रिदंडीवेषधारी अर्जुन ++ ++ ++

[प्रायश्चित्तार्थ तीर्थयात्रा करीत असता अर्जुन द्वारकेजवळ रैवतक पर्वताच्या परिसरात आला. सुदैवाने श्रीकृष्णही मृगया करण्यास तेथे आला होता. दोघांची गाठ झाली आणि अर्जुनाने आपल्या मनीची व्यथा त्यास सांगितली. बळराम हट्टाने सुभद्रा दुर्योधनास देणार होता. अर्जुन व सुभद्रा यांचे पूर्वीचे प्रेम होते त्यामुळे या वार्तेने दुःखी झालेल्या अर्जुनाला श्रीकृष्णाने पुढील उपाय सुचविला. अर्जुनाने त्रिदंडी यतीचा वेष घेऊन रैवतक पर्वतावरील गुहेत निवास करावा. तेथे बळरामदादा विहार करण्यास येतील तेव्हा या यतीला पाहतील आणि यतींच्या ठायी त्यांची भक्ती असल्यामुळे ते या विरक्त यतीला चातुर्मास्यात द्वारकेतील आपल्या मंदिरात येऊन राहण्याचा आग्रह करतील. तो अर्जुनाने थोडेसे आढेवेढे घेऊन मान्य करावा. कृष्णार्जुनांच्या या अंदाजाप्रमाणे बळराम रैवतक पर्वतावर आला व त्यानंतर घडलेला प्रसंग पुढील उताऱ्यात वर्णिला आहे.]

### चूर्णिका

**अहो अस्मिन्नवसरीं। सकळ अमरासुरनर-नमस्कृत-चरण भवभयहरण नारायणांश—कळाष्टभावतारमूर्तिमंत श्रीमंत भूभारसंहारक संकर्षण सात्वत-वृंदानंदसंदोह महानुभाव। देवगंधर्वनरनागवनितासमूहमावेष्टित। क्रीडार्थ निजदयित रैवतकपर्वतकवनीं। अवनीभुजमंडण तालांकध्वजभूषित महारथारूढ आरूढ यौवत महापुरुष परंज्योतिस्वरूप लीलानाटकसूत्रधार सकळजगदाधार येता झाला॥ १**

**प्रथम-वर्षागम-समयीं। नानाद्रुमफलपक्वभारभूषित नमितशाखामंडित खर्जुर जंबु जंबीर रसाल पनसाद्यनेक तरुवर नम्रशिर विनीतवत् परम सादर। निज सेवनार्थ तत्पर विलोकित आनंदभरित नाना तरुकोटरस्थित-वारुणीरसपानासक्त। प्रमत्तआरक्त-कमलदलायत-चारुनेत्र विकसित-मंदार-सुमनदाम - कलित - कंधर पुरंदरादिदिविजवंदित-पदारविंद सानंदसुंदरीसह संचार करितां अकल्पित अर्जुनाश्रमकृत-शोभित-नगराजदरी अवलोकिली॥ २**

## श्लोक

देखे तें यतिराज राजकुळिचा संन्यासवेषा धरी।
काषायांबर दंडमंडित दिसे जो शोभवीतो दरी ॥
संन्यासिप्रिय राम मानित तदां आश्चर्य चित्तांतरीं।
हा तों नूतन-सद्वयस्क असतां भिक्षुत्व कां स्वीकरी ॥ ३

वैराग्यें धारिलें स्वरूप सगळें तैसा दिसे लोचना।
नाहीं यासम निस्पृही कवणहीं कामीं न योजी मना ॥
कंदें मूळ-फळें जळें करितसें प्राणाचिया धारणा।
कव्हीं ते उपवास निर्जळ करी कव्हीं करी पारणा ॥ ४

लोकांचा सहवास टाकुनि कसा एकांत अंगीकरी।
नालोकी नगरापुरासि अटवीं हे सेविलीसे दरी ॥
याला पूर्ण विरक्ति बाणुनि असे निःसंग ऐसा दिसे।
नैरापेक्ष्यपदासि पाउनि वसे स्वानंद या उल्लसे ॥ ५

ऐसे चिंतुनि मानसीं झडकरीं आला समीप-स्थळीं।
याची दीप्ति विलोकितां म्हणतसे हा धन्य पृथ्वीतळीं ॥
श्रीनारायणमंत्रपूर्वक करी दंडापरी वंदना।
संन्यासी हरिरूप मानव नव्हे हे अंतरीं भावना ॥ ६

तो नारायण उच्चरोनि बसवी तालांक दर्भासनीं।
संतोषें करि सुप्रसन्न-मनसें संप्रश्न रामा मुनी ॥
त्यातें राम पुसे सतोषविनयें बद्धांजुळी सादरें।
येणें कोठुनि या स्थळासि अपुलें स्वामी वदा विस्तरें ॥ ७

सांगे अर्जुन धर्मराजनिकटीं होतों हळी आयकें ।
इंद्रप्रस्थपुरासमीप वसतां धर्में धरानायकें ॥
केला मान परंतु निस्पृह अम्हीं आहों यती संगती ।
नोहे योग्य कधीं गृहाश्रमवतांसंगें अम्हां सन्मती ॥ ८

आलों भूभ्रमणार्थ तीर्थनिवहीं स्नानें तनू पाविली ।
श्रीविष्णू-शिवमंदिरें सुखकरें दृष्टी यया देखिली ॥
ज्ञानी श्रेष्ठ महानुभाव बहुतां क्षेत्रीं अम्हां भेटले ।
सत्संगामृत-भाषणें दिवस स्यां कित्येक ते लोटिले ॥ ९

आतां रैवतपर्वतासि सहजें मी पांथ आलों परी ।
वर्षाकाळ समीप देखुनि बरी स्यां सेविली हे दरी ॥
चातुर्मास्य-दिनासि कंठुनि पुन्हा जाऊं तया सुस्थळा ।
जेथें धर्मज सत्यधर्म विलसे जो सत्यसंधागळा ॥ १०

ऐसे ऐकुनि पार्थ भाषण मनीं संतोषला राम तो ।
प्रार्थी वंदुनि सादरें यतिवरा योगींद्रविश्राम तो ॥
चालावें विभु मंदिरासि अमुच्या कंठोनि वर्षादिना ।
द्यावा सत्सहवास पावन करा बद्धां गृहस्थांजना ॥ ११

तुम्ही सूर्य तसे जगांत फिरतां लोकांचिया तारणा ।
हृत्पद्मीं निशिवार ठेउनि असां त्या आदिनारायणा ॥
तोहीं तों तुमच्या हृदब्जनिलया सोडीचना श्रीहरी ।
भक्तिप्रेमनिबद्ध गुंतुनि वसे अन्य स्थळां नादरी ॥ १२

तुम्हां जे भजती सतोष पुजिती अन्नोदका अर्पिती ।
ते त्रैलोक्यपती हरीस पुजिती ऐशा फळा पावती ॥
यासाठीं करुणा करोनि सदना चाला प्रभू सत्वरें ।
साक्षाल्लोकनिवास कृष्ण निरखा नेत्रीं यया सादरें ॥ १३

ज्यासाठीं करिती तपें कठिण तें ध्याताति योगी मनीं ।
ज्यासाठीं व्रतनिष्ठ आचरति तें कित्येक तीर्थाटणी ॥
यज्ञें याज्ञिक नित्य अर्चिति तया तो यादवांच्या कुळीं ।
झाला भूभरवारणार्थ सुजना रक्षावया भूतळीं ॥ १४

भूपांचे मद दर्प मंथुनि करी सोळा सहस्रांगना ।
सर्वांही सदनांत नित्य वसतो जो अंतरायाविना ॥
सत्यज्ञानसुखस्वरूप विभु तो निर्लेप सर्वांघटीं ।
राहे व्योम तसा अलिप्त करितो याहीं जगीं राहटी ॥ १५

त्याचा कीं सहवास होयिल तुम्हां देखोनि तुम्हांप्रती ।
तोही पावल तोष फारचि पहा भिक्षुप्रिय श्रीपती ॥
तो निष्किंचनवित्त यास्तव मुनी निष्काम जे निस्पृही ।
त्यांचें दास्य करी समस्त पुरवी राहोनि त्यांचे गृहीं ॥ १६

ऐसा हा जगदीश नांदत असे द्वारावतीभीतरीं ।
चालावें करुणाघनीं जरि मना माने विनंती तरी ॥
ऐसा राम सुधोपमान वचनें विज्ञापना ती करी ।
तेव्हां पार्थ सदुत्तरें श्रुतिमतें बोलोनि तोषा करी ॥ १७

यावें त्वत्सदनासि तूं विनविसी आम्हां वनें काननें ।
श्रीदेवायतनें गुहादरकुट्या केल्या विधीनें मनें ॥
नाना हे नगराज अर्पिति सदां स्वाधिष्ट भिक्षाफळें ।
गोडा वाहति या नद्या अघहरा देती जळें शीतळें ॥ १८

कंदें मूळ फळें अम्हांसि रुचती कंथाजिनें वल्कलें ।
काषायांबर आमुचे जिणति त्या पीतांबरातें बळें ॥
रुद्राक्ष स्फटिकादि दिव्यतुळसी पद्माक्षधात्रीफळें ।
माळा या नवरत्नसाम्य, न गणूं या तुल्य मुक्ताफळें ॥ १९

हो का चंदन एणनाभि अथवा काश्मीरपंकाहुनी ।
आम्ही शुभ्र विभूति भूतिद असी सानंद मानूं मनीं ॥
आम्हातें करकंजपात्र मिरवे तोयाचिया प्राशना ।
बाहू हे उपबर्ह्ह काय करणें ऊंशा अम्हां सद्‌गुणा ॥ २०

शय्या भूमितळीं सुरम्य पुलिनी कीं शाड्वलीं कोमलीं ।
राका चंद्र सुदीप, चामर अम्हां संप्राप्त मंदानिळीं ॥
भोगूं श्रेष्ठ विरक्ति मुक्ति बरव्या तुर्यानुभूति स्त्रिया ।
आम्ही तो यतिराज, राजस जनीं संसर्ग तो कासया ॥ २१

त्वां पूर्वीं कथिलें हरी विलसतो द्वारावतीभीतरीं ।
तो आहे जड जंगमांत समुद्या व्यापोनि नानापुरीं ॥
आम्ही तो निरखीतसों जनिवनीं सर्वाद्य सर्वास्थळीं ।
त्यासंगेंचि सदां अम्हीं रमतसों अंतर्विविक्तस्थळीं ॥ २२

भोगी एकचि वेळ राहुनि घरीं सोळा सहस्रांगना ।
याचें कैं नवलाववर्णन किजे या आदिनारायणा ॥
जो मार्यीं अपुल्या अनंत रमवी शक्तीस सद्वैभवें ।
नाना नाटकशक्तिचक्र नटवी आश्चर्य कैं संभवें ॥ २३

सर्वत्रीं विभु पूर्ण चिद्गगन हा सर्वेश सर्वां घटीं ।
आहे व्यापक एकला गुण तसा व्यापोनि सारा पटीं ॥
भांडीं मृत्कनकेंचि जाण वसिजे सर्वस्व आभूषणीं ।
तैसा हा जगदात्मरूप विलसे सर्वत्र आत्मा धणी ॥ २४

ब्रह्मा आदि पिपीलिकांतकरुनी कोठेंचि नाहीं उणा ।
चेष्टेना परि तूळतंतु तरिही त्या श्रेष्ठसत्तेविना ।
आम्हांही हृदयीं प्रकाशक असे पाहोनि नारायणा ।
आहों स्वस्थ पुरीं प्रवेश करिजे कोणा तरी कारणा ॥ २५

प्रारब्धार्पण देह हा करुनियां जाळोनियां संचिता ।
केलें तें क्रियमाण भर्जित पुढें नाहींच चिंता कथा ॥
आम्हीं शांति वरोनि निर्भय असों डोहीं बुडाल्या गजा ।
मोठा ग्रीष्मज ताप काय भय दे संदेह नाहीं दुजा ॥ २६

आम्हां हेचि दरी पुरंदरपुरी हें काननें नंदनें ।
हे सारे तरु कल्पवृक्ष समजों संतोषपूर्णें मनें ॥
ज्याच्या अंतरिं पूर्ण तोष विलसे ऐंद्री तरी संपदा ।
मानी तुच्छ, यती तयासि म्हणिजे जो निंद्य नेच्छी कदां ॥ २७

आम्ही हा तरि लोकसंग समुदा सर्पापरी मानितों ।
व्याघ्री आसवली वृकी मरकटी नारी तशा पाहतों ॥
सोनें आणि शिळा मृदासम गणूं जाणूं मणी शर्करा ।
आम्ही निस्पृह, काय कारण कथी यावें हळी त्या पुरा ॥ २८

( निरंजनमाधव-‘ सुभद्राचंपू ’ सर्ग चौथा, श्लोक १ ते २८ )

## १३. अर्जुनविना नेच्छी कदां मीं पती ‡ ‡ ‡

[ बळरामाच्या विनंतीस मान देऊन यतिवेषधारी अर्जुन बळरामाच्या राजवाड्यात आला. बळरामाने तेथे सुभद्रेलाही यतीची सेवा करण्यास सांगितले. सुभद्रा अशी सेवा करीत असता त्या दोघांचे झालेले संभाषण पुढील उताऱ्यात आहे. अर्थात सुभद्रेला हा यती अर्जुन आहे याची बिलकूलही शंका आली नव्हती, हेच यातील नाट्यबीज आहे. ]

यीचें पाहुनि रूप तापितमनीं कंदर्प कांड्डे व्यथा ।
पावे पार्थ म्हणे कधीं हरिन मी साध्वी मना संमता ॥
हेही पाहुनि त्या यतीस सुदती आश्चर्य मानी मनीं ।
चित्रीं म्यां अवलोकिला विजय तो तद्रूप हाहीं मुनी ॥ १

होता धर्मनृपासमीप म्हणुनी हेही गिरा ऐकिली ।
सेवा नित्य करी समीप वसतां ते भीडहीं फीटली ॥
तेव्हां ते पुसते यतीस सगुणा संतुष्ट पाहोनियां ।
इंद्रप्रस्थपुरींत धर्मनिकटीं होतां कधीं स्वामिया ॥ २

तुम्ही अर्जुन लक्षिला निजदिठीं आहे बरा कीं सुखी ।
त्याचें वृत्त समस्तही परिसवा चित्ता करावें सुखी ॥
त्याचें तें गुणरूप वर्णन करा विश्रांति द्या या मना ।
त्याचें श्रीमुखपद्म लक्षिन कधीं वाटे असी कामना ॥ ३

तो भेटेल कधीं मला गुणनिधी तो कांत मातें घडो ।
आशीर्वाद करा मला गुरुकृपें मद्भाग्य हें ऊघडो ॥
नेच्छी हें मन अर्जुनाविण पती ऐका यती सांगतें ।
साचें हें तुमच्या पदाब्जयुगळीं मी आण ते वाहतें ॥ ४

ऐशी प्रेमरसांतरा प्रतिदिनीं बोले गिरा भामिनी ।
जैसे नारदभाषणा परिसिलें आलें तसें या मनीं ॥
बोले तीप्रति कुंतिभोजकुमरीगर्भाकरींचा मणी ।
तेव्हां अर्जुन ऐक वो म्हणतसे पार्थप्रिये कामिनी ॥ ५

बंधू पांचसमेत अर्जुन असे संपत्ति कांहीं नसे।
ऐशाचा तरि हेतु काय तुजला त्वां कामिला मानसें ॥
पृथ्वीमंडण राजराजमुकुटालंकार चूडामणी।
तो दुर्योधन तूं वरीं सुललने संपत्ति भोगीं जनीं ॥ ६

ज्याचे बांधव सत्पराक्रम पहा दुःशासनासारिखे।
तेही शंभर शंबरारिसम ते रूपें महानेटके ॥
माता आणि पिता बहूत कुळहीं स्वाधीन त्या मेदिनी।
सेनानायक कर्णसैंधव असे साहाय वीराग्रणी ॥ ७

भोगी सांप्रत सर्व हे वसुमती तो चक्रवर्ती असे।
नाहीं त्यासम अन्य भूप दुसरा जो योग्य तूला दिसे ॥
हे तों पार्थ समर्थ नोहति कदां वित्तें तथा वैभवें।
त्याला तूं वरिसी न तोष तुजला चित्तांत या संभवे ॥ ८

ऐसे ऐकुनि पार्थभाषण वदे मंदाक्षरें सुंदरी।
तुम्ही जो कथिला सुयोधन पती मीं त्याजला ना वरीं ॥
माझा एकचि भाव अर्जुनविना नेच्छी कदां मीं पती।
देवेंद्रादिक अष्ट दिक्पति तरी मीं नांगिकारी यती ॥ ९

होती पांडव पांच साच परि ते पंचाननासारिखे।
एकाहोनि विशेष एक बलधी यांसीं न कोणी तुके ॥
एका भीमबळासि शंभर तरी येती न ते साम्यता।
पार्थाच्या धनुटंकरा परिसतां ते पावती मूढता ॥ १०

हे सारे पुरुषार्थवंत जिणती एकेक ते मेदिनी।
पृथ्वीच्या भणगासि पूर्ण करिते आहेति रत्नीं धनीं ॥
आतेचा सुत कामसुंदर तसा कोदंडदीक्षा गुरू।
कृष्णाचा अतिमित्र अर्जुन मला सर्व प्रकारें वरूं ॥ ११

एकार्ने द्रुपदात्मजा सकळहीं पृथ्वीभुजामंडळीं ।
मच्छा भेदुनि कर्णमुख्य असतां वीरांतरीं जिंतिली ॥
जेणें खांडवदाह तो विरचिला देवेंद्रही पाहतां ।
केलीं आणिक दुष्करें बहुतसीं कर्मे सुरांदेखतां ॥ १२

तों हो कां धनहीन संपति नसो कांहींच त्याचे घरीं ।
तत्रापी धनदादिकां न करवे त्या अर्जुनासीं सरी ॥
ज्याचा मित्र अनंत त्यासि समते देवेंद्रही नातुळे ।
तेव्हां पामर कौरवेश्वर कसा दुर्बुद्धि त्यासीं तुळे ॥ १३

सूर्याच्या समतेसि कीटक कसा खद्योत येऊं सके ।
झाला पुष्ट अतीव सूकर तऱ्हीं कैं दिग्गजासीं तुके ॥
सिंहा श्वान समान होयिल कसा सांगा तुम्ही हें बरें ।
त्या उच्चैश्रवसासि साम्य करिजे कोणा उपायें खरें ॥ १४

शेषासीं अलगर्द येयिल समा कैं कूप ये सागरा ।
चांफ्यासीं तरि किंशुकें मग किजे स्पर्धा कसी नागरा ॥
जोडावें कमळासि काय सुमनें उन्मत्तवृक्षोद्भवें ।
काका कोकिलसाम्यता तरि कसी लोकांत या संभवे ॥ १५

मूर्खालागि सुरेंद्रदेशिक तया पंक्ती कसें आणिजे ।
तैसा पार्थसमान केंवि चतुरीं अंधात्मजा मानिजे ॥
जो सर्वज्ञ बलाढ्य रूपसगुणी शस्त्रास्त्रवेत्ता जनीं ।
त्यासीं कोण तुळेल साच न कळे हे शोधितां मेदिनी ॥ १६

आहे पार्थ तसा सुरांत हरिसा तीर्थांत काशीपुरी ।
तेजोवंत तयांत भास्कर तसा, गंगा नदीभीतरीं ॥
पाषाणांत मणी, चतुष्पदगणीं ते कामधेनू गुणी ।
पक्षांमाजि समर्थ त्यासि म्हणिजे जो राजहंसाग्रणी ॥ १७

... ग्रंथालय, ठाणे. स्वक्रमांक
क्र. : ७४०२२ दि: ... निर्गमक्रमांक
१९८५ ... ६१३५७

धातूमाजि सुवर्ण, त्या वनमृगीं पंचास्य जैसा बळी।
देहीं मस्तक पूज्य, चंद्र सिरवे तारांगणीं सोज्वळीं ॥
माधुर्यांत सुधा, मनुष्यनिवहीं राजा, यती आश्रमीं।
यज्ञामाजि तुरंगमेध, न तुळे वर्णांत विप्रोत्तमीं ॥

ऐशी सुभद्रामुख-कमळनिर्गत-हंसकलनिनदसमान हंसवाहिनी। ऐकोनि चतुरतरसमाज मुकुटरत्नें कानीं। परम विस्मय मानोनि मनीं। पुन्हां सस्मित सुवचनीं। नारी वचनसरणी पडताळी ॥ १९

●

म्हणे तूं पराधीन वो राजबाळी। अत्याग्रही बळिराम महाबळी। निग्रहें सुयोधनासि तुज देयील तयाकाळीं। यत्न काय तुझा चालेल वद वो वेल्हाळी। चातुर्यमणी चंद्रवदने ॥ २०

मायबाप बंधूजन। सर्व वर्तती हलायुधाधीन। तो तंव आग्रही दारुण। तूं तव अबळा सुलीन। कैसेनि पावसी वीराग्रेसर अर्जुन। अर्जुना अर्जुनवत गणोनि तुज वरील कौरवेश्वरसुयोधन। रामपक्षपातें निश्चयें ॥ २१

तेव्हां वदे सुभद्रासती। सस्मित-विकसित-रदरत्नदीप्ती। मज जरि राम अर्पील दुर्योधना निश्चिती। तदां धाडीन निजपत्रिका पार्थाप्रती। जैशी रुक्मिणी एकांतीं। संदेश-वचनें विप्राहातीं। पाठऊनि नेला यादवपती। अंबिकालयीं भूपाळपंक्ती। संनद्ध असतां हंसगती। वरिती झाली कृष्णासि निगुती। तैसीच मीही पृथानंदन वीर फाल्गुन सुमती। वरीन निश्चिती यतिवर्या ॥ २२

तोही गांडीवधन्वा महाबळी। उडी घालील मज निमित्तें तात्काळीं। चक्रवाकींसंकटीं अंशुमाळी। कृपेनें उदय करी प्रातःकाळीं। तद्वत् तमप्राय कौरव-मंडळी। मथोनि मज हरील वीरमौळी। तालांकसहित यादवफळी। भेडोनि नेयील सकळीं। अवलोकितां मृगराज स्वभाग बस्तमेळी। हरी तैसा निजप्रतापें ॥ २३

कदाचित न येतां राहील मज उपेक्षून। जरि मम प्राणप्रिय वीरअर्जुन। तरि निजदेहसंस्थित भूतांश तत्सेवना धाडीन। विभाग जेथील तेथें मेळवीन। प्राण प्राणीं मनीं मन निजजीववृत्तीसहवर्तमान। तेहीं विंदाण परिसिजे ॥ २४

पृथ्वी धाडिन ज्या स्थळीं नर असे पृथ्वीस भेटावया।
आपीं आप मिळेल अर्जुन जया प्राशील तोया तया ॥
माझें तेज मिळो तदीय मुकुरीं लक्षी मुखालागुनी।
वायू राहिल तालवृंत उदरीं आकाश त्या आंगणीं ॥ २५

राहे हे तनुमात्र एक वडिलाआधीन सर्पत्वचा।
जैसी ते जड काय तीस करिती रामादि हे निर्वचा ॥
माझें जीवित साच जाइल यती जेथें असे तो पती।
त्या अंगासि अलिंगितील सहसा हे इंद्रियें निश्चितीं ॥ २६

तेव्हां काय करील राम कथिजे मातापिता कायसीं।
मानी कोण सुहृज्जना विजय तो म्यां कामिला मानसीं ॥
आतां एक तुम्हासि मी विनवितें कीजे कृपासागरीं।
चातुर्मास सरेल जाल पुढती त्या इंद्रप्रस्थांतरीं ॥ २७

सांगावें मम मानसांतर तया वीरास अत्यादरें।
यावें तां समयीं स्वयंवर घडे माझें तदां सुंदरें ॥
न्यावें तां मज कोटिवीर मथुनी कृष्णें जसी आणिली।
देवी भीमकनंदिनी मज तसें तांहीं हरावें बळीं ॥ २८

( निरंजनमाधव 'सुभद्राचंपू' सर्ग पाचवा, श्लोक ७ ते ३४ )

## १५. ताटकावध : : :

[ विश्वामित्राने दशरथाला रामलक्ष्मणास यज्ञरक्षणार्थ आपल्या आश्रमास पाठवावे अशी विनंती केली. त्यानुसार रामलक्ष्मण विश्वामित्राबरोबर जात असताना वाटेत रामाने ताटकेचा वध केला हा कथाभाग या उताऱ्यात आहे. ]

विश्वामित्र ऋषी तया रघुवरा भेटावया कारणें
आला, तो नयनांबुजांसि करवी सानंद तें पारणें।
झाला मानुषवेषधारक असे मायाविलासी हरी
साकेताधिनिवासभास्करकुलोत्तंसांचिये मंदिरीं॥ १

विप्रेंद्रा अवलोकितां दशरथें साष्टांग वंदोनियां
पूजी सांग यथाविधी मुनिवरा सद्‌भक्तिभावें तया।
प्रार्थी भूपति सादरें घडिघडि बद्धांजुळी, " स्वामिया
मी तो धन्य गृहाश्रमीं म्हणुनियां केली समर्थें दया॥ २

" ऐसे श्रेष्ठ महानुभाव सदना येती अदृष्टें जया
तेव्हां सर्वहि संपदा वरुषती त्या मंदिरीं स्वामिया।
सांगावें करुणाघना, कवणिया कार्यार्थ जी पातला ?
इच्छा जे तुमची करीन सहसा " राजा असें बोलिला.॥ ३

संतोषोनि नृपालकाप्रति वदे तो सृष्टिकर्ता मुनी,
" तूं तो धन्य उदार राघवकुलालंकारचूडामणी।
मातें दे तव ज्येष्ठ पुत्र बरवा श्रीराम हा साजिरा
संगें लक्ष्मण दूसरा सुत तुझा जो सद्‌गुणी गोजिरा॥ ४

" माझा यज्ञ विनाश नित्य करिती ते पापधी दुष्कृती
जे मारीच सुबाहु नाम असती मोठे दुरात्मे क्षितीं।
देव ब्राह्मण पीडिती मुनिवरां स्वच्छंद ते भक्षिती
ऐसे राक्षस वर्तती बळनिधी त्यांच्या विनाशाप्रती " ५

बोले राव महानुभाव मुनिला, “ हीं धाकुटीं लेकुरें
युद्धीं दक्ष नव्हेति, शिक्षण कसें होईल त्यांचें बरें ? ।
झाले वृद्धदशेंत पुत्र मजला, जाणा तुम्ही सर्वही
दारिद्रा कृपणासि वित्त मिनलें कष्टें, नुपेक्षी कही ॥ ६

“ तसें राघवावेगळें सर्व कांहीं मला माग, देईन हें राज्य तेंही ।
न वांचे घडी एकही राम नेतां न याची सुतां, तूंचि हो प्राणदाता ” ॥ ७

असें ऐकतां क्रोधताम्राक्ष झाला मुनी, तेधवां बोलिला भूभुजाला ।
“ वदोनी मला ‘ सर्व देईन ’ ऐसें न देसी ! तरी पुत्र घेऊनि बैसें ” ८

असें ऐकतां बोलिजेलें वसिष्ठें, “ नृपा गुह्य तूं आइके एकनिष्ठें ।
नव्हे राम जी पुत्र तूझा हरी हा, जगा निर्मिता पाळिता तोचि तो हा ॥ ९

“ मनुष्याकृती जाहला, रावणातें वधायां, विधी प्रार्थितां साच येथें ।
तया लक्ष्मणा जाण तूं शेष ऐसें तुझा कैकयीपुत्र हा चक्र भासें ॥ १०

“ असे शंख शत्रुघ्न हा सायुधेंसी विभू पातला सुकृतौघें विशेषीं ।
तपें याचितां जाहला पुत्र तूझा असें जाण तूं निश्चयें राजराजा ॥ ११

“ जगां निर्मिती जानकी योगमाया, विदेहात्मजा जाहली दिव्यकाया ।
तिशीं योजिजे या मिषें कौशिकानें तुला याचिला, राम हा शीघ्र देणें ” ॥ १२

अशी ऐकतां गुह्यवाणी गुरूची मनीं तोषला भूपती रम्यवाचीं ।
मुनीला वदे “ राम सौमित्र दोघें त्वरें नेइजे, कार्य कीजे प्रसंगें ” ॥ १३

ऋषी तुष्टला फार भूपाळकाला वदे कोटि आशीर्गिरा एकवेळां ।
त्वरें चालिला, सानुजा रामराया सवें घेउनी दुष्ट पापी वधाया ॥ १४

कोदंडें वरवीं करीं विलसतीं, तूणीर पाठीवरी
हस्तीं खेटकखड्ग सायुध असे शोभेति दोघे परी।
जैसे सूर्य शशांक रूपधर हे श्रीराम सौमित्र कीं
पायीं चालति! कौशिकासह, गमे लोकां महाश्चर्य कीं ॥ १५

कांहीं मार्ग उलंघितां रघुवरा बोले मुनी आदरें
"ये रामा धरणीधरा म्हणुनियां भक्तिप्रमोदोत्करें।
विद्या श्रेष्ठ बला तशी अतिबला देवीं पुरा निर्मिल्या
दोघी, ह्या जपतां कदापि समरीं संकष्ट नोहे भल्या. ॥ १६

क्षुधा तृषा क्लेश कदां न बाधीं आणीक ही नासति सर्व आधी।
घ्या शीघ्र, ऐसे म्हणऊनि देतां संतोष वाटे रघुनाथचित्ता ॥ १७

ऋषी दाखवी ताटकारण्य रामा "महा राक्षसी या वनीं घोरकामा।
सदा विप्र भक्षी, वसे काळरूपा वधीं पापिणी ते मदोन्मत्त बापा ॥ १८

नसे दोष तूं जाण नारीवधाचा! निशाचारिणी प्राण घेते जगाचा।
मदाज्ञें करी नाश ईचा नुपेक्षीं तुला सर्वदां वर्तणें देव–पक्षीं" ॥ १९

असें ऐकतां घे धनू राम हातीं टणत्कारितां कांपलें स्वर्गवर्ती।
न साहों शके नाद तो दैत्यवामा, म्हणे "कोण आला असा वीरनामा" ॥ २०

करीं शूळ घेवोनि धांवे समोरीं महाराक्षसी दारुणी फार घोरी।
नरांत्राचिया माळिका कंठदेशीं रची मस्तकें कुंडलें कर्णदेशीं ॥ २१

बऱ्या दीसती लांगलाकार दाढा, तनू काळमेघापरी मुक्तचूडा।
विशाळाक्षिणी दीर्घजिव्हां कराळा अशी राक्षसी दीसली रामडोळां ॥ २२

तदा धांवली देखतां राम दृष्टी म्हणे "मीनलें भक्ष्य हें, भूक पोटीं।
ऋषिश्रेष्ठ हा ग्रासिजे साच आतां अदृष्टें असें लागलें आजि हातां" ॥ २३

त्वरें काढिला बाण कल्पांतकारी वधी ताटका तेधवां कामचारी ।
तदां देखिली सुंदरी यक्षनारी अनर्घ्यांबरें भूषणें तोषकारी ॥ २४

पिशाचत्वतें पावली शापयोगें पहा मुक्त झाली विभूच्या प्रसंगें ।
नमस्कारुनी राघवा भक्तिभावें त्वरें चालिली देवलोका प्रभावें ॥ २५

मुनी राम आलिंगिला प्रेमबुद्धि मनीं मानिली थोर हे कार्यसिद्धी ।
वदे सर्व ही अस्त्रविद्या प्रभूला पहा ! मूळविद्याधिपा स्वामियाला ॥ २६

[ निरंजनमाधव ' चिद्‌बोध रामायण ' पंचम सर्ग, श्लोक १ ते २६ ]

# मोरोपंत

## १५. कुशलवजन्म : : :

[ सीतेविषयी आपल्याबद्दल असलेला लोकापवाद हेराच्या तोंडून ऐकून रामाने सीतेचा त्याग केला. लक्ष्मणाने तिला नेऊन वाल्मीकीच्या आश्रमाजवळ सोडले. तेथे सीतेचा विलाप ऐकून वाल्मीकी तिच्याजवळ आले. ]

'वत्से ! काय तवाभिधान ? रडसी कां काननीं निर्जनीं ? ।
कोणाच्या सुकृतैकनीरनिधिच्या वंशांत झाली जनी ? ॥
कोण त्वत्पति ? टाकिलें अकरुणें आणोनि येथें तुला ।
कोणीं ? सर्वहि सांग तूं मज निज क्लेशाचिया हेतुला.' ॥ १

वाणीतें ऐकतां, तीचें चित्त संतोष पावलें. ।
बोले, वंदूनि शिरसा मुनिचीं दिव्य पावलें. ॥ २

'महामुने ! मैथिल तात माझा; मन्नाम सीता, पति रामराजा; ।
भूवल्लभाज्ञाप्रियमंदिरानें आणूनि येथें, त्यजिलें दिरानें.' ॥ ३

ऐसे ऐकूनि, वाल्मीकि वदता जाहला मुखें, ।
आकर्णावें रसज्ञांहीं स्वस्थ होऊनियां सुखें. ॥ ४

'सर्वज्ञानिजनासि संमत असा श्रीमैथिल त्वत्पिता, ।
वत्से ! तूंहि पतिव्रताजनशिरोभूता जगत्पूजिता, ॥
माझा केवळ तो सखा दशरथ क्षोणीशचूडामणी, ।
या वेळेसि कशी न होशिल दयापात्र, क्षितिस्वामिणी ! ? ॥ ५

केलें दुष्कर देवकार्य, सकल क्ष्मादेव केले सुखी; ।
न्यायें भूपति पाळितो निजजनक्लेशाटवीचा शिखी; ।
माझा क्रोध तथापि मैथिलसुते ! आहेचि रामावरी, ।
दोषावांचुनि टाकिली अकरुणें सत्वोदरी सुंदरी. ॥ ६

रिपुयमयपुत्रप्राप्तिला पावसी, ते ।
करितिल सुख तूतें, टाकिं चिंतेसि, सीते ॥
मुलि ! उठ चल माझ्या पुण्यपुंजाश्रमाला; ।
शिव ! शिव ! बहु रानीं पावलीस श्रमाला. ॥ ७

मदाश्रमपदाश्रितस्थिरचरासहि व्यापदा ।
कदापि न शिवे, सुखी विगतवैर सारे सदा. ।
उदास हृदयीं न हो, द्विजवधूसुता शर्मदा ।
न दावितिल भिन्नता तुज महानुकंपास्पदा. ॥ ८

होइल सुखप्रसूती, अपत्यसंस्कारविधिहि भूतनये ! ।
वत्से ! मदाश्रमाला मानुनियां स्वगुरुचें निकेतन, ये. ' ॥ ९

एवं तदा ऐकतां विप्रवाणीस, झाला महातोष काकुत्स्थराणीस. ।
चित्तीं म्हणे, ' हा मुनि स्तुत्य विश्वास, टेवीं तयाच्या पदीं घट्ट विश्वास. ' ॥ १०

पुशी अवनिजा निजाश्रसलिलालिला सुविकला कलानिधिमुखी. ।
उठूनि, नमुनी मुनीस, मग ती गती करि तदाश्रमपदा. ॥ ११

सद्विद्यासक्तशिष्यव्रजतनयसुतास्त्रीयुत ब्रह्मसाला ।
सामोऱ्या तीस आल्या, परिसुनि सहसा रामरामागमाला. ॥
आशीर्वादामृतानें मुनिवरघन ते तीवरी वर्षती; तें ।
पाहूनि ब्राह्मणांचें सदयपण, महा जाहला हर्ष तीतें ॥ १२

म्हणति ऋषिस्त्री, हातें स्पर्श करुनियां तदीय देहातें, ।
' आम्हीं सर्व तवाश्रित, आलिस तूं आपुल्याचि गेहातें. । १३

फार तूं श्रमलीस हिंस्त्रगणाचिया भवनीं वनीं, ।
दुःखभीतिस यावरि क्षितिकन्यके ! न मनी मनीं ' ॥
प्रार्थिलीं असि, पूजिली मग तापसीनिकरें करें, ।
अर्पिलीं तिस कंदमूळफळें मुनिप्रवरें वरें. ॥ १४

मग शिष्यप्रकरानें, पावुनि वाल्मीकिच्या निदेशाला, ।
निर्मुनियां स्वकरानें दिधली भूनंदिनीस दलशाला. ॥ १५

पूजी राघवपादुकांप्रति; नमी वाल्मीकिला ते सती; ।
सेवी तद्वदनोद्गतोत्तमकथापीयूषधारेस ती; ॥
सिंपी श्रीतुलसीवनासि तमसाविश्वंभराकारणें ।
अर्पी वेंचुनियां सुमांसि मुनिच्या देवार्चनाकारणें. ॥ १६

वन्याहारपरा, कृशा, सुमलिना, संवीतवल्कांबरा ।
कांतध्यानधरा, सदैव तमसास्नानैकबद्धादरा, ॥
ऐशी रामवियोगतप्तहृदया सीता मुनींद्राश्रमीं, ।
कल्पप्यायतवासरांसि परम क्लेशेंकरूनि क्रमी. ॥ १७

गर्भाचे नवमास पुण्यविपिनीं संपूर्ण झाल्यावरी, ।
वृद्धस्त्रीसमुपासिता, जसि महासिद्ध्यासिता शांकरी, ॥
सल्लग्नग्रहयुङ्निशीथसमयीं पुत्रद्वयातें सुखें ।
वैदेही प्रसवे, सती प्रमुदिता गीतासि गाती मुखें. ॥ १८

शोभे प्रदक्षिणार्चि स्वधेश, होतां सती प्रसूता हे, ।
झाल्या विमला काष्ठा शीतळ सौरभ सदागती वाहे. ॥ १९

द्युतिकरपुत्रयुगाला यदा प्रसवली विदेहकुलभूषा, ।
मुग्धांस पर्णशाळा वाटे तेजःसमूहमंजूषा. ॥ २०

ज्या दलशालेमध्यें होता श्रुतिशास्त्रतत्त्वलीन मुनी, ।
तेथें धांवत जाउनि बद्धांजलि शिष्य बोलती नमुनी. ॥ २१

'ब्रह्मन् ! भवत्प्रसादें सीता व्याली किशोरयुगळाला, ।
त्याच्या तेजःप्रसरें दीपाचा गर्व सर्वहि गळाला. ॥ २२

भास्करविधू म्हणावें, तरि तापकलंकसंवियोजित कीं, ।
दिसताति साधुचिन्हें, सामुद्रिकशास्त्रसंमतें जितकीं.' ॥ २३

कुशल वचन ऐकतांचि ऐसें, कुशलवमुष्ठिधर द्विजेंद्र गेला, ।
रुचिरवदनबालकद्वयाच्या रुचिरवसंग्रहणें प्रहृष्ट झाला. ॥ २४

होते जे करपंकजीं कुशलव क्ष्मानिर्जरें रक्षिले, ।
त्यांहीं ते शिशु मंत्रपूततमसापाथःकणें प्रोक्षिले. ॥
नामें तींच सुजातकर्मसमयीं चितांतरीं भाविलीं, ।
बाराव्या दिवसांत नामकरणीं अत्यादरें ठेविलीं. ॥ २५

( मोरोपंत कुशलवोपाख्यान अध्याय पाचवा, श्लोक २ ते २६ )

# टीपा

## मुक्तेश्वर

### १. सीतात्याग

'सीतात्याग' हा उतारा संक्षेपरामायणातील आहे. 'संक्षेपरामायण' हे श्लोकबद्ध काव्य असून, ही मुक्तेश्वराची प्रारंभीची रचना दिसते. एकंदरीने विचार केला असता मुक्तेश्वरास श्लोकरचना साधली नाही. त्याची प्रतिभा त्याच्या भारताच्या ओवीतूनच प्रगट झाली. तथापि पंडिती काव्याचा एक जुना नमुना म्हणूनच हा भाग येथे उद्धृत केला आहे. या उताऱ्यातही अनेक दोष पहावयास मिळतात.

१. आमुतें – आमच्यासंबंधी. ही शब्दयोजना बरोबर नाही.

२. गुणीबंधुवाचें – लक्ष्मणाचे. नका चात्रळों – चरू नका, कापू नका.

३. शत्रुटांगें – शत्रूची डोकी.

४. शंकी – साशंक.

५. समळ – मळाने युक्त, दोषी.

६. वितळे – तळमळीने सांगितले.

७. सहितकुमरबंधूसंगिये सप्रधानीं – बंधू कुंभकर्ण, मुलगा इंद्रजित आणि प्रधान यांच्यासह. ओपिती – अर्पण करतात, परत देतात.

८. श्रवण करित – ऐकून. सदोष शब्दरचना. अवनिजा – भूमिकन्या सीता. सुमित्रा – सौमित्रा असे पाहिजे, लक्ष्मणा.

९. कुदारा – वाईट पत्नी. यमकासाठी आलेली ही शब्दयोजना रामाच्या तोंडी अयोग्य वाटते.

१०. शून्यवादी – नास्तिक. हे नेहमी वेदाची निंदा करतात.
विरक्तें मनीं वाळिले कामचारी – मनसोक्त वागणारे लोक विरक्त जनांस त्याज्य मानतात असा अर्थ करावयास पाहिजे.

१२. महेंद्रालय – राजवाडा. धरानंदिनी – भूमिकन्या सीता. मनोआवडी – मनाला प्रिय. प्राणनाहो – प्राणनाथ.

१४. वदत पतिवियोगा पिंगळे कर्कराती – पिंगळे कर्कर शब्द करतात आणि त्यायोगे पतिवियोग सुचवितात. प्रकटित – सुचवीत. रामरामा – रामाची पत्नी सीता. विरामें – थांबून.

१५. भूधरातें गुणी हो – तू रामाला अनुकूल हो हा भावार्थ.

१६. सारसारंगनेत्रा – सुंदर हरणाच्या डोळ्यांसारखे जिचे डोळे आहेत ती सीता.

१७. नोबले – न बोले. अपसंधी. निरखुनी वनगंगा...राममेटी – वनवासात असता ते वन, तीच गंगा, तोच नावाडी आणि त्या ठिकाणचा राम हे सर्व आठवून.

२०. पंकजईक्षणा – कमलनयना. येथे संधी आवश्यक असून केला नाही.

२१. नयनवदनमेळें – तुझ्या डोळ्याला रामाचे मुख दिसून.

२६. सैंवराहूनि – स्वयंवरापासून. हा काळपावें – या वेळेपर्यंत, आतापर्यंत.

२९. विश्रमे – विश्रांती घे.

# वामनपंडित

## २. सीता-लोपामुद्रा संभाषण

२. विप्रसंगीं – गैरहजेरीत.

३. स्वरत – आपल्याच ठिकाणी रममाण असणारा.

४. भवार्ता – संसाराने पीडिलेल्यास.

५. अद्वय – अभंग, एकला. गुणें – सत्त्व, रज, तम या गुणांनी.
५ – ६ सीतेचा भावार्थ असा की राम हा परब्रह्मस्वरूप आहे. त्याला मी, माझे असे काही नाही. तो सत्त्व, रज, तम या गुणांचा भोक्ता नव्हे. तो अलिप्त आहे. परंतु तो स्थिरचर व्यापून राहिल्यामुळे आणि मी स्थिर-चरापैकीच असल्यामुळे मी त्याच्याशी रमू शकते. अर्थात माझे त्याच्याशी रमणे हे रामाच्या दृष्टीने मायिक आहे, खरे नव्हे.

६. कल्पतरूपमातें – कल्पतरूप्रमाणे असणारा.
लोपामुद्रेने केलेला प्रश्न व्यावहारिक होता, उलट सीतेने दिलेले उत्तर आध्यात्मिक आहे. व्यवहाराचे वेदान्तात रूपांतर करणे ही वामनाची लकब येथे दिसते.

७. सजलजलदसंगें – पाण्याने भरलेल्या मेघाबरोबर.

८. गुणहि मुनि हे हेचि जपती – भक्तावर कृपा, अनुराग करणे हे परमेश्वराचे गुण ऋषी गातात. घिंवसा – हवाहवासा.

९. श्वशुर दिनमणीही ... भाऊ – राम सूर्यवंशात जन्मला असल्यामुळे सूर्य हा सीतेचा मामंजी होतो. आणि सीता ही लक्ष्मीरूपच असल्यामुळे तिच्याबरोबर सागरातून जन्मलेला चंद्र ( एणांक ) हा तिचा भाऊ होतो. नकळत जन ... भावू – रघुपतीच्या सहवासात मला प्रत्येक गोष्ट अनुकूलच वाटत असे हे रहस्य न कळल्यामुळे लोकांना माझा अरण्यवास कष्टप्रद आहे असे खुशाल वाटो.

१०. पुत्रस्वामिनी ज्यास वाटे – वायूचा पुत्र मारुती त्याची सीता ही स्वामिनी म्हणून वारा सीतेला अनुकूल होत असे.

१२. दत्तमाता – अनसूया.

१३. यो – येवो.

१४. पाणी – हात. हरि – हरण करी.

१७. विंधिता – विद्ध करता, जखमी करता.

२१. सुमनकळिका मारतरुची – मदनवृक्षाची मंजिरी.

२३. जलधिमध्यपुरी – समुद्रातली नगरी लंका. धणी – लाभ.

२४. लंकेस – लंकेमध्ये. लंकेश – रावण. कपाळी – कपाली म्हणजे शंकर.

२५. तीव्र – तात्काळ. सेतु वाट ते...वाटते – सीता रामाचा इशारा विसरलेली दिसते.

२८. उठाणें–उत्साह.

२९. भारती – वाणी. लोपामुद्रा हसते आहे हे पाहून सीतेला रामाचे शब्द आठवले.

३१. कपि – वानर. सगिरिसप्ताब्धि – पर्वतासहित सात समुद्र.
या उताऱ्यात लोपामुद्रा व सीता यांच्या खोचक प्रश्नोत्तरांतून, संवादातून वामनाने स्त्रीस्वभाव उत्तम तऱ्हेने व्यक्त केला आहे.

## ३. नाममाहात्म्य

नामसुधा हे प्रकरण श्रीमत् भागवत स्कंध ६ अध्याय १ ते ३ यांच्या अनुरोधाने वामनपंडिताने रचले आहे. अमृत जसे मनुष्याला मरणापासून सोडविते, तसे भगवंताचे नामरूपी अमृत ( सुधा ) मनुष्याला संसारचक्रापासून सोडविते, असे भगवन्नामाचे माहात्म्य यात वर्णिले आहे, म्हणून यास वामनाने नामसुधा असे नाव दिले आहे.

१. चित्सुधासारपानें – ज्ञान हेच अमृत त्याच्या प्राशनाने. निवान – राहण्याचे स्थान. वासुदेवाभिधानें – कृष्णाची नावे.

२. **सहजसुखनिधानीं** – हे विरक्तीं चे विशेषण. साहजिक सुखाचे राहण्याचे ठिकाण असे विरक्त त्यांनी. **शुकसनकमुखीं** – शुक, सनक यांनी तोंडाने घेतलेली. सनक हा ब्रह्मदेवाच्या चार मानसपुत्रांपैकी एक होता. हा पूर्णज्ञानी, जीवन्मुक्त होता. **जीतमुक्त** – जिवंतपणी ज्याने सत्यज्ञानाने आपली जन्ममरणाच्या संसारातून सुटका करून घेतली आहे असा. **लौकिकोक्ति** – नेहमीच्या प्रपंचाविषयीचे भाषण, व्यवहारी बोलणे.

४. **वर्णवर्णीं** – प्रत्येक अक्षरात. **आश्रमी** – गृहस्थाश्रमी. **वर्णी**–ब्रह्मचारी.

५. **आकाशअंत** – येथे संधी करावयास पाहिजे. **सीमा** – शेवट, अंत.

६. **अजित** – ईश्वर.

७. **आगम** – शास्त्रे. **वामनात्मा मुरारी** – वामन आहे रूप ज्याचे तो कृष्ण.

८. **हा ग्रंथ** – हे नामसुधा प्रकरण. **परादि वाचा** – परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी हे वाणीचे चार प्रकार आहेत. परा म्हणजे शब्दांचे बीजभूत रूप.

९. **सगुण नामसुधानुवादें** – परमेश्वराच्या सगुणावतारांची अमृतरूप नावे पुनःपुन्हा उच्चारली असता मोक्ष मिळतो.

१०. **लौकिक** – प्रापंचिक लोक.

११. **साक्षि** – आपण अलग राहून उदासीनपणे पाहणारा.

१२. **करुणांबुवृष्टी** – करुणारूप उदकाची वृष्टी झाली असता.

१४. **दुरिततृणगृह** – पापरूपी गवताची झोपडी.

१६. **अविद्यामयें** – अज्ञानाने युक्त. **दुःखधामें** – दुःखाची घरे.

१७. **धर्मराजाप्रति** – धर्मराजाच्या प्रश्नावरून भीष्माने विष्णुसहस्रनामाचा जप केल्याने मनुष्य सर्व दुःखापासून मुक्त होतो असे उत्तर दिले आहे.

१८. **भूमिपाळा** – धर्मराजास उद्देशून. **हरिनाममाळा** – विष्णुसहस्रनामावळी.

२०. **नामधेय** – नाव. **मुनींद्रगेय** – मुनिश्रेष्ठांनी गाण्यास योग्य. **भीष्मोदित** – भीष्माने सांगितलेले. **गहनार्थ** – खोल अर्थ.

२१. **अशेषात्मभावें** – सकळ जो आत्मभाव त्याने.

२४. भाषांतरीं ... फळेल तेथे – पुराणप्रसिद्ध नावे सोडून इतर शब्दांनी ईश्वराचे नाव कल्पून त्याचा जप केला तर श्रद्धा असेल त्याप्रमाणे फळ मिळेल.
नैसर्गिक – स्वाभाविक. नेणता – न कळता.

२५. चराचर – सचेतन व अचेतन वस्तुमात्र परमेश्वरच आहे. परमेश्वर या मूलभूत सद्‌वस्तूपासून विश्वरूप कार्याची उत्पत्ती होते हा भावार्थ.

२६. निर्विकारी – स्वतः कोणत्याही प्रकारे विकार न पावणारा.
स्फुरद्रूप – स्फुरण पावणारे रूप.

## ४. द्वारकावैभव

१. त्रपा – लज्जा. अणिमादि – अणिमा, लघिमा, प्राप्ती, प्राकाम्य इत्यादी आठ सिद्धी आहेत.

२. मळे – भाज्या व फळफळावळ यांची शेते. पुष्पित – फुललेली. उपवने – बागा.

३. भावार्थ – त्या उपवनामध्ये पुष्कळ पक्षी होते आणि ते तेथील फळांची मधुरता नेहमी ( अखंड ) चाखत असत.

४. कानन नीरजांचे – कमलांचे ताटवे ( समुदाय ) पद्‌मां – कमळांना. सद्‌म करूनि पद्‌मा – लक्ष्मी ( पद्‌मा ) कमळ हे घर ( सद्‌म ) करून राहत असे.

५. पराग ...पंक ज्यांचे – कमळांचे पराग पाण्यात पडून त्यांचा चिखल ( पंक ) होतो; तो इतका सुवासिक की त्यापुढे कस्तुरी फिकी पडावी. देखोनि .... जळाला – द्वारकेतील पाण्याला पाहून. जळाला – नष्ट झाला.

६. उपमाभ्रम – उपमेसाठी हिंडणे, शोधात राहणे. पंकजें ... अनादि सती हो – मुनिजनांच्या मनरूपी भ्रमराला कृष्णाची पावले कमळेच वाटली. जी पावले लक्ष्मी ( अनादी सती ) आपल्या वक्षःस्थळावर धरते.

७. हरिपदोपमपद्मसरोवरीं – कृष्णाच्या पावलाप्रमाणे दिसणाऱ्या कमलांच्या सरोवरात. तेथे पोहणारे हंसही खरेखुरे सात्त्विक परमहंस ( योगी, संन्यासी ) दिसत होते. कारण हा लाभ सामान्य हंसांना मानवणारा नव्हता, हा भावार्थ. सरोवरीं – चढाओढीने. न जिरे – पचणारा, झेपणारा नव्हता.

८. या श्लोकात सारस या शब्दाचे चार अर्थ होतात. १. सारस – पाणी, २. सारस – सरोवरात उगवणारे ते, कमल. ३. सारस – सारस पक्षी, बगळे, ४. सारस – षड्रस, सहा रस.
श्लोकाचे प्रमुख दोन अर्थ होतात :

द्विजरूपी सारसांनी हरिपदरूपी कमलाने युक्त असलेल्या द्वारकानगरीत लौकिक षड्रसांचा त्याग करून वसती केली हा एक अर्थ. तेथील कमले कृष्णाच्या पावलांची आठवण करून देत होती म्हणून लौकिक सहा रसांचा त्याग करून सारस पक्षांनी प्रभुपुरीतील तळ्यात वसती केली. असा दुसरा अर्थ घेता येतो.

पाण्यातील बगळ्यांनी रसयुक्त द्वारकेत (सारसीं प्रभुपुरींत) वसती केली. असा तिसरा अर्थ निघतो. यात सारसीं हे विशेषण समजावयाचे.

सारसीं या शब्दावर यमक करण्यासाठी वामनपंडिताने येथे शब्द व अर्थ यांची फार ओढाताण केली आहे.

९. सांडिला कुसुमसंभ्रम – भावार्थ-भ्रमरांनी इतर फुलांच्या मागे न लागता द्वारकेतील कमळेच पसंत केली. ज्याप्रमाणे मुनींचे मनरूपी भ्रमर ( मधुप ) कृष्णपदकमलाचा रस चाखण्यातच ( मधुपानीं ) गोडी मानतात.

१०. नरवानर – नररूपी माकड, विवेकशून्य मनुष्य.
भावार्थ – कृष्णपदकमलामध्ये रस न घेणारा माणूस हा खरोखर माकडच ( विवेकशून्य ) असला पाहिजे. रामावतारी रामाने वानर तारले पण या नर-वानराला कोणताही अवतार तारू शकणार नाही.

११. विधि – ब्रह्मदेव. शंभु – शंकर. पदाब्जें – पदकमळे. ज्याने ब्रह्मदेव, शंकर हे देव निर्माण केले त्यासाठी ( त्याकारणे ) नारदाचे डोळे उत्सुक होते.

१२. उदास– निरिच्छ, निरपेक्ष. उल्हासवाटें – आनंदाच्या मार्गाने. गमे..उल्हासवाटे – सर्वत्र हरीचे स्वरूप भरून राहिले आहे असे त्याला वाटले म्हणून त्याच्या ठिकाणचे प्रेम मोठ्या उल्हासाने पाहू लागले.

१३. माडिया – माड्या. नवलक्ष – नऊ लाख. शुभ्ररजता – धवल रुप्या-सारख्या. चांदणी – वर्तुळाकार बांधलेला छत्रीसारखा लहान चबुतरा. रजनिच्या घटिकाच्या – रात्रीच्या वेळेस.

१४. चांदण्यांत – चंद्रप्रकाशात. सित – शुभ्र. मौक्तिकांसहित यादवियांची – या चबुतऱ्यांना मोत्यांच्या झालरी होत्या. त्यांचे तेज यादवजनांना सुखवीत होते.

१५. हेम – सोने. पाची – पाचू.

१६. पडशाला – धर्मशाळा. सत्सभा – सभागृह. पंक्ति हाटवट्याची – बाजाराची ओळ.

१७. वाटें – रस्त्याने. लोकपाल – अष्टदिक्पाल.

१८. भवन – वाडा. भव – संसाररूप अस्तित्व.

१९. येथे कौशल्य हा शब्द चार अर्थांनी वापरला आहे. १. सौख्य. २. योग्य गोष्ट. ३. सुबत्ता व क्षेम. ४. चातुर्य. बंधनाशी – संसारबंधनास.

२०. अपूतनारी – अपवित्र स्त्रिया. पूतनारी – पुतनेचा शत्रू श्रीकृष्ण. काकतीर्थ – कावळे नुसते डोके बुडवितात ते घाणेरडे डबके. भावार्थ – मानससरोवरातील हंसाला काकतीर्थात डुंबण्याची इच्छा होत नाही.

२१. अशेषें – संपूर्णपणे. भासमान – दृश्य होत होते, उठून दिसत होते.

२२. निघाला वैकुंठीं...असे – आपण श्रीविष्णूच्या वैकुंठनगरीलाच जात आहोत असे नारदाला वाटले.

२३. स्वयंभ – स्वतः प्रकाशमान. मरकत – पाचू. वैडूर्य – वैदूर्य, एक तऱ्हेचे रत्न. तम – अंधकार. जाणों – जणू. दिनमणी – सूर्य. कीं ...दिनमणी – रत्ने इतकी चमकत होती की तितके सूर्यच उगवले आहेत असे वाटे.

२४. गमे...ल्याला – विश्वकर्मारूपी समुद्राने छतरूपी चंद्राला जन्म दिला असे वाटे. वृंद मुक्ताद्विजांचें – मोत्यांचे समूह. मोती दोनदा जन्मतो म्हणून द्विज. हा शब्द केवळ यमकासाठी आलेला आहे. पुढील मुक्ता द्विजांचे याचे दोन अर्थ होतात. १. मुक्त झालेल्या ब्राह्मणांचे २. बंधनात नसलेल्या राजहंस पक्षांचे. मोत्यांचा चारा राजहंस खातात हा संकेत आहे म्हणून राजहंसांनाही मोह उत्पन्न झाला हा अर्थ अधिक योग्य ठरतो.

२५. चांदव्याकरुनि...चकोर ... छताला पाहून चकोरांना तो चंद्र आहे असे वाटून संतोष होई. विहगबुद्धि धाते – चकोरांचे मन तृप्त होते.
कृष्ण ... सुधा – कृष्णाच्या पायाच्या नखरूपी चंद्रापासून स्रवणारे अमृत.

२६. कृष्णागर – कृष्णागरू नाम चंदन. धूम्र – धूर.

२७. कांकणी – वळचणीचा भाग, घराचा वासा. पारावत – पारवे.
नेत्र ... पक्षीं – ज्याच्या पंखावर डोळे असतात तो म्हणजे मोर.

२८. चांदव्यालागीं – चांदवा किंवा छत हा चंद्रप्रकाश आहे असे समजेन.
जाती – प्रकार. दे ... जाती – घराच्या वर्गात घालीत, घर असे मानीत.
विलासमानी शिखिवृंद – विलासामुळे गर्विष्ठ असलेला मोरांचा समुदाय.

२९. जड ... कर्मा – अचेतन व सचेतन जग निर्माण करणारा परमेश्वर.
संतुष्ट हो – संतोष पावो. कुशल – चतुर लोक.
कुशल ... सेवा – चतुर लोक हो, तुम्ही याची सेवा का करीत नाही ?
सदर उतारा बराचसा क्लिष्ट झालेला आहे. कारण येथे वामनाने आपल्या यमकाच्या हव्यासापायी शब्दांचे ओढून ताणून अर्थ बसविले आहेत. जे अर्थ बसविले आहेत तेही योग्य किंवा मनाला पटण्याजोगे आहेत असे दिसत नाही. एकंदरीत वामनपंडिताच्या रचनेतील नेहमीचे दोष – यमकासाठी शब्दांची ओढाताण, कल्पनांची आणि यमकांची पुनरुक्ती तसेच श्लेषाच्या आधाराने वर्णनावर मध्येच आध्यात्मिक रंगाची पुटे चढविण्याची चटक – या उताऱ्यात पहावयास मिळतात. द्वारकावैभवात वस्तुवर्णनाची संपन्नता दाखवून वामनपंडिताने या ठिकाणी उदात्त अलंकार साधला आहे. ( उदात्तं वस्तुनः संपद् )

# रघुनाथपंडित

## ५. हंस-दमयंती संवाद

१. मदें भरोनि – आनंदित होऊन.

४. पातेजूं – विश्वासू, विश्वास धरू. बाजी – संकट.

६. विस्मयीं भाव धरणें – आश्चर्यचकित होणे. निखंदी – निंदी, झिडकारी.

१०. साख्य – मैत्री.

११. कनकारविंद – सुवर्णकमल.

१२. मानसीं – मानससरोवरात, लोकांच्या मनात. कुलसती – पतिव्रता स्त्री, देणगी. फिरादि – तक्रार, फिर्याद. आमुची कुलसती असती करीतो – अप्रतिम धवलत्व ही हंसकुलाची ईश्वरदत्त देणगी आहे. परंतु हंसापेक्षाही नळाचे यश शुभ्रतर ठरल्यामुळे हंसाची कुलसती हिरावून घेतल्यासारखी ( असती ) झाली. नळाचा यशोमय हंस हा हंसपतिव्रतेला भ्रष्ट करतो आहे अशी तक्रार हंस करीत आहे.

१३. पाशीं – जाळ्यात. लोकेशता – प्रजापतित्व.

१४. वीजन – वारा घालणे. जसा – जेणेकरून.

१५. तनु-द्युति – देहाची कांती.

१६. नवनीतभेला – लोण्याचा गोळा. अलंकरणरूप – भूषणभूत. हंसोदयें – हंसाच्या आगमनाने, सूर्याच्या उदयाने. विघरतां – वितळता. वचन आदरीते – पुढील भाषण करते. संस्कृतच्या धर्तीवर वाक्यरचना.

१७. एकांत – गुजगोष्ट. नायिकेला – न ऐकलेला. हे बोल चें विशेषण. नळाने तुझ्याजवळ कोणती गोष्ट सांगितली तो बोल मी ऐकलेला नाही.

१८. राजी – अनुरक्त. हेजीब – दूत.

२०. बाहीं – हाती. बंक – चौकी, पहारा.

२२. देवनळ – बोरू व नळराजा. मी जाण ... या श्लोकाचा भावार्थ असा – तुला कोणता नवरा रुचला या हंसाच्या प्रश्नावर दमयंती म्हणते, “ तुझ्या

प्रश्नाचे उत्तर तोंडी तर आपल्याला देता येत नाहीच, पण लेखी देखील देणे विनयाला सोडून होईल. बोरूचे टोक जसे काळे होते तसे माझे मुख निर्लज्जतेमुळे होईल."

दुसरा अर्थ – "चतुर हंसा, जो राजा काही काळाने माझा पती व्हावा त्याच्या पाणिग्रहणाचीही मी त्याची (भावी) पत्नी लेखी मागणी करीन. मी लाजेन होय ?"

किंवा – "राजा नळ जो प्रमुख (मुख) काही काळाने माझा पती होणार असे विधिलिखितच आहे, त्या चतुराला मी पाणिग्रहणाकरिता मागणी करीन. त्यात मला लाज कसली ?"

२३. श्लेषशब्दें – द्व्यर्थी शब्दांनी. त्रपाकंचुला – लज्जेची आहे चोळी जिला अशी.

## ६. गजेंद्राचा धावा

१. तया वनीं – हा श्लोक दमयंतीस्वयंवरातही आहे. द. स्व. श्लोक ३७. तटाक – तळे. तामरस – कमल. अनपाय – नष्ट न होण्याची क्रिया. तामरसांच्या अनपायानें – कमले सदैव फुलत राहिल्याने. अमंद – पुष्कळ. मरंद – मकरंद, पुष्परस. तपांत – ग्रीष्म ऋतूत, उष्ण कालात.

२. वीतां – प्रसवता. उदरंभर – पोटभरू, बुभुक्षित. बंभर – भ्रमर. इंदिरेचे मंदिर – कमल हे लक्ष्मीचे निवासस्थान समजले जाते. विकासवीते – खुलविते. सूर्याची सहस्र किरणे कमलाच्या सहस्र पाकळ्यांवर पडल्यावर त्यांचा प्रकाश परावर्तित होत होता. वीतां मरंद – हाही श्लोक दमयंतीस्वयंवरात आहे. द. स्व. श्लोक ३९.

३. रज – पराग. येथे व्यतिरेक अलंकार आहे. येथील कमलाच्या पाकळ्यांवर असलेले पाणी मोत्यासारखे चमकत होते. हे मौक्तिकाकार जल उपमानभूत माणके आणि पोवळी यांच्यापेक्षासुद्धा सुंदर दिसत होते हा भावार्थ म्हणून व्यतिरेक अलंकार.

४. खिल्लारें – समुदाय. कुमुद – चंद्रविकासी कमल. कल्हार – श्वेतकमल. इंदुविकासविलासें ... सोल्लासें – चंद्राची श्वेतकिरणे पडल्यावर भ्रमर, कुमुद आणि श्वेतकमले सारखीच श्वेत दिसू लागली.

५. अमृतही पयही – हा श्लोक दमयंतीस्वयंवरात आहे. द. स्व. श्लोक ३८. सारस जल – सरोवराचे पाणी. अन्वय – गा ते मधुर सारस जल तसें – म्हणजे सरोवराचे पाणी अमृतासारखे मधुर होते. त्याला अमृताची व दुधाचीही रुची होती.

६. चक्रें – समुदाय.

७. मार्तंडचंडकिरणीं – सूर्याचे तीव्र, उग्र किरण त्यांनी.

८. जांवायी – जावई. तनुज – मुलगा.

९. चिल्लर थिल्लर – लहान डबकी. दानांबुपान – हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा द्रव त्याचे प्राशन.

१०. निडारीं – जवळच, निकट.

११. स्वकरविवर – स्वतःची सोंड तिचे भोक. वरपतो – ओरपतो.

१२. कपोळीं – गंडस्थळ व गाल यांवर. निम्न – खालचा, सखल.

१३. माथां निमग्न करिता – डोके बुडविले असता.

१६. कंटकौघ – नक्राच्या तीक्ष्ण दाढा. तरंग – लाटा.

१९. लाग – संभव. करी – हत्ती.

२१. परविदारविलासविशारदें रदें – दुसऱ्याला फाडण्याच्या कामी निपुण अशा दातांनी. क्रकचदारुण – करवतीप्रमाणे भयंकर.

२३. घाय – जखमा.

२४. वोणवा – ओणवा व वणवा. कृष्णाने वणवा गिळल्याची कथा भागवतात आहे. तसा न उभारे – येथे जसा हा पाठ घेतल्यास योग्य होईल, तो वाढणार नाही अशा पद्धतीने गिळून टाक.

२५. सेखीं – शेवटी.

२६. तद्वधू – कालियाची पत्नी.

२७. विकरावी – मजकडे फेकावी.

२८. नग – पर्वत, येथे गोवर्धन.

## ७. रुक्मिणीची तगमग

१. **वदत वदत** – अंवेला उद्देशून रुक्मिणी असे बोलत असताना. **सांज – होयास आली** – संध्याकाळ जवळ ठेपली. **दिनकरकरलक्ष्मी** – सूर्यकिरणांचे ऐश्वर्य. **मुखकमल तयेचें...बांधव्य राखे** – आपल्या इतर कमलबांधवां-प्रमाणेच रुक्मिणीचे मुखकमल म्लान झाले आहे असे पाहून चंद्र (कमळांचा बंधू) तिला सुख देण्याच्या हेतूने उगवला.

२. **विधिविहितनियोगें** – ब्रह्मदेवाच्या योजनेप्रमाणे. **वारुणी** – पश्चिम दिशा. **भावार्थ** – सूर्याने वारुणीचा अंगीकार केला म्हणून सायंसंध्येला राग आला त्यामुळे ती लाल झाली.

३. **अनभिलषित** – निरिच्छ. **अर्थी** – याचक. **उत्तमेचा** – रुक्मिणीचा. **द्विजपति** – ब्राह्मणश्रेष्ठ व चंद्र. **कर** – हात व किरण. रुक्मिणीचे मुख इतके सुंदर होते की निरिच्छ चंद्र रुक्मिणीचा याचक बनला व त्याने तिच्या मुखलावण्याची याचना केली. चंद्रापेक्षाही तिचे मुख सुंदर होते हा भाव आहे. येथे उपमानापेक्षा उपमेयाचे श्रेष्ठत्व दाखविल्याने व्यतिरेक अलंकार आहे. ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भीक्षा । ही कल्पना येथे आहे.

४. **हिमकरकर** – चंद्रकिरण. चंद्रकांत मण्याला चंद्रकिरणांनी पाझर फुटतो असा कविसंकेत आहे. **कांतिपूर** – चंद्रप्रभेचे पूर. चकोर पक्षी चंद्र-किरणांवर उपजीविका करतात हाही कविसंकेत तिसऱ्या चरणात वापरला आहे.

५. **विलसित अवघे हे** – चंद्रकिरणांचे वैभव रुक्मिणीला सहन होईना. विरही जनांना चंद्रकिरण दुःसह वाटतात हा संकेत आहे.
**निःसहांगी** – जिच्या अंगाची तगमग होत होती ती.

नेत्रपातीं ससलिल केली – डोळ्यांत पाणी आणले. संस्कृतच्या धर्तीवर प्रयोग.

६. दोषाकर – दोषा (रात्र) + कर = चंद्र. दोष + आकर = दोषांची खाण. समुद्राचे सुंदर बालक असताना तू दोषाकर नाव कसे धारण करतोस ? येथे विरोध किंवा विरोधाभास हा अलंकार आहे.

७. गुरुदारगामी – बृहस्पतीची पत्नी तारा हिच्याशी गमन करणारा. तां-त्यां. चंद्राला गुरुपत्नीसमागमाचे पातक लागले त्यामुळे तो क्षयी झाला आणि त्याच्या वैभवाला उणेपणा आला.

८. या श्लोकात मध्येच रुक्मिणी सखीला उद्देशून बोलत आहे.

९. तुहिनकर – तुहिन ( थंड ) + कर ( किरण ), चंद्र. हा चंद्र नव्हे तर चिंतारूपी वेलीचे बीज आहे. उपमेय ते उपमेय नव्हेच, उपमानच असे वर्णन केल्यामुळे येथे अपन्हुती अलंकार होतो. उभारें – उभविले जाते. भारे – भारावतो.

१०. प्रळयदहनकल्प – प्रलयाग्नीसारखा.

११. नयनसलिलयोगें...सांपडेना – डोळ्यांत आसवे येत आसल्याने चित्रात रेखाटलेला कृष्णही दृष्टीस पडेना.

१२. सोले – दुःखित होते. वजे – जाई. कळासी – बेमालूम सांधा. यदुपतिविरहाची...कळासी – कृष्णविरह आता कायमचा झाला.

१५. गवांविसी – धारण करतोस.

१७. उतरती – अवतार घेतात. निजअंशीं – आपापल्या अंशाने.

१८ राधिकावदनचंद्रचकोरा – राधेच्या मुखचंद्राचा चकोर. रूपक अलंकार. मुळातील यापुढील जो श्लोक आहे त्यात गोपिकांचा असभ्य रीतीने उल्लेख आलेला असल्याने प्रस्तुत उताऱ्यात तो गाळला आहे.

२२. पुरुष पंचविसावा – सांख्यमताप्रमाणे २५ वे तत्त्व सर्वसाक्षी पुरुष हे आहे.

२५. मनोगज – मनरूपी हत्ती. प्रणतभक्तकदंबा – भक्तांच्या समूहांनी नमस्कारिलेली.

## ८. रुक्मिणीपत्रिका

१. लाखोटा – बंद लिफाफ्यावर केलेली लाखेची मुद्रा.

२. वठे – हुबेहूब दिसे. कनककेतकगर्भगाभा – पिवळ्या केवड्याचा गाभा.

३. ओजःप्रसादमधुरादिक – ओज, प्रसाद आणि माधुर्य हे काव्यगुण आहेत. संपदा – काव्यगुणांची संपत्ती.

४. तीर्थस्वरूपचरण – तीर्थाप्रमाणे पवित्र चरण असलेला. करुणानिधान – दयेचा साठा. प्रौढप्रतापमिहिर – महान पराक्रमाचा सूर्य. प्रथिताभिमान – ज्याचा अभिमान प्रसिद्ध आहे.
सौजन्यसिंधुसदना – सौजन्यरूपी सागराचे निवासस्थान.
मदनाभिराम – मदनाप्रमाणे सुंदर. समवाप्तकाम – ज्याच्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत.

५. शिरोवतंस – मस्तकाचा अलंकार. कंसांतकासुररिपो-कंसांतक + असुररिपो.

६. जाणोन – येथे जाणुनि असे रूप हवे म्हणजे वृत्तभंग होणार नाही.

७. योगींद्रहृत्कमलपंजरगर्भकीर – योगीश्रेष्ठांच्या हृदयकमलरूपी पिंजऱ्यात राहाणारा पोपट.

९. ताप तीन्ही – तापत्रय आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक.

११. विद्या...धामा – विद्या, तरुण वय, संपत्ती, सौंदर्य व सद्गुण यांचे स्थान.

१३. वीरभाग – वीरालाच योग्य असा भाग. तुरुत – तात्काल.
वीरामधें...टाळी – वीरांमध्ये तुझी तत्काळ फजिती होईल. ते निंदाव्यंजक टाळ्या पिटतील. सिंहामिष – सिंहाकरिता असलेले मांस.

१४. गदाग्रज– कृष्ण.

१५. रक्षोविवाह – राक्षसविवाह. कन्येला पळवून जबरदस्तीने केलेला विवाह.

१८. पदांबुजरजःस्नपन – चरणकमलाच्या परागांच्या स्नानाने. शंकराचे अज्ञान कृष्णाच्या चरणकमलरजाने नाहीसे झाले असा अर्थ होतो.

१९. त्वत्प्रापकें – तुझी प्राप्ती करून देणारी.

२१. निखिळवृष्णिपति – सर्व यादवांचा अधिपती.

२२. हेजीब – दूत. विप्रतिपत्ति – शंका, मतभिन्नता. याच्या – सुदेव ब्राह्मणाच्या.

## ९. कृष्णास ते नमनपूर्वक माळ घाली

१. कुंडलमंडितेक्षणा – येथे कुड्मलमंडितेक्षणा असा पाठ घेतल्यास अर्थ लागतो. कुड्मल – कळी. विकसित झालेल्या कळीप्रमाणे शोभणारे डोळे असलेली. पक्वबिंबीफळ ... धरा – पिकलेल्या तोंडल्याप्रमाणे लाल ओठ असलेली. बिंबीफळ – तोंडले. सोदर – समान, सारखे.

२. मनोजफांसा – मदनाच्या जाळ्यात.

४. अवस्छा – अवस्था. राजक – राजांचा समुदाय.

५. अळक – अलक, केस. अपांगविशिखीं – कटाक्षाच्या बाणांनी. वारून...नृपाळां – भावार्थ – डाव्या हाताने केशपाश सावरून व कटाक्ष-बाणांनी इतर राजांना दूर सारून. सव्रीड – लज्जेने. साचिवदना – जिने एकीकडे तोंड फिरविले आहे अशी.

७. परमहंसकुळावतंसीं – योगीजनांच्या कुलाचे भूषण म्हणजे कृष्ण त्याच्या ठायी.

८. कल्पद्रुम – कल्पवृक्ष. जंगम – चालणारी, हलणारी. कल्पवल्ली – कल्पलता. निदाघतप्ता – उन्हाने तापलेली. नवघनाभिमुख – नव्या मेघाकडे तोंड करून.

९. तजून – त्यजून. विषयांकुरमात्रचारा – केवळ विषयरूपी कोंबांचा चारा. मेध्या – पवित्र. कृष्णसार – काळवीट. गवेषित – शोधून.
श्लोक ७ ते ९ यांत उत्प्रेक्षा अलंकारांची सुंदर माळा गुंफलेली आहे.

१०. त्रिवेणी – गंगा, यमुना व सरस्वती या नद्यांचा त्रिवेणीसंगम प्रयागला होतो. तीर्थराज – प्रयाग क्षेत्र. भीमकी व सख्या यांचा त्रिवेणी संगम येथे कल्पिला

असून श्रीकृष्ण हा वटवृक्ष ( वटमयीरुह ) मानला आहे. त्रिवेणीसंगमावरील वटवृक्षावर पिंड दिला म्हणजे मोक्ष मिळतो अशी समजूत आहे. रूपक अलंकार.

११. विवरों निघाली – शिरली. हारोन जाय – नाहीशी झाली. मकरध्वज मदन.

१५. जडित – रत्नजडित. रत्नावतंसद्युति – रत्नाच्या भूषणांचे तेज.

१६. अंगदें – बाहुभूषणे. उद्योत – प्रकाश. ऊर्मिका – आंगठी.

१७. श्रीवत्सलक्ष्मी – कृष्णाच्या वक्षःस्थलावर वत्सलांछन आहे. त्याचे ऐश्वर्य. विधी नाभिसरोजगाभां – कृष्णाच्या नाभिकमलातून ब्रह्मदेव निर्माण झाला अशी कल्पना आहे.
त्रिदिवस्रवंती–आकाशगंगा. स्रवंती – नदी.

१८. रशना – कमरपट्टा, साखळी. किंकिणी – घंटा. तोडर – पायांतील दागिना.

२२. यदूद्वह – कृष्ण. उद्वह – श्रेष्ठ, उत्तम. तिर्यङ्मुखी – तिरपे मुख केलेली.

विठ्ठल

## १०. धनुर्भंग

१. काचावला – कच खाल्ली. बुझाले – भ्याले. षडंगे – २ हात, २ पाय, मस्तक, कंबर–देहाची ६ अंगे.

२. सदासिं – सभेमध्ये. त्रिभुवनजयलक्ष्मी – जिच्या प्राप्तीने त्रिभुवन जिंकल्यासारखे होणार आहे अशी मैथिलीरूपी लक्ष्मी. हनुमन्नाटकाचा अनुवाद. १.१८

४. जाणोनि त्यांची क्षमा – त्यांची पात्रता ( अपात्रता ) जाणून. दुसरा अर्थ-जनकराजाची सहनशीलता जाणून. तटस्थ...संभाषणें – राजे भाषण बंद करून तटस्थ होऊन ऐकू लागले.

५. महींद्र – राजे. कलधौतसुंदरगुणी – सोन्यासारखे सुंदर आहेत गुण जिचे. श्रीकीर्तिलाभोद्यमा – लक्ष्मी, कीर्ती यांचा लाभ जिच्यापासून होतो. ह. ना १. १०.

६. ऋषिनें – विश्वामित्राने.

१०. लाघवें – अल्प प्रयत्नाने, सहज.

११. उपरीवरी – माडीवर.

१२. दिग्गज – दिशांमध्ये असलेले हत्ती. उमाणि धनुषा–धनुष्याचा झाडा घे. उमाणणे – मोजणे, झाडा घेणे. ऊदित – उद्यत–तयार झाला.

१४. भुपतींत – भूपतींत, राजांत. वृत्तसुखार्थ भु –ऱ्हस्व केलेला.

१५. जांबूनदें – सोन्याची. मुढें – मूढे, मूर्ख. वृत्तसुखार्थ मु –ऱ्हस्व केलेला.

१६. परिधीं – सभोवार. थोकले – उभे राहिले.

१७. भूपांसुने – भूधुलीने. वर्जिल्या – मागे सारल्या.

१८. कर्णान्त – कानापर्यंत.

१९. विदेह – जनक. भृगुपुत्र – परशराम. साहंकृती – गर्विष्ठ.
धनुर्भृत्यक्तसर्वाकृती – धनुष्य धरणाऱ्या राजांकडून टाकविल्या आकृती ज्याने असा ( रामाने धनुर्भंग केल्यामुळे धनुर्धरांची शरीरे काळवंडली हा भावार्थ )
रामाने सहवर्तमान ... हा श्लोक हनुमन्नाटकातील एका श्लोकाचा अनुवाद आहे.

या श्लोकात सहोक्ती अलंकारांची माला गुंफलेली आहे. तो श्लोक हा–

> उत्क्षिप्तं सहकौशिकस्य पुलकैः सार्धं मुखैर्नामितं
> भूपानां, जनकस्य संशयधिया साकं समास्फालितम्
> वैदेहीमनसा समं च सहसाकृष्टं ततो भार्गव –
> प्रौढाहंकृतिदुर्मदेन सहितं तद्भग्नमैशंधनुः १.२३

अर्थ – ( रामाने शिवधनुष्य ) विश्वामित्रऋषींच्या रोमांचांसह वर उचलले. राजांच्या मानांसह ते खाली वाकविले. ( राम धनुष्य उचलील की नाही या ) जनकाच्या संशयासह त्याने ते गदगदा हलविले, सीतेच्या चित्तासह दोरी लावून ओढले आणि ( माझ्याशिवाय दुसरा कोणी हे धनुष्य उचलणार नाही या ) परशुरामाच्या अहंकारासह ते मोडून टाकले.

रामाने शिवधनुष्याचा भंग केला त्या प्रसंगी त्याच्याकडून झालेल्या प्रत्येक क्रियेचा परिणाम विश्वामित्र, सभेतील राजे, जनक आणि सीता यांच्यावर तसेच परशुरामावर कसा झाला याचे सुंदर वर्णन येथे सहोक्तीच्या आश्रयाने केलेले आहे. मुळातील सौंदर्य अनुवादात उतरलेले नाही. कारण विठ्ठलाचे भाषेवरील अप्रभुत्व.

२०. तुकी – हालवी. ह. ना. अनुवाद. १.२२

२१. उलंडली – निखळली. मारू – मरु देशातले. कुरु – कुरू देशातले.

२२. निक्षत्री क्षितिचक्र ... भार्गवें – परशरामाने २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रीय केली.

हा श्लोकही हनुमन्नाटकातील एका श्लोकाचा ( १.२५ ) अनुवाद आहे. या सर्वच उताऱ्यावर हनुमन्नाटकाची दाट छाया पडली आहे. परं

विठ्ठलाची शब्दयोजना सदोष असल्यामुळे मुळातील सौंदर्य येथे प्रकट झालेले नाही.

२३. तुरें – वाद्ये. मूळ शब्द संस्कृत तुर्य.

२४. निशाण – दुंदुभी, नगारे. घायीं – घावांनी. धनुकरी – राम. विषयी – गृहस्थाश्रमी.

२६. श्रोत्रीं– वैदिक ब्राह्मणांनी. परिरंभिले – आलिंगन दिले. चेवला – शेफारलेला. कांचनपर्यंळीं – सोन्याच्या ताटात.
प्रणयिनीं – प्रेम करणाऱ्या लोकांनी. काकुत्स्थ – राम.

२७. सित – धनुष्याची दोरी. निकरीं – निश्चितपणे.
धनुर्भंग या उताऱ्यात अनेक जागी विठ्ठलाची सदोष रचना आढळते. विठ्ठलाचे भाषेवरील अप्रभुत्व, शब्दांची ओढाताण, ऱ्हस्वदीर्घाकडील दुर्लक्ष इ. दोष या ठिकाणी पहावयास सापडतात.

## ११. राम–परशुरामसंघर्ष

१. नवचवरडोलीं – नवीन चवऱ्या असलेल्या अंबारीत. चिन्ह – परिणाम, फल.

२. द्वीतूण – दोन भाते. 'शापादपि' ही 'शरादपि' – ज्याच्यामध्ये ब्राह्म (शापात्) आणि क्षात्र (शरात्) ही दोन्ही तेजे एकवटली आहेत असा. केसरी – सिंह. भस्मोद्धूलितमौलि – भस्माने चर्चिलेले आहे मस्तक ज्याचे. लांछन – चिन्ह.
मांजिष्ठांबर – तांबड्या रंगाचे वस्त्र. रसना – रशना हवे. कमरपट्टा.
व्याघ्राजिनें उत्तरीं – उत्तरीय वस्त्र म्हणून वाघाचे चामडे.

३. जिणावया – जिंकावयास.

४. नयनतनुवेळा – नयन (२) तनु (१) एकवीस वेळा. संस्कृतची लकब.

५. कंकपिच्छ – कंक पक्षाचे पीस. गोधांगुळी– चामड्याचे बंधन. धनुर्धाऱ्याचे अंगुस्तान.

६. या श्लोकावर हनुमन्नाटकाची छाया आहे १.३७
मूर्ध्नी छेद् – माझे मस्तक तोड. येथे मूर्धा चालले असते.

७. यथार्थ – योग्य. ह्णिें – हीन. गिरा – शब्द, वाणी.
नवगुणं यज्ञोपवीतें – जानव्याला नऊ पदर असतात.

८. परशुपाणी–ज्याच्या हातात परशू आहे तो परशुराम. हडबडी–बावरला.
ननु–खरोखर.

९. रामें–परशुरामाने. राम–दाशरथी राम.

## निरंजनमाधव

# १२. त्रिदंडीवेषधारी अर्जुन

चूर्णिका–ललितगद्य. संस्कृतच्या घाटणीवरचे आणि संस्कृतप्रचुर असे ललित गद्य निरंजनमाधवाने येथे योजिलेले आहे.

१. अस्मिन्नवसरीं–अस्मिन्+अवसरीं–या काली. अमरासुरनर–देव, राक्षस, माणसे. सात्वत...संदोह–सात्वत + वृंद–यादवांचा समुदाय. आनंद + संदोह–आनंदाची रास. ( अर्थ : सात्वतसमूहाच्या आनंदाचा राशी बलराम ). देव...वेष्टित–देव, गंधर्व, माणसे, नागस्त्रिया यांच्या समूहाने वेढलेला. निजदायित– स्वतःला प्रिय. अवनीभुजमंडळ– राजश्रेष्ठ.

२. प्रथम वर्षागमसमयीं – पावसाळ्याच्या प्रारंभी. नानाद्रुम...विनीतवत्– रैवतकपर्वत पिकलेल्या फळांच्या भाराने युक्त अशा नाना प्रकारच्या वृक्षांनी नटलेला होता. फळभाराने वाकलेल्या फांद्यांमुळे वृक्ष बलरामापुढे शिरे नमवून नम्र बनल्यासारखे दिसत होते. प्रमत्त आरक्त – ( मद्यप्राशनामुळे ) धुंद व लाल. कमलदलायत – कमळाच्या पाकळीप्रमाणे रुंद. सुमनदाम – फुलांचा हार. कलित – युक्त. कंधर – कंठ. विकसित...कंधर – फुललेल्या मंदारवृक्षाच्या पुष्पहारांनी शोभत आहेत कंठ ज्यांचे.

३. नूतन सद्वयस्क – कोवळा तरुण.

४. कामीं न योजी मना – मनाला कामवासनेच्या ठायी गुंतवीत नाही. मनात कोणतीही इच्छा आणीत नाही.

५. स्वानंद या उल्हसे – स्वानंद याला उजळून काढतो, याच्या मनात स्वानंद भरून राहिला आहे. नैरापेक्ष्य – निरपेक्ष वृत्ती.

८. हली – मूळ शब्द हली असून त्याचा अर्थ बलराम.

९. पाविली – पवित्र केली. तीर्थनिवहीं – तीर्थांच्या समूहात, अनेक तीर्थांत.

११. योगींद्रविश्राम – योगीजनांच्या संगतीत, सेवेत विसावणारा.

१५. विभु – सर्व ठिकाणी असणारा. राहे व्योम... राहटी – आकाश जसे सर्व घटांना व्यापून अलिप्त असते त्याप्रमाणे सर्व स्थिरचराला व्यापून अलिप्त असणारा. श्लोक १८ पासून श्लोक २८ पर्यंत अर्जुनाने निःस्पृहतेचे उत्तम नाटक केले आहे. या नाटकाने बलराम चांगलाच फसला व त्याच्या ठायी यतिभक्ति तुडुंब भरली.

१९. जिणती – जिंकतात. धात्रीफळें – आवळे.

२०. एणनाभि – कस्तुरीमृगाच्या नाभीतील कस्तुरी. काश्मीरपंक – केशर. विभूति – भस्म. भूतिद – कल्याण करणारे. करकंजपात्र – हस्तकमलरूपी पात्र. उपबर्हे – मूळ शब्द उपबर्ह म्हणजे उशी.

२१. शाड्वल – मूळ शब्द शाद्वल – हिरव्या तृणाने आच्छादिलेले मैदान. राका – पौर्णिमा. राकाचंद्र सुदीप – पौर्णिमेचा चंद्र हाच दिवा. मंदानिळी – मंद वाहणाऱ्या वायूत चामर ढाळल्याचे सुख प्राप्त होते. तुर्यानुभूति – मुक्तीची चौथी अवस्था. जेथे जीवात्मा परब्रह्मस्वरूप होतो.

२२. अंतर्विविक्तस्थळी – एकान्त स्थली, चित्ताच्या शुद्ध व एकाग्र अवस्थेत.

२४. चिद्गगन–चिदाकाश, चैतन्याची सार्वत्रिक व्याप्ती. गुण – तंतू. भांडीं . आभूषणीं – ज्याप्रमाणे माती सर्व मातीच्या भांड्यांना व्यापून असते किंवा सोने सर्व अलंकारांना व्यापून असते त्याप्रमाणे ईश्वर सर्वांना व्यापून राहतो. वेदान्तातील ठराविक दृष्टान्त.

२५. चेष्टेना – हालचाल करीना. तूल – कापूस.

२६. प्रारब्धार्पण...भर्जित – येथे कर्मांचे प्रारब्ध, संचित व क्रियमाण तिन्ही प्रकार दिले आहेत. साधक प्रभुचिंतनात मग्न होतो तेव्हा त्याचा देहभाव गळू लागतो. प्रारब्धाचे भोग देहापुरते उरतात. संचित जळून जाते. क्रियमाण निर्जीव होते. प्रस्तुत उतारा 'सुभद्राचंपू' या काव्यातील आहे. चंपू हा एक गद्यपद्यमय काव्याचा प्रकार आहे. सुभद्रेच्या विवाहाची कथा या चंपू काव्यात दिलेली आहे. म्हणून यास 'सुभद्राचंपू' असे म्हटले

आहे. मराठी वाङ्मयात हा एकुलता एक चंपू आहे. चूर्णिका या सदराखाली दिलेले ललित गद्य हा या चंपूतील गद्य-विभाग असून बाकीची वृत्तरचना पद्यस्वरूपाची आहे. हा चंपू असला तरी याचा सारा थाट महाकाव्यासारखा आहे. 'सुभद्राचंपू' चे भिन्नवृत्तात्मक सात सर्ग आहेत.

## १३ अर्जुनाविना नेच्छी कदां मीं पती

प्रस्तुत उताऱ्यातील अर्जुन-सुभद्रा संवादावर कालिदासाच्या कुमारसंभवातील पार्वती व जटिल यांच्या संवादाची छाप आहे. तेथे प्रत्यक्ष शंकर एका ब्रह्मचाऱ्याचे रूप घेऊन पार्वतीच्या मनाची परीक्षा करीत होता तर येथे अर्जुन यतीच्या वेषाने सुभद्रेचे मन चाचपून पहात आहे. दोन्हीकडे तेच नाट्य आहे.

१. **कंदर्प कांड्डे व्यथा** – मदन तीव्र ताप देऊ लागला. **तापितमनीं** – तपस्व्याच्या मनात.

५. **कुंतिभोजकुमरी** – कुंतिभोज राजाची कन्या पृथा. **गर्भाकरींचा मणी** – गर्भरूप खाणीतील मणी. **कुंति...मणी** – पृथेचा मुलगा पार्थ.

८. **वसुमती** – पृथ्वी **नोहति** – होणार नाही.

९. **अष्ट दिक्पति** – आठ दिशांचे स्वामी. **नांगिकारी** – न अंगिकारी.

१०. **धनुटंकर** – धनुष्याचा टणत्कार. **पावती मूढता** – मूर्च्छित होतात.

११. **पृथ्वीच्या भणगासि** – भणंग, दरिद्री अशा पृथ्वीस. **कोदंडदीक्षागुरु** – धनुर्विद्यानिपुण.

१२. **खांडवदाह** – अर्जुनाने खांडव वन जाळले. **वीरांतरीं** – वीरांच्या उपस्थितीत. **देवेंद्रही पाहतां** – इंद्र पाहत असताना ( सति सप्तमी )

१३. **सरी** – बरोबरी. अर्जुनाची बरोबरी दुर्योधन करू शकणार नाही असे सुभद्रा म्हणत आहे. यासाठी श्लोक १४ ते श्लोक १६ पर्यंत निरनिराळे

दृष्टान्त कवीने वापरले आहेत. श्लोक १७ व १८ मध्ये वेगवेगळ्या उपमा घेऊन अर्जुनच सर्वांत श्रेष्ठ आहे असे सुभद्रेने सांगितले आहे.

१९. **सुभद्रामुख – हंसवाहिनी** – सुभद्रेच्या मुखकमळातून निघालेली राजहंसाच्या कलरवासारखी मधुर वाणी. **चतुर...रत्न** – अत्यंत चतुर जनांमध्ये श्रेष्ठ असा अर्जुन. **नारी वचनसरणी पडताळी** – यापुढे अर्जुन तिच्या मनाचा पडताळा पाहू लागतो.

२१. **अर्जुनवत्** – गवताप्रमाणे क्षुद्र, तुच्छ.

२३. **गांडीवधन्वा** – ज्याच्या हाती गांडीव धनुष्य आहे तो, अर्जुन. **चक्रवाकीसंकटीं...प्रातःकाळीं** – चक्रवाक आणि चक्रवाकी यांचा वियोग रात्रीच्या वेळी होतो असा कविसंकेत आहे. सूर्योदय होताच ती दोघे एकमेकांना भेटतात. सूर्य चक्रवाकीच्या संकटात साहाय्यास धावून येतो हा भावार्थ.

**मथोनि** – युद्ध करून. **मृगराज स्वभाग बस्तमेळी हरी** – मेंढरांच्या समूहातून सिंह आपला वाटा जसा उचलून नेतो त्याप्रमाणे. सुभद्राहरणप्रसंगी भागवतकारांनी 'स्वभागं मृगराडिव' असेच शब्द वापरले आहेत. निरंजनमाधवांनी येथे भागवतातील कल्पना शब्दशः उचलली आहे.

२४. **निजदेहस्थित भूतांश** – देह पंचमहाभूतांचा बनला आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांचा देहातील अंश देहत्यागानंतर अर्जुनाच्या सेवेला धाडीन असे सुभद्रा म्हणते आहे. भावार्थ हा की, अर्जुनाने उपेक्षा केली तर प्राणत्याग करीन; पण त्यानंतरही अर्जुनाची सेवा हेच व्रत राहील. सुभद्रेची अर्जुनाविषयीची एकनिष्ठ आणि अपार्थिव प्रीती पुढील श्लोकात काव्यमय पद्धतीने अभिव्यक्त झाली आहे. भावना आणि कल्पना यांचा येथील संगम हृद्य आहे.

२५. सुभद्रेची उत्कट आणि त्यागमय प्रीती पहा. ती म्हणते, "अर्जुन जिथे संचार करतो, तिथे माझ्यातील पृथ्वीतत्त्व विलीन होईल; तो जे जल प्राशन करतो, त्यात माझ्यातील आपतत्त्व मिसळेल; तो ज्या आरशात

मुख न्याहाळतो, त्यात माझ्यातील तेज जाईल; त्याच्या पंख्यात माझ्यातील वायुतत्त्व भरून राहील आणि आकाशतत्त्व त्याच्या प्रासादातील अंगणात आसरा घेईल. ''

२६. तनुमात्र – केवळ शरीर. ( मन नाही हा भावार्थ ) निर्वचा – सांगा.

२८. मानसांतर – मनातील गुह्य. तां – त्वा, तुम्ही.

## १४. ताटकावध

१. साकेताधिनिवासभास्करकुलोत्तंसाचिये मंदिरीं – अयोध्येत राहणारा अणि सूर्यकुलालंकार जो दशरथ त्याच्या राजमहालात.

२. गृहाश्रमीं – गृहस्थाश्रमी.

७. न याची सुतां – पुत्राची याचना करू नकोस.

११. विभू – सर्वव्यापक परमेश्वर, येथे विष्णू. सुकृतौघें – पुण्याच्या प्रवाहामुळे.

१२. विदेहात्मजा – जनककन्या सीता.

१३. रम्यवाचीं – गोड वाणीने.

१६. भक्तिप्रमोदोत्करें – भक्ती व आनंद यांचा उत्कर्ष होऊन. संकष्ट – संकट.

२१. नरांत्राचिया मालिका – माणसांच्या हाडांच्या माळा.

२३. मीनलें – मिळाले. ग्रासिजे – याचा ग्रास करू.

२४. कामचारी – इच्छेप्रमाणे संचार करणारी.

२५. पिशाचत्वता – येथे भाववाचकनामाचे त्व व ता हे दुबार प्रत्यय लावले आहेत. प्रस्तुत उतारा चिद्बोध रामायणातील आहे. चिद्बोध रामायण हे मूळ रामायणावरून रचलेले आहे. हे सप्तकांडात्मक संपूर्ण रामायण एके काळीं होते. परंतु बालकांडाव्यातिरिक्त इतर कांडे नाहीशी झाली आहेत.

# मोरोपंत

## १५. कुशलवजन्म

१. अभिधान – नाव. सुकृतैकनीरनिधिच्या – पुण्याच्या सागराच्या. नीरनिधि – सागर. जनी – जन्म. अकरुण – कठोर. हेतु – कारण.

३. मैथिल – जनक. भूवल्लभाज्ञाप्रियमंदिर – भूवल्लभ+आज्ञा+प्रिय+मंदिर – राजाची आज्ञा हेच आवडते मंदिर आहे ज्याचे, राजाज्ञेचे आवडते गृह असा लक्ष्मण. संस्कृतच्या धर्तीवर लांबलचक समास व विशेषणाचे लिंग-वचनविभक्ती विशेष्याप्रमाणे. भूवल्लभाज्ञा...मंदिराने हे दिराने याचे विशेषण आहे.

४. आकर्णावें – ऐकावे.

५. क्षोणीशचूडामणी – राजश्रेष्ठ. क्षितिस्वामिणी – राज्ञी. रघुवंश १४.७४ अनुवाद.

६. क्ष्मादेव – ब्राह्मण. निजजनक्लेशाटवीचा शिखी – आपल्या प्रजाजनांच्या व भक्तांच्या क्लेशरूप अरण्याचा अग्नी. सत्वोदरी – गर्भवती. रघुवंश १४-७३ आधार.

७. रिपुयमयमपुत्रप्राप्तिला – शत्रूचे नाशकर्ते ( यम ) असे जुळे मुलगे ( यम ) त्यांच्या लाभास.

८. मदाश्रम...न शिवे – माझ्या आश्रमात राहणाऱ्या स्थावर व जंगम वस्तूसही दुःख, विपत्ती ( व्यापदा ) कधीही स्पर्शत नाही. शर्मदा – सुख देणाऱ्या. न दावितील भिन्नता – परकेपणा दाखवणार नाहीत. महानुकंपास्पदा – अत्यंत दयाळू. द्विजवधूसुता चे विशेषण. रघुवंश १४.७७ आधार.

९. स्वगुरुचें निकेतन मानुनियां – आपल्या वडिलांचेच घर मानून.

१०. स्तुत्य विश्वास – जगाला वंद्य.

११. **अवनिजा** – भूमिकन्या सीता. **निजाश्रुसलिलालिला** – निज + अश्रू + सलिल + आलि – स्वतःच्या अश्रूंची माला (आलि) तिला. **कलनिधिमुखी**– चंद्रवदना. **तदाश्रमपदा**–त्याच्या पर्णकुटीला. या श्लोकात दामयमके आहेत.

१२. **ब्रह्ममाला** – ब्राह्मणांचा समुदाय. **सद्विद्या...स्त्रीयुत**...ब्रह्मालेचे विशेषण. विद्याभ्यासंग करणाऱ्या शिष्यांचे समूह ( व्रज), मुलगे ( तनय ), मुली ( सुता ) आणि स्त्रिया यांच्यासह. **रामरामा** – रामाची स्त्री. **मुनिवरघन** – महान मुनी हेच मेघ.

१३. **ऋषिस्त्री** – ऋषिपत्न्या.

१४. **न मनीं मनी** – मनात आणू नकोस. **निकर** – समूह. **मुनिप्रवर** – मुनिश्रेष्ठ. **वरें** – उत्तम. फळेंचे विशेषण. संस्कृतप्रमाणे विशेषण – विशेष्य वचनविभक्ती एक.

१५. **शिष्यप्रकर** – शिष्यगण. **निदेश** – आज्ञा. **दलशाला** – पर्णकुटी.

१६. **तद्वदनो...धारेस** – श्री वाल्मीकीच्या मुखातून निघणाऱ्या कथामृताच्या धारांना. **विश्वंभराकारण** – पाणी. पाणी प्रथम निर्माण झाले, त्यातून पृथ्वीचा जन्म झाला.

१७. **वन्याहारपरा** – वन्य+आहार+परा – वनातील फलमूलांचा आहार करणारी, रानटी फळमूळांवर उपजीविका करणारी. **संवीतवल्कांबरा** – नेसली आहेत झाडांच्या सालीची वस्त्रे जिने. **कल्प...वासर** – कल्पाप्रमाणे मोठे, दुःखमय असे दिवस.

१८. **पुण्यविपिनीं** – पवित्र अरण्यात. **महासिद्ध्यासिता** (महासिद्धि+आसिता) **शांकरी** – मोठमोठ्या सिद्धी जिच्याजवळ वसत आहेत अशी शंकरविभूती. **सल्लग्न...समयीं** – शुभ लग्न व ग्रह यांनी युक्त अशा मध्यरात्रीच्या वेळीं.

१९. **प्रदक्षिणार्चि स्वधेश** – ज्याच्या ज्वाला उजवीकडे वळत आहेत असा अग्नी ( स्वधा + ईश ) हे एक शुभसूचक चिन्ह आहे. या श्लोकावर रघुवंशाची दाट छाया आहे.

दिशःप्रसेदुर्मरुतो ववुःसुखाः...रघुवंश ३.१४.

२०. द्युतिकरपुत्रयुग – तेजस्वी अशा मुलांच्या जुळ्याला. मुग्धांस – भोळ्या लोकांना. तेजःसमूहमंजूषा – प्रकाशाच्या स्रोताने भरलेली पेटी.

२१. श्रुतिशास्त्रतत्त्वलीन – वेद व शास्त्रे यांनी प्रतिपादिलेल्या तत्त्वांचे मनन करण्यात गढलेला.

२२. किशोर – बालक. हा शब्द योग्य नाही.
दीपाचा...गळाला – या ठिकाणी व्यतिरेक अलंकार आहे.

२३. भास्करविधू – सूर्यचंद्र. तापकलंकसंवियोजित कीं – सूर्याजवळचा दाह आणि चंद्राजवळचा कलंक येथे नाही. व्यतिरेक अलंकार.

२४. कुशलवमुष्टिधर – दर्भ ( कुश ) व लव्हाळे ( लव ) यांची जुडी मुठीत धरणारा. रुचिरवसंग्रहणे – कांती पाहून व शब्द ऐकून.

२५. क्ष्मानिर्जर – ब्राह्मण म्हणजे वाल्मीकी. पाथःकण – जलकण. प्रोक्षिले – शिंपडले. सुजातकर्मसमयीं – पुत्रावणाच्या वेळी. चित्तांतरीं भाविलीं – मनात ठरविली.

## १६. काही केका

१. महाकामुक – अत्यंत लालसा असलेला.

२. वी – वितो, उच्चारतो.

३. धी – बुद्धी. सन्मती – साधू वृत्तीचे.

४. अर्पितां – संतुष्ट करता. नमस्कृतिपर – सतत नमस्कार करणारे.

६. कृत्तिवासा – गजचर्म ज्याचे वस्त्र आहे तो शंकर. गर – विष.

७. सद्यशोमुख – सत्कीर्ती हेच मुख. हर – शंकर. ओपशी – अर्पण करतोस.

८. कवीश्वर...पते – कविश्रेष्ठांचे मन हाच समुद्र, त्यातून उद्भवलेली स्तुती हीच लक्ष्मी, तिचे. स्वामी. तवगुणैकदेशभ्रमें – तुझ्या गुणांपैकी काही गुणांचे वास्तव्य पाहून.

९. कनकपीतवासा – सोन्याप्रमाणे पिवळ्या रंगाचे वस्त्र आहे ज्याचे असा. किंकरी – दासी. मयूर – मोर आणि मोरोपंत कवी.

निजात्मजाग्रहविमुक्त – आत्मजा – मुलगी. ग्रह – नक्र, उपाधी. हा समास दोन प्रकारे सोडविता येतो. १ निज + आत्मजा + ग्रह + विमुक्त २ निज + आत्मजा + आग्रह + विमुक्त. ज्याप्रमाणे गजेंद्राला नक्रापासून सोडविले त्याप्रमाणे मला कन्यकारूपी उपाधीपासून मोकळे करा. ( माझ्या कविताकन्येने तुमच्याकडेच जायचा जो हट्ट घेतला आहे त्यातून माझी सुटका करा. )

१०. मंतु – अपराध. नमस्कृतिपुरःसर – नमस्कारपूर्वक. रविसखा – सूर्याचा मित्र. सात्राजिती – सत्राजिताची कन्या. सत्राजित नावाचा यादव महान सूर्यभक्त होता. त्याला सूर्यापासून स्यमंतक मणी मिळाला होता. तो कृष्णाने चोरला असा आळ त्याने घेतला होता; म्हणून तो अपराधी ठरतो. कृष्णाने जांबवानापासून स्यमंतक मणी घेऊन त्याला परत केला, त्यामुळे खूष होऊन सत्राजिताने आपली कन्या सत्यभामा कृष्णाला दिली अशी कथा आहे.

११. पिता खळ – सत्राजित. ती गुणवती – सत्यभामा. तत्सुता – जांबवानाची कन्या. भांडगा – भांडखोर. त्रिणव – त्रि + नव २७.
सत्राजिताचा स्यमंतक मणी जांबवानाकडे होता. तो परत आणावयास श्रीकृष्ण त्याच्याकडे गेले असता जांबवानाने कृष्णाशी २७ रात्री एक-सारखे युद्ध केले.

१२. तोषाकर – तोष + आकर – आनंदाची खाण, निधान. तोषाकरें करें चे विशेषण. सजली – सजविली. स्वयोषा – स्वतःची पत्नी. धव – पती. हरिमनोहराकृति – इंद्राला मोह पाडणारे रूप असलेली ( अहिल्या ) – श्रीकृष्णाला जिची रचना मनोहर वाटेल अशी ( कविताकृती ).

१३. कंसदासी – कुब्जा. ही तीन ठिकाणी वाकलेली होती. तिला कृष्णाने सरळ आणि सुरूप केले. उजरली – सरळ केली, सुंदर केली.
दयासुधासीकरें – दया हेच अमृत, त्याच्या शिडकाव्याने. हे करें याचे विशेषण मानल्यास हा बहुव्रीही समास घ्यावा. करुणामृताचा शिडकावा करणारा ( हात ) मत्कृती – माझी कवितारचना. दुष्कृती – पापी.

१४. **पृथुकतंदुलप्रसृति** – पृथुक + तंडूल – पोह्याचे दाणे. **प्रसृति** – पसा. पसाभर पोह्यांचे दाणे. सुदाम्याने पसाभर पोहे श्रीकृष्णाला दिले होते, ते त्याला फार आवडले होते. **आप्तकामा** – ज्याच्या इच्छा तृप्त झाल्या आहेत अशा तुला.
**सुनय** – चांगली आहे वागणूक ज्याची. **आप्त** – हितकर्ता. **स्वा** – सर्वस्व.

१५. **प्रशिथिलीं रदीं** – अगदी ढिल्या झालेल्या दातांनी. **बदरिकाफळें**– बोरे.

१६. **वांकडे** – प्रतिकूल. **घनांबु** – ढगातले पाणी.

१७. **अदयताख्य** – निष्ठुरपणा नावाचा.

१८. **विपाक** – परिणाम. **अजामिलसखोऽस्मि** – मी अजामिळाचा सखा आहे. म्हणजे मी त्याच्याइतकाच पापी आहे. **सुदुस्तर...सेतु** – तरून जाण्यास अत्यंत कठीण अशा विपत्तिरूपी नदीवरचा पूल. संस्कृतप्रचुर रचना.

१९. **अचल** – पर्वत गोवर्धन. **हरिमदापह** – हरि + मद + अपह (हरिमदं अपहन्ति इति) = इंद्राचा गर्व हरण करणारा. **बृहदुदारलीलाकर** – बृहत् + उदार + लीला + आकर. बृहत् – भव्य. उदार – कल्याणकारी. आकर– खाण. भव्य आणि कल्याणकारी कृत्यांची खाण. थोर कृत्ये करणारा.

२०. **चिकित्सक** – वैद्य. **बहुजनामयद्रुम** – बहुजन + आमय + द्रुम – पुष्कळ लोकांचा रोगवृक्ष. **स्वगद** – आपला रोग. **अत्यय** – नाश. **सरुज** – रोगी. **प्रत्यय** – विश्वास.

२१. **भजकबर्हिमेघा** – भक्त (भजक) हेच मोर (बर्हि), त्यांना मेघाप्रमाणे असणारा. **आधिनें** – काळजीने. **परिभ्रमे चाकसें** – चाकासारखे फिरत राहते. (म्हणजे त्याच त्या विषयांची चिंता करीत असते.)

◎ ◎ ◎

क्र. १६९५५

# शब्दकोश

## अ

अजिन – मृगचर्म, हरणाचे कातडे.
अटवी – अरण्य.
अदृष्ट – दैव, पूर्वकर्म.
अनर्घ्य – बहुमोल.
अनंग – मदन.
अपत्रप – निर्लज्ज.
अपांग – डोळ्याचा कोपरा.
अब्ज – कमल.
अर्जुन – गवत, क्षुद्र झाड.
अलगर्द – पाणसाप, विरोळा.
अवनीभुज – राजा.
अलुमाळ – किंचित.

## आ

आधी – मानसिक व्यथा.

## उ

उच्चैश्रवा – इंद्राचा घोडा.
उडुगणे – नक्षत्रे.
उन्मत्तवृक्ष – धोत्रा.
उपबर्ह्ह – उपबर्ह ( सं. ) उशी.

## ऐ

ऐंद्री – इंद्राची.

## अं

अंडज – पक्षी.
अंतराय – अडथळा, संकट.
अंशुमाळी – सूर्य.

## क

कपोत – एक पक्षी.
कपोळ – कपोल, गाल.
कमला – लक्ष्मी.
कर्णसैंधव – जयद्रथ.
कर्दम – चिखल.
करवाळ – तरवार, खड्ग.
कलधौत – सुवर्ण.
कार्मुक – धनुष्य.
काष्ठा – दिशा.
कांची – मेखला, कमरपट्टा.
किंकिणी – घंटा.
किंशुक – पळस.
कूर्म – कासव.
कोड – कौतुक.
कौशिक – विश्वामित्र.
कंज – कमल.
कंदर्प – मदन.
कंथा – वाकळ जाडेभरडे वस्त्र.

### ख

खेटक – ढाल.

### च

चतुरानन – ब्रह्मदेव.
चामर – चवरी.
चार – हेर.

### त

तपन – सूर्य
तालवृंत – पंखा
तालांक – बलराम
तूणीर – भाता.
त्रपा – लज्जा.

### द

दयित – आवडता, प्रिय.
दशकंधर – रावण.
दिविज – देव.
दुरित – पातक.
देवर – दीर.
द्रुम – झाड.
द्रविण – द्रव्य.

### ध

धनद – कुबेर.
धम्मिल्ल – केशपाश, वेणी.
धी – बुद्धी.

### न

नर – अर्जुन.
निगम – वेद.
निर्जर – देव.
निदाघ – उन्हाळा.
निवह – समुदाय.
नीची – हलकी, कमी दर्जाची.
नीर – पाणी.
नैरापेक्ष्य – निरपेक्षता.

### प

परंज्योति – परब्रह्म.
पानीय – पाणी.
पिपीलिका – मुंग्या.
पुरंदर – इंद्र.
पैशुन्य – निंदा.
पंचास्य – सिंह.

### फ

फाल्गुन – अर्जुन.

### ब

बस्त – मेंढा.

### भ

भणग – दरिद्री.
भर्जित – भाजून टाकलेले.

### म

मधुप – भ्रमर.
मातु – कथा, गोष्ट.
मार्तंड – सूर्य.
मूर्धन – डोके.

मेदिनी – पृथ्वी.
मौलि – मस्तक.

र

रद – दात.
रसना – जिव्हा.
रसाल – आम्रवृक्ष.
रूख – वृक्ष.

ल

लांगळ – नांगर.

व

वदान्या – उदार.
वर्षागम – पावसाळ्याचा आरंभ.
वर्षादिन – पावसाळ्याचे दिवस.
वाड – थोर, मोठी.
वामा – स्त्री.
वारिधी – समुद्र.
वारुणी – मद्य.
विधी – ब्रह्मदेव.
विशिख – बाण.
विहग – पक्षी.
विंदाण – कौशल्य, कौतुक.
वोखटे – अशुभ, वाईट.
व्याळ – सर्प.
वृंद – समुदाय.

श

शलभ – टोळ.
शिराणी – आवड, गोडी.
शैवल – शेवाळे.
शंबरारि – मदन.

स

सत्यसंध – खरे बोलणारे.
सत्त्व – प्राणी.
सदागति – वायू.
सरोरुह – कमल.
सविता – सूर्य.
सस्मेर – स्मितयुक्त.
सहकार – आम्र.
सहस्रभानु – सूर्य.
साकेत – अयोध्या.
सात्वत – यादव.
सारस – पक्षीविशेष.
सुपर्ण – गरुड.
सुमनदाम – फुलांचा हार.
सुरेंद्रदेशिक – इंद्राचा गुरू बृहस्पती.
सोम – चंद्र.
संकर्षण – बलराम.
संदोह – रास.

ह

हरि – इंद्र.
हलायुध – बलराम.
हली – बलराम.
हंसवाहिनी – वाणी.

क्ष

क्षेत्र – शरीर व शेत.

REFBK-0016955

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | श्लोक चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १६ | १·१ | विकासिनी | विलासिनी |
| १९ | ३·४ | दिसती पोवळीं | दिसती कोवळीं कोवळीं |
| १९ | ६·२ | विरजती | विराजती |
| २२ | २३·१ | धाय | घाय |
| २२ | २६·१ | कांळिथफणांवरि | कांळिय फणांवरि |
| ३० | १८·१ | पदांबुरजःस्नपनें | पदांबुजरजःस्नपनें |
| ३३ | १५·१ | घम्मिल्ल | धम्मिल्ल |
| ३७ | १६·३ | परिवीं | परिधीं |
| ४१ | ७·१ | यक्षार्थ | यथार्थ |
| ४२ | (चूर्णिका) ओळ ३ | देवगंधर्व...समूहमावेष्टित | देवगंधर्व...समूहसमावेष्टित |
| ४२ | ,, ,, ५ | आरूढ यौवत | आरूढ यौवन |
| ४६ | २१·१ | शाड्वलीं | शाड्वलीं |
| ५८ | ७·१ | रिपुयमयपुत्रप्रासिला | रिपुयमयमपुत्रप्रासिला |
| ६० | २५·३ | चितांतरीं | चित्तांतरीं |
| ८३ | १·४ | तद्भग्नमैशंघनुः | तद्भग्नमैशंधनुः |

प्रस्तावना पृष्ठ १५ वरील तळटीप [illegible] संदर्भ महाराष्ट्र सारस्वताच्या चौथ्या आवृत्तीतील आहे. म. सा. आवृत्ती पान [illegible] १०० पहा.

१६९५५